# साहित्य

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२६



प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथाकार डॉ. जयंत नारळीकर

# साहित्य

मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक

स्थापना : जानेवारी १९४७

## जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२६

**संपादक मंडळ**

श्री. चंद्रशेखर गोखले, प्रा. प्रतिभा बिस्वास, श्री. एकनाथ आव्हाड

**या अंकाचे संपादक**

श्री. चंद्रशेखर गोखले

**प्रकाशक**

प्रा. प्रतिभा सराफ

मुखपृष्ठ : संतोष घोंगडे

अक्षरजुळणी : ग्रंथाली

मुद्रितशोधन : अनिल दाभाडे

आतील मांडणी : अनिरुद्ध गद्रे

छपाई : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई ४०००३१

- मूल्य तीस रुपये, वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. २००/–
  द्वैवार्षिक वर्गणी रु. ४००/–
- धनादेश 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावाने असावा.
- NEFT S/B A/C No. 002200100046717
  IFSC : SRCB0000002
  Bank Name - The Saraswat Co-op. Bank, Girgaum
  (वर्गणी पाठवल्यावर साहित्य संघाच्या भ्रमणध्वनीवर कळवावे)

**व्यवस्थापकीय पत्ता :** मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग,
गिरगाव, मुंबई ४००००४. भ्रमणध्वनी : ७३०४३६९३९६
इ–मेल : sahityasangha@gmail.com & sahityasangh@mtnl.net.in
वेबसाईट : www.mumbaimarathisahityasangh.com

**संपादकीय पत्ता :** चंद्रशेखर केशव गोखले – ए/११०४, जयगुरुदेव को. ऑप. हाउसिंग सोसायटी,
सेक्टर १७, कामोठे, नवी मुंबई ४१०२०९. भ्रमणध्वनी : ९९८७७६१२०९
इ–मेल : ckgokhale61gmail.com

या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.
या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रम


- संपादकीय / २
- **कथा** – स्मरल्या मला न तेव्हा! / ३
  डॉ. बाळ फोंडके
- **कथा** – निःशब्द / १५
  मेघश्री दळवी
- **कथा** – अस्तित्वाचा इशारा / २३
  गिरीश देसाई
- **कथा** – सौरवादळ / ३१
  रवींद्र भयवाल
- **कथा** – अजून आशा आहे / ३९
  स्वरा मोकाशी
- **कथा** – कालप्रवासाचे यात्री / ४७
  सुनील जावळे
- **कथा** – दुःखाची पंढरी / ५५
  स्मिता पोतनीस
- **कथा** – सर्च लाईट / ६३
  डॉ. सुनील विभुते
- **कथा** – सर्वे सन्तु निरामयाः / ६९
  श्रीराम बापट
- **कथा** – कुमार बुद्धिमाने / ७५
  गजानन परब
- **पुस्तक परिचय** – एकनाथ आव्हाड
  चाहूल सूर्यास्ताची – सदानंद पुंडपाळ, अनुभवाचे अंतरंग – अशोक शेट, जमाखर्च आयुष्याचा – बसवंत घेवार, ऋतुगंध –सुभाष बागल, तांड्याचे पाय – अनिता जाधव – ८२ ते ९५
- **कार्यवृत्तांत**
  - प्रा. प्रतिभा सराफ (साहित्य शाखा) / ९६
  - चंद्रशेखर गोखले (संघ मंदिर समिती) / ९९
  - ज्ञानेश भालचंद्र पेंढारकर (नाट्यशाखा) / १००

# संपादकीय

संपादकीय

प्रिय सुशिक्षित वाचकहो,

'प्रिय वाचकहो' एवढेच संबोधन पुरेसे होते. परंतु 'सुशिक्षित' हे विशेषण येथे हेतुपुरस्सर गुंफले आहे. कारण आपल्या सुशिक्षितपणाच्या मुशीत विवेकाचा कस लागतो का, हा सवाल मनात ठेवूनच या 'विज्ञान कथा' विशेषांकाची निर्मिती केली आहे.

हा अंक दुहेरी समर्पणाचा संकल्प आहे. १९ जुलै हा डॉ. जयंत नारळीकर यांचा जन्मदिवस, 'मराठी विज्ञान कथा दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून हा विशेषांक त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून अर्पण केला आहे! याशिवाय तुमच्या–माझ्या अंतरी दडलेल्या चिकित्सक वृत्तीला, प्रश्न विचारण्याच्या धीटाईलाही!

मराठी विज्ञान कथेचा ओघ दीडशे वर्षांचा. १८७०ला विष्णू कर्वे यांची 'काळाच्या राज्यात' ही काळप्रवासाची पहिली कथा. पुढे ग.ह. पाटील यांनी 'वैज्ञानिक कथा' हा शब्द रूढ केला. बा.कृ. भावे, लक्ष्मण लोंढे, श्री.ज. जोशी यांनी हा प्रवाह वाढवला. परंतु १९७० नंतर नारळीकरांच्या प्रवेशाने मराठी वि.क. 'बालसाहित्य' किंवा 'केवळ चमत्कार' या चौकटीतून बाहेर पडली.

'यक्षांची देणगी', 'वामन परत न आला', 'अभयारण्य' या कथांनी दाखवले की विज्ञान कथा म्हणजे मानवी मूल्यांची, नैतिक द्वंद्वांची गोष्ट. त्यांच्या कथेत कृष्णविवर आहे, पण मनातले गूढही. टाइम मशिन आहे, पण 'इतिहास बदलायचा मोह' ही शोकांतिकाही. त्यांनी विज्ञानाची गंमत सांगितली तशी जबाबदारीही!

आज आपले प्रतिबिंब काय? एका मुठीत विश्वाला कवेत घेणारी कृत्रिम प्रज्ञा, दुसऱ्या मुठीत त्याच यंत्राकडे 'साडेसाती कधी संपेल' ही याचना. श्रद्धेच्या महापूर तर कधी नियोजनाचा अभाव. आपण पदवीधर, निमूटपणे गंडे–दोरे विकत घेतो. हा विरोधाभास नारळीकरांना न रुचणारा. त्यांचा आग्रह होता – 'का?' हा प्रश्न विचारा हा प्रश्न म्हणजेच विज्ञान!

या अंकातील प्रत्येक कथा दिवटी आहे. साहित्याच्या विशेषांकाला महाराष्ट्राबाहेरून तसेच विदेशातूनही कथा आल्या. मेघश्री दळवींची 'निशब्द' मौनाचे विज्ञान उलगडते, डॉ. बाळ फोंडके यांची 'स्मरल्या मला न तेव्हा' विस्मृतीची किंमत सांगते, तर विभूतेंची 'स्वप्नपूर्ती' यंत्रातला मुलगा शोधते.

'ब्रह्मांड अनंत आहे. ते आकळायला दुर्बिणीसोबत डोळस दृष्टीही हवी.' हे या कथा वाचल्यावर नारळीकर जाणवतील आणि नारळीकर आपल्यातच असल्याचा भास होत राहील!

या १९ जुलैला प्रतिज्ञा करूया – मनातल्या अंधश्रद्धेच्या कुपावर प्रश्नाचा काजवा सोडू या कारण एक काजवा वाट दाखवतो, आणि एक प्रश्न पिढ्यांची वाट प्रकाशमान करतो.

हा अंक संपादित करण्याची संधी साहित्य शाखेने मला दिली त्याबद्दल कार्याध्यक्ष आणि माझे साहित्य शाखेचे सहकारी यांचे आभार. साहित्य शाखेच्या कार्यवाह प्रा. प्रतिभा सराफ यांनी या अंकाच्या संपादनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

डॉ. नारळीकर यांच्या ज्ञानसाधनेला आणि तुमच्या–आमच्या विवेकजागृतीला हा अंक अक्षरांजली!

**– चंद्रशेखर गोखले**

संपादक

# स्मरल्या मला न तेव्हा!

## डॉ. बाळ फोंडके

अनघा जेव्हा पहिल्यांदा आरशात स्वतःकडे पाहून घाबरली, तेव्हा तिला क्षणभर वाटलं, की आरशातली ती स्त्री आपण नाहीच. दुसरीच आहे कोणीतरी! डोळ्यांखाली खोल गेलेली वर्तुळं, केसांच्या मुळाशी अचानक दिसू लागलेली पांढरी रेघ, आणि सगळ्यात भयानक म्हणजे नजरेतली अनिश्चितता. काय आहे हे! मेंदूच्या आत कुठेतरी बारीकसं शॉर्टसर्किट तर झालेलं नाही! त्याचीच झळ चेहऱ्याला लागलेली असावी. पण का झालं हे शॉर्टसर्किट? आणि कसं?

मी काही कोणी अल्लड पोर नाही आता... दोनच महिन्यांपूर्वी तर चाळिशीत पदार्पण केलंय आपण. दोन मुलांची आई आहोत आपण... पेशाही आपला बायोटेक्नॉलॉजीत संशोधनाचा. पेशींच्या आत डोकावून त्यांच्यातील सूक्ष्म यंत्रणा समजून घेतो आपण. पण मग स्वतःच्या मनाच्या पेशींची ही झीज का होतेय, हे का कळत नाहीय? आणि कळली तरी ती कशी थांबवायची, हे तरी कुठं माहिती आहे?

'म्हणूनच का आपण या चेताविज्ञानाच्या, मेंदूविषयीच्या संशोधनाला सुरुवात केली,' तिनं स्वतःलाच विचारलं. तिला मेंदूविषयक संशोधनाकडे ओढ लावणारी पहिली ठिणगी प्रयोगशाळेत पडलेली नव्हती; ती पडली होती तिच्या आजीच्या डोळ्यांत.

आजी, शारदाकाकू सगळ्यांसाठी, पण अनघासाठी फक्त आईसाहेब. गणित शिकवणारी, पाढे म्हणताना चूक केली तर कान ओढणारी, आणि रात्री झोपताना '*चांदोबा चांदोबा भागलास का*' म्हणणारी. पण अनघा पीएच.डी. करत असतानाच आजीमध्ये बदल सुरू झाले. सुरुवातीला किरकोळ विसरभोळेपणा. चहाचा गॅस बंद करायला विसरणं. त्याच-त्याच प्रश्नांची पुनरावृत्ती करणं.

''अनु, आज तुझी परीक्षा आहे का ग?'' आजी सकाळी विचारायची.

''नाही आईसाहेब, मी आता शिकवते. मी आता दुसऱ्यांची परीक्षा घेते.'' अनघा हसत म्हणायची.

दहा मिनिटांनी पुन्हा तोच प्रश्न.

एक दिवस मात्र आजीनं तिला ओळखलंच नाही.

''तू कोण?'' आजीनं डोळे बारीक करत विचारलं.

अनघाच्या आत काहीतरी तुटलं. ''मी अनु तुमची नात.''

आजीच्या चेहऱ्यावर गोंधळ. समजल्याची, ओळखल्याची काही खूण नाही. मग क्षणभर प्रकाश पडल्यासारखं झालं, ''अगं अनु! तू इतकी मोठी कधी झालीस?''

त्या दिवशी अनघानं ठरवलं, आठवणींच्या या गळतीला थांबवायचं.

अल्झायमर म्हणजे नेमकं काय, हे तिनं तसं आधी पुस्तकात वाचलं होतं. पण आजीच्या बाबतीत ती फक्त व्याधी नव्हती. तो रोजचा विरह होता. मेंदूतल्या हिप्पोकॅम्पस नावाच्या भागात सुरुवातीला बिघाड होतो. हा भाग म्हणजे आठवणींचं प्रवेशद्वार. नवीन अनुभव इथं येतात आणि त्यांची 'नोंद' घेतली जाते. नंतर त्या मेंदूच्या वेगवेगळ्या भागात साठवल्या जातात.

सोप्या भाषेत सांगायचं, तर आठवण तयार होणं म्हणजे दोन किंवा अधिक न्यूरॉन्स, यांच्यातील हातमिळवणी घट्ट होणं, डॉक्टर रुग्णांच्या नातेवाइकांना समजावून सांगत असत. तिनंही ते तिच्या काही सहकाऱ्यांकडून ऐकलं होतं.. एखादी घटना घडली की काही पेशी एकत्र सक्रिय होतात. त्या वारंवार सक्रिय झाल्या की त्यांच्या मधली 'सायनॅप्स' नावाची जागा अधिक कार्यक्षम होते. जणू एखाद्या गल्लीतून लोक बारंवार गेले, की ती पायवाट रुंदावावी तसंच. ह्यालाच शास्त्रज्ञ 'लाँग टर्म पोटेन्शिएशन' म्हणतात. जोडण्या अधिक मजबूत होणं.

अल्झायमरमध्ये मात्र त्या जोडण्या कमकुवत होत जातात. पेशींमध्ये अमायलॉइड आणि टाऊ नावाची विकृत प्रथिनं साचतात. वायरिंगमध्ये गंज साचावा तशी. संदेश नीट पोचत नाहीत. आठवणींच्या पायवाटा तणांनी, झाडाझुडपांनी भरून जातात.

आजीच्या शेवटच्या वर्षात अनघा तिच्या पलंगाजवळ बसून तिचा हात धरायची, ''आईसाहेब, हे कोण?'' ती स्वतःकडे बोट दाखवून विचारायची.

कधी उत्तर यायचं, कधी नाही.

आजी कधी ओळखायची, कधी नाही. तिला त्याचा त्रास होत नव्हता. पण अनघा मात्र अस्वस्थ व्हायची. आपण याबाबतीत काहीच करू शकत नाही या जाणिवेतून तिला हतबल झाल्यासारखं वाटायचं.

त्या असहायतेतूनच 'मेमरी स्टिक'ची कल्पना जन्माला आली. आठवणी तयार करणारं न्यूरॉन्सचं जाळं मेंदूत रुतून बसलेलं असलं तरी ते कमकुवत व्हायला लागतं. आणि मग विस्मरण व्हायला लागतं. त्याचा निपटारा करण्यासाठी कृत्रिमरीत्या त्या वाढवता येतील का? न्यूरॉन्सचं काम विद्युतरासायनिक संदेशांमधूनच होतं ना, मग मेंदूत आधीच असलेल्या सर्किटला सौम्य विद्युत उत्तेजन देऊन त्या पायवाटा पुन्हा चालू करता येतील का?

''मेंदू म्हणजे हार्डडिस्क नाही,'' अनघा तिच्या टीमला म्हणायची, ''आपण बाहेरून आठवणी टाकू शकत नाही. पण आपण कमकुवत झालेल्या पायवाटांना थोडा उजेड देऊ शकतो.''

तिची संकल्पना साधी पण धाडसी होती. हिप्पोकॅम्पसमध्ये बसवायचं नॅनो-इलेक्ट्रोड्सचं सूक्ष्म जाळं. जेव्हा विशिष्ट न्यूरल पॅटर्न, एखाद्या आठवणीशी संबंधित पेशींचा रचनाबंध कमकुवत पडतो, तेव्हा ही इलेक्ट्रॉनिक चिप त्या पॅटर्नला सौम्य विद्युत उत्तेजन देईल. मंदावलेला गाण्याचा आवाज किंचित वाढवला की स्पष्ट नाही का ऐकू येत!

अनघा नुसताच विचार करून थांबली नाही. तिनं तो प्रत्यक्षात आणण्यासाठीचं संशोधन सुरू केलं. त्यातूनच मेमरी स्टिक जन्माला आली. तिनं तशी एक इलेक्ट्रॉनिक चिप तयार केली. मेंदूमध्ये तिचं रोपण करण्यासाठी. ती तिथं बसवली की मग बाहेरून तिला संदेश देत हव्या त्या ठिकाणी हलकासा बिजेचा धक्का द्यायचा. कुठं द्यायचा हे नेमकं ओळखण्यासाठी चिपमध्ये एआयवर, कृत्रिम बुद्धिमत्तेवर, आधारित अल्गॉरिदम बसवलेला असणारच. मेमरी स्टिक हे नाव मात्र तिचा मुलगा अद्वैतने दिलं होतं.

''आई, तू म्हणतेस ना, मेंदू म्हणजे कम्प्युटर नाही. पण ही तुझी चिप म्हणजे पेनड्राईव्हसारखीच तर वाटतेय मला.''

ती हसली, ''नाही रे. ही चिप काही बाहेरून आठवणी टाकत नाही. चिपमध्ये पूर्वीच्या आठवणी साठवून हव्या तेव्हा जागृत करण्याचं काम ही चिप करत नाही. आणि तसंच करायचं असतं तर मग ही चिप मेंदूमध्ये ट्रान्सप्लान्ट केल्यावरही तिच्यातला मजकूर बाहेरच्या पेनड्राइव्हवर डाउनलोड करता येईल. मग तो कॉम्प्युटरला जोडून त्याच्या पडद्यावर त्या आठवणींचा व्हिडिओ पाहता आला असता. ही चिप कमजोर झालेल्या जोडण्यांना परत ताकद पुरवते. सुस्त झालेल्या घोड्याला टाच मारून परत दुडक्या चालीनं का होईना, दौडवायला लावावं तसं.''

चिप प्रत्यक्षात नॅनो-स्केल इलेक्ट्रोड्सचं जाळं होतं. इंटिग्रेटेड सर्किट. ती हिप्पोकॅम्पसमध्ये बसवायची. आठवणींशी संबंधित असलेला कोणता पॅटर्न कमजोर झालाय, हे त्यातला एआय अल्गॉरिदम ओळखेल. आणि त्याला सौम्य उत्तेजन देत नव्यानं थोडी ताकद देता येईल. आळसावलेली ती आठवण उजळवेल..

आजी जिवंत असताना हा प्रयोग मानवांवर करण्याच्या टप्प्यावर आला नव्हता. अनघानं कसोशीचे प्रयत्न केले; पण ते शक्य झालं नाही. पण आजी गेल्यावर अनघाच्या मनानं एक ठाम निर्धार केला. आपल्या आईसाहेब कायमच्या हरवल्या, त्याला इलाज नव्हता. पण आता इतर कुणाच्या हरवायला नको.

शिरस्त्याप्रमाणे प्रयोगशाळेत उंदरांवर प्रयोग सुरू झाले. त्यांच्या मेंदूत चिप बसवण्यात आली. उंदरांना एरवी प्रकाशाची भीती वाटते. दिवसाउजेडी ते बिळातून बाहेर पडत नाहीत. पण सूर्यास्त झाला की खुडबूड करायला लागतात. प्रकाश धोकादायक आहे, याची आठवण त्यांच्या मनात घट्ट बसलेली असते. म्हणून तिनं उंदरांच्या पिंजऱ्यात एक पोलादी पडदा टाकून दोन भाग केले. एका भागात प्रखर प्रकाश तर दुसऱ्या भागात ठार अंधार. फक्त त्या पडद्यात एक दार ठेवलं, इकडून तिकडे जाण्यासाठी.

तिनं त्यांचं अन्न-पाणी प्रकाश असलेल्या भागात ठेवायला सुरुवात केली. सुरुवातीला उंदीर तिकडे जायला बिचकायचे. पण उपाशीच राहायची पाळी आल्याबरोबर त्यांनी हळूच तिकडे जाऊन अन्न घेऊन परत अंधाऱ्या भागात पळायला सुरुवात केली. ती बागणूक प्रस्थापित झाल्यावर तिनं उंदीर अंधाऱ्या भागात आल्याबरोबर त्याला एक विजेचा सौम्य झटका द्यायला सुरुवात केली. त्याबरोबर उंदीर प्रकाशाची भीती विसरायला लागले. ती रुजल्याची खात्री पटल्यावर अनघा आणि तिचा सहकारी राघव यांनी चिपला उत्तेजन द्यायला सुरुवात केली. आता चिपची खरी कसोटी पाहणारे प्रयोग सुरू झाले.

ते यशस्वी होत असल्याची चिन्हं दिसू लागली. एक दिवस राघव नाचतच तिला बोलवायला आला. ती उंदीर ठेवलेल्या खोलीत आल्यावर म्हणाला, ''हे बघ! कालपर्यंत हे चुकत होते. प्रकाशाची भीती विसरत होते. पण आता काही वेळ तरी ते तिकडे जायला घाबरताहेत...''

अनघाच्या डोळ्यांत पाणी आलं. ''आईसाहेब, तुम्हाला हा मार्ग दाखवता आला असता तर...'' ती मनात म्हणाली.

आता प्रत्यक्ष माणसांवर हा प्रयोग करता येईल का? तिला घाई झाली होती. पण नियम मात्र तिला तसं करू देत नव्हते. आणखी काही प्रयोग प्राण्यांवरच करणं अनिवार्य होतं. त्यांचे एकत्रित निष्कर्ष बोर्डासमोर ठेवले की त्यांचा आढावा घेऊन मग क्लिनिकल ट्रायल्ससाठी परवानगी मिळाली असती.

तेवढ्यात तिच्या वाचनात आलं, काही दिग्गज वैज्ञानिकांनी आपल्या नव्या संशोधनाचे पहिले प्रयोग स्वतःवरच केले होते. ते जोनास साल्क नाही का, ज्यांनी १९५३मध्येच पोलियोला अटकाव करणारी लस तयार केली. कोणी त्यांच्यावर विश्वास ठेवेना. तेव्हा त्यांनी ती स्वतःलाच टोचून घेतली. ती निर्धोक आहे, तसंच परिणामकारकही आहे; हे सिद्ध करण्यासाठी. आणि ते एकटे थोडेच होते. लुई पाश्चरनंही जेव्हा रॅबिसविरुद्धची लस शोधून काढली तेव्हा ती पहिल्यांदा स्वतःलाच टोचली. जेन्नरनं देवीच्या लसीचा पहिला प्रयोग स्वतःवर नसला तरी आपल्या एका

नोकराच्या मुलावर केला. कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय. हं, त्यावेळी तशी काही नियमावली, काही कायदे नव्हते. तरीही त्यांनी मानवावरचा प्रयोग केलाच. अशी कितीतरी उदाहरणं. अगदी ज्यांच्या स्मरणार्थ हाफकिन इन्स्टिट्यूटची स्थापना केली गेली, ते व्हाल्देमार हाफकिनही याच मांदियाळीतले. तिनं ठरवलं, आपणही त्यांचाच कित्ता गिरवायचा. तिच्या मनानं तसं केलं असलं तरी इतरांचं सहकार्य मिळणं तितकंसं सोपं नव्हतं. चिप मेंदूत ट्रान्सप्लान्ट करायची तर न्यूरोसर्जन तयार व्हायला हवेत. खरंतर त्यांची अख्खी टीम. त्यानंतरही प्रयोगासाठी आपलेच राघवसारखे सहकारी, त्यांचीही मदत लागणार होती. तिनं राघव आणि न्यूरोसर्जन यांची मीटिंग घेतली. काय करायचंय याची कल्पना त्यांना दिली. पण ते तयार होईनात. हे बेकायदा आहे याची त्यांनी आठवण करून दिली.

"खरंय!" ती म्हणाली, "तुम्ही एथिकल हॅकिन्ग ऐकलंय? अनेक कंपन्या आपल्या डीजिटल सिस्टीमबर हल्ला होऊ नये, ती हॅक केली जाऊ नये म्हणून तटबंदी बसवतात, फायर वॉल. पण ती खरोखरीच भक्कम आहे, तिच्यात कोणत्याही फटी नाहीत, याची खातरजमा त्यांना करून घ्यायची असते. त्यासाठी ते काही प्रोफेशनल हॅकर्सना नोकरी देतात आणि आपलीच सिस्टीम हॅक करायला सांगतात. त्याच्या तटबंदीची चाचपणी करण्यासाठी. तिच्यात कोणत्याही त्रुटी नाहीत हे अजमावण्यासाठी. तेही म्हटलं तर बेकायदेशीरच असतं. पण त्या कंपन्यांनी त्यांना स्वतःच तशी परवानगी दिलेली असल्यामुळं कायदा तसा आड येत नाही. मी जे करायला सांगतेय, ते एका प्रकारचं एथिकल हॅकिन्गच आहे. मानवी प्रयोगांना कायद्याची परवानगी नाही. पण मी माझ्या संमतीनंच आणि माझ्यावरच प्रयोग करायला सांगतेय. आपण तसं रेकॉर्ड करून ठेवुया. म्हणजे तुमच्यावर काही ठपका येणार नाही. शिवाय आपल्या टीममध्ये कमीत कमी सदस्य ठेवुया. मग तर काही हरकत नाही ना?"

तिचा युक्तिवाद अजूनही तसा त्यांच्या गळी उतरलेला नव्हता. पण दबकत दबकत का होईना ते तयार झाले... प्रयोग यशस्वी झाला तर काही प्रमाणात तरी श्रेय आपल्याला मिळेल या आशेनं.

न्यूरो-स्टिम्युलेशनचा हलका प्रयोग तिच्यावरच केला गेला.. सुरक्षित मर्यादित, पूर्ण वैद्यकीय देखरेखीखाली. तिच्या मेंदूत ती चिप बसवली गेली. एआयचा अल्गॉरिदम जागृत करून कोणत्या ठिकाणी त्या पूर्वीच्या, आता धूसर झालेल्या, आठवणी साठलेल्या आहेत ते निश्चित, करण्यात आलं. आणि मग त्या विशिष्ट भागावर सूक्ष्म विद्युत उत्तेजन दिलं गेलं.

मेंदूतलं हिप्पोकॅम्पस हे उपांग म्हणजे आठवणींचं प्रवेशद्वारच. त्याला हलक्याशा

सिग्नलनं चाळवलं की एखादी सुप्त राहिलेली जुनी आठवण फडा काढून उभी राहते. अनेकांनी, तिनंही, केलेल्या आधीच्या अभ्यासातून कळून चुकलं होतं. अंधाऱ्या खोलीत टॉर्च पेटवला की तोपर्यंत न दिसणारी कोपऱ्यातली खुर्ची एकदम डोळ्यांवर आघात नाही का करत!

त्या दिवशी टॉर्चचा प्रकाश जरा जास्तीच प्रखर झाला असावा.

झोपी गेलेला हिप्पोकॅम्पस खडबडून जागा झाला आणि अनघाच्या डोळ्यांसमोर बालपणाच्या आठवणींची चित्रफीत सरकू लागली. शाळेचा पहिला दिवस. आईचा हात घट्ट पकडलेला. गणितात मिळालेला पहिला भोपळा. लग्नाच्या दिवशीची गडबड. अद्वैतचा जन्म. सगळं इतक्या तपशिलात, इतक्या जिवंतपणे की ती स्वतःच त्या क्षणात परत भूतकाळात पोचल्यासारखी झाली...

या सगळ्या ठीक होत्या. पुनःप्रत्ययाचा आनंद देणाऱ्या होत्या. पण खिरीत मीठ पडावं तशी ती आजवर दाबून ठेवलेली आठवणसुद्धा समोर आली.

तिच्या वडिलांचा अपघात.

ती तेव्हा बारावीला होती. बाबा कामावरून परत येताना झालेल्या अपघातात गेले. रुग्णालयातला तो थंडगार वास, आईचा पांढराफटक चेहरा, डॉक्टरांचं शांत पण कठोर वाक्य, ''वुई आर एक्स्ट्रीम्ली सॉरी. आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले, पण''

ती आठवण मेंदूच्या कुठल्या कोपऱ्यात दडली होती, कोण जाणे! पण तिनं दिलेल्या उत्तेजनानं जणू बंद कपाट उघडलं. फक्त दारच किलकिलं झालं नाही, संपूर्ण कपाटच अंगावर कोसळलं.

अनघा बसली होती तिच्या प्रयोगशाळेतल्या आवडत्या खुर्चीतच. पण मनानं ती केव्हाच त्या रुग्णालयाच्या कॉरिडॉरमध्ये पोचली होती. एकाएकी तिचा श्वास अडकला. हृदयाची धडधड वाढली. मॉनिटरवर तिच्या मेंदूच्या लहरी वेड्यावाकड्या दिसू लागल्या.

''डॉ. देशमुख, स्टिम्युलेशन बंद करा!'' तिचा सहकारी राघव ओरडला.

उत्तेजन थांबलं. पण आठवणींचा पूर थांबला नाही.

त्या दिवसानंतर तिचं आयुष्य दोन स्तरांवर चालू लागलं. वरकरणी ती संशोधक, आई, पत्नी. आतून मात्र ती सतत सावध. हॉस्पिटलचा वास आला की हृदयाची धडधड वाढायची. पावसात रस्त्यावर ब्रेकचा कर्कश आवाज ऐकला की श्वास अडकायचा.

''आई, तू ठीक आहेस ना?'' नील एकदा म्हणाला.

ती जबरदस्तीने हसली, ''हो रे. आईच्या मेंदूत थोडा ट्रॅफिक जाम झालाय.''

पण रात्री ती रडायची. रात्री तिला झोप लागत नसे. डोळे मिटले की हॉस्पिटलचा

कॉरिडॉर दिसायचा. एकदा तर ती किंचाळत उठली. बाजूला झोपलेला तिचा धाकटा मुलगा, नील, घाबरून म्हणाला, ''आई, काय झालं? कोणी येतंय का?''

ती त्याला बिलगून रडू लागली. ''कोणी नाही रे. आईचंच मन थोडं घाबरतंय.''

दुसऱ्या दिवशी तिनं आईला, सुधाला, फोन केला, ''आई, मला तुझ्याकडे यायचंय काही दिवस.''

सुधा शांतपणे म्हणाली, ''ये गं. तुझंच तर घर आहे.''

सुधा सत्तरची. आयुष्यात खूप पाहिलेलं. पतीचा अकाली मृत्यू, मुलीचं लग्न, नातवंडं. पण तिच्या डोळ्यात अजूनही एक मृदू स्थैर्य होतं. अनघा तिच्या मांडीवर डोकं ठेवून पडली, जशी लहानपणी पडायची. ''मी मेंदू दुरुस्त करायला निघाले आणि स्वतःचं मन बिघडवलं,'' ती आईला म्हणाली.

सुधा शांतपणे तिच्या केसांवरून हात फिरवत म्हणाली, ''तू पेशींशी खेळलीस, पण त्या पेशींमध्ये भावना आहेत हे विसरलीस.''

अनघाला त्या वाक्याने झटका बसला, 'मेंदू म्हणजे फक्त विद्युत संकेत नाहीत; ते अनुभवांचे ठसे आहेत.'

ती स्वतः वैज्ञानिक होती. तिला माहीत होतं, मेंदू म्हणजे विद्युत आणि रसायनांचं जाळं. भावविश्वाच्या खेळात अमिग्डाला नावाचा भाग महत्त्वाचा असतो. तो जणू घरातला धूरसेंसर. जरा जरी धोक्याचा सुगावा लागला की तो सायरन वाजवतो. तिच्या बाबांच्या मृत्यूची आठवण अमिग्डालाने धोका म्हणून कायमची कोरून ठेवली होती. आणि आता, त्या नॅनो-स्टिम्युलेशनने जणू सायरनची संवेदनशीलता वाढवली होती.

अनघा माणूसच होती. चिकित्सक वैज्ञानिक माहितीनं मन शांत होत नाही. मेंदूला समजतं; पण मनाला उमगत नाही.

''आई, मी बाबांचा अपघात विसरले होते का?'' कसंबसं अनघानं विचारण्याचं धाडस केलं.

सुधा थोडा वेळ शांत राहिली. ''विसरली नव्हतीस. फक्त पुढं चालत राहिलीस. आपलं एखादं जुनं घर असतं ना, ज्यात आपण आता राहात नाही. पण ते असतंच ना!''

अनघा हसली. ''आई, तू न्यूरोसायन्स शिकली आहेस का गुपचूप?''

''नाही गं. पण आयुष्यानं बरंच काही शिकवलंय.''

तिची घालमेल न पाहवल्यानं तिच्या मित्रमैत्रिणींनी तिला न्यूरोसायकियाट्रिस्टकडे जाण्याचा सल्ला दिला. डॉ. समीर जोशी, तरुण पण अभ्यासू डॉक्टर. त्यांनी सगळं

ऐकून घेतलं.

डॉ. समीर जोशींनी तिची थेरपी सुरू केली.

''डॉ. देशमुख, तुम्ही स्वतः वैज्ञानिक आहात. त्यामुळे थेट मुद्द्यावर येतो. तुमच्या मेंदूत जे झालंय, ते सुदैवानं कायमचं नुकसान नाही. तुमच्याच घाईनं न्यूरॉन्सच्या जोडण्यांची ताकद वाढली आहे खरी, पण मेंदू प्लास्टिक आहे, लवचीक आहे. तो वेगळा मार्ग शोधू शकतो. एखाद्या रस्त्यावर ट्रॅफिक जाम झाला की पर्यायी रस्ते नाही का शोधत आपण?''

''मला उदाहरणं नकोत डॉक्टर. उपाय हवाय.''

डॉ. जोशी हसले. ''उपाय आहे. थेरपी, औषधं, आणि सर्वांत महत्त्वाचं, नव्या आठवणी निर्माण करणं.''

''नव्या आठवणी?''

''हो. मेंदूला जागा रिकामी राहिलेली चालत नाही. जुन्या आठवणी जड व्हायला लागल्या तर त्यांना संतुलित करण्यासाठी नव्या, सकारात्मक आठवणी तयार कराव्या लागतात.''

''डॉ. देशमुख, आठवण म्हणजे फक्त घटना नाही; ती त्या घटनेशी जोडलेली भावना आहे. तुम्ही त्या जोडणीला इतकं तीव्र केलं, की ती आता प्रत्येक छोट्या संकेतावर सक्रिय होते. हरकत नाही. आपण नवीन जोडण्या तयार करू.''

''कशा?'' ती थकलेल्या आवाजात म्हणाली.

''जाणीवपूर्वक पुनर्लेखन. जसं एखाद्या जुन्या फोटोवर नवीन कॅप्शन लिहावी तसं.''

या सगळ्याकडे राघवचं बारीक लक्ष होतं. तिची तडफड होत असलेली पाहून एक दिवस त्यानं विचारलं, ''अनघा, प्रोजेक्ट थांबवुया का?''

ती संतापायची. ''मी पळून जाणार नाही. मी समजून घेईन.''

पण एकटी असताना ती कोसळायची. ''मी मेंदू दुरुस्त करायला निघाले आणि स्वतःचं मन मोडलं,'' ती परतपरत आईकडे, सुधाकडे-रडत म्हणायची.

सुधा तिच्या केसांवरून हात फिरवत तिला सावरायची, ''पेशींच्या आतही माणूस असतो गं. ते विसरू नकोस.''

''डॉ. देशमुख,'' समीर म्हणाला, ''मेंदू बदलतो. तुम्ही एका सर्किटला जास्त बळ दिलंत. आता आपण त्यासोबत दुसरं सर्किट तयार करुया.''

''कसं?'' ती थकून विचारायची.

''त्या आठवणीकडे परत जाऊ. पण यावेळी तुम्ही प्रौढ अनघा असाल. बारावीतली भेदरलेली मुलगी नाही.''

थेरपी संथ होती. काही दिवस सुधारणा व्हायची तर काही दिवस पुन्हा मागं जायची, पाठच्या टप्प्यावर. ती स्वतःवर चिडायची. मी इतरांना मदत करते आणि स्वतःलाच सावरू शकत नाही?

समीर हसत म्हणायचे, ''डॉक्टर स्वतःच रुग्ण असले की जास्त हट्टी असतात.''

तिची स्वतःची सुटका मात्र अजून चालू होती. पण फरक इतकाच, की आता ती भीतीला नाव देऊ शकत होती. 'हा माझ्या अमिग्डालाचा सायरन आहे,' ती स्वतःला म्हणायची. खरा धोका नाही.

हळूहळू, त्या अपघाताच्या आठवणीशी नवीन संदर्भ जोडले गेले. आईचा धीर, आईसाहेबांचा आधार, स्वतःची जिद्द. महामार्गाजवळ नवीन रस्ते तयार झाले.

थेरपी सुरू झाली तेव्हा सुरुवातीला अनघा तटस्थ, साशंक होती. पण डॉक्टरांनी तिला तिच्याच भाषेत समजावलं. मेंदूतील 'लाँग टर्म पोटेन्शिएशन' म्हणजे जोडण्यांची ताकद वाढणं. ते उलटवणं कठीण आहे मान्य, पण अशक्य नाही. ध्यान, श्वसन, कॉग्निटिव्ह थेरपी–हे सगळं म्हणजे त्या जोडण्यांवर सौम्यपणे नवीन शिक्का मारणं. थेरपीमध्ये ती त्या अपघाताच्या प्रसंगाकडे परत जाई. पण यावेळी एकटी नसे. प्रौढ अनघा त्या बारावीच्या मुलीच्या शेजारी उभी राहायची.

घरात नवरा, मुलंही तिची काळजी घेत होती. आई सुधाही मदतीला होती. अद्वैत एकदा म्हणाला, ''आई, तुझ्या मेंदूत जास्त डेटा सेव्ह झालाय बहुतेक. थोडा डिलीट कर.''

ती हसली. ''मेंदूला डिलीट बटण नसतं रे.''

''मग रिसायकल बिन?''

नील मध्येच म्हणाला, ''आई, आपण तुझ्या बाबांची आठवण काढतो तेव्हा तू रडतेस. पण मला आजोबा कधी दिसलेच नाहीत. तू त्यांच्याबद्दल काही चांगल्या गोष्टी सांग ना.''

म्हटलं तर तो साधा प्रश्न होता. सहज विचारलेला; पण तिच्या समस्येचं उत्तर त्यातच दडलं होतं.

त्या रात्री अनघाने मुलांना त्यांच्या आजोबांबद्दल सांगायला सुरुवात केली, ''तुझे आजोबा खूप हसरे होते. गणितात तरबेज होते. आणि मला सायकल चालवायला त्यांनीच शिकवलं.''

ती सांगत गेली, आणि तिला जाणवायला लागलं, आठवण बदलते आहे. हॉस्पिटलचा थंडगार वास नाही, तर उन्हातला सायकलचा रस्ता दिसतो आहे.

मेंदू म्हणजे फक्त हार्ड डिस्क नाही; तो कथाकथन करणारा कवी आहे. आपण कोणती कथा पुन्हापुन्हा सांगतो, त्यावर त्याची रचना बदलते.

हळूहळू, थेरपीच्या सत्रांत ती त्या अपघाताच्या आठवणीला सामोरी जायला लागली. डॉ. जोशी तिला मार्गदर्शन करत, ''त्या कॉरिडॉरमध्ये स्वतःला उभं पाहा. पण या वेळी तुमच्या शेजारी प्रौढ अनघा उभी आहे. ती बारावीच्या अनघाला काय सांगेल?''

अनघाच्या डोळ्यात पाणी आलं, ''मी तिला सांगेन, तुझं काही चुकत नाहीये. तू मजबूत आहेस. यातूनही सावरशील. वेळ लागेल; पण सावरशील.''

ती वाक्यं जणू तिच्याच मेंदूत नवीन मार्ग तयार करत होती.

काही महिन्यांनी ती पुन्हा प्रयोगशाळेत गेली. यावेळी सावधपणे. तिने स्वतःवर प्रयोग न करण्याचा निर्णय घेतला. पण तिचा प्रकल्प थांबवला नाही.

''अनघा, तुला खात्री आहे ना? हा प्रयोग नक्की चालू ठेवायचाय? त्याचा काय परिणाम होतो, हे तू स्वतःच अनुभवते आहेस. तरीही तुला तो अ‍ॅबॅन्डन करावासा वाटत नाही?'' राघवनं विचारलं.

''हो. त्यातलं विज्ञान, तंत्रज्ञान चुकलेलं नाही. आपण त्याचा योग्य तो उपयोग करू शकलो नाही. आपण चुकलो. पण लक्षात घे, चूक, निगेटिव्ह रिझल्ट म्हण हवं तर, तीही माहितीच असते. मार्ग बदलण्यासाठी दिलेला इशारा असतो.''

म्हणूनच यावेळी ती सावध होती. मानवांवर चाचणी करण्याची परवानगी मिळवून मगच तिनं त्या करण्याची तयारी केली. त्यापूर्वी मात्र तिनं त्या चिपच्या साथीनं मानसोपचार अनिवार्य ठेवला. ''फक्त वायरिंग मजबूत करणं पुरेसं नाही,'' ती म्हणाली, ''भावनिक संदर्भही सांभाळावा लागेल.''

पहिली स्वयंसेवक होती साठीतली कावेरीताई. सुरुवातीच्या टप्प्यातील अल्झायमर होता त्यांना. त्या मुलीचं नाव विसरायच्या.

चिप बसवण्याआधी अनघा त्यांच्याशी बराच वेळ बोलली, ''तुम्हाला काय आठवायला हवं आहे सगळ्यात जास्त?''

कावेरीताई हसल्या, ''माझ्या मुलीचा वाढदिवस. दरवर्षी विसरते.''

शस्त्रक्रिया यशस्वी झाली. काही आठवड्यांनी, सौम्य उत्तेजन आणि नियमित थेरपीच्या साहाय्याने, कावेरीताईंनी मुलीला पाहताच म्हटलं, ''अगं, तुझा वाढदिवस पुढच्या मंगळवारी आहे ना?''

मुलगी रडू लागली. अनघाच्या अंगावर शहारे आले.

त्या क्षणी तिला उमगलं, तिच्या वैयक्तिक वेदनेतून जन्मलेलं हे संशोधन आता इतरांच्या आयुष्यात प्रकाश टाकत आहे.

तिच्या स्वतःच्या सुटकेची प्रक्रिया मात्र अजून सुरूच होती. काही दिवस चांगले असत; पण त्यानंतर काही दिवस अचानक उदास वाटे. कशाचाचा उत्साह वाटत

नसे.. पण फरक इतकाच, की आता ती घाबरत नव्हती. तिला जाणीव होती, हाही काळ जाईल. मेंदू बदलतो. जखमा भरतात.

एका संध्याकाळी ती आईच्या मांडीवर डोकं ठेवून म्हणाली, ''आई, माझ्यातलं वादळ कमी झालंय.''

सुधा हसली, ''वादळानंतरची माती सुपीक असते.''

अनघा हसली, ''तू न्यूरोसायंटिस्ट का झाली नाहीस?''

''मी आई झाले. तेच मोठं विज्ञान.''

रात्री तिने डायरीत लिहिलं – आठवणी म्हणजे विद्युत ठिणग्या नाहीत; त्या नात्यांचे धागे आहेत. आपण त्यांना घट्ट करू शकतो, पण जपून.

काही वर्षांनी 'मेमरी स्टिक' अधिक प्रगत झाली. ती मेंदूतील विशिष्ट लहरी ओळखून आपोआप उत्तेजन देई. जणू शांतपणे लक्ष ठेवणारा मित्र.

ती आता अल्झायमरच्या रुग्णांसाठी सुरक्षित प्रोटोकॉल तयार करत होती. उत्तेजनाची तीव्रता कमीजास्त कशी करायची, किती ठेवायची, याचा निर्णय कसा घ्यायचा, तोही प्रत्येक पेशंटसाठी, त्याच्या मनःस्थितीनुसार वेगवेगळा. म्हणूनच तर त्यासोबत मानसोपचारही करायचे.. मेंदू म्हणजे साधंसुधं इलेक्ट्रिकल सर्किट नाही. तो भावना आणि स्मृतींचं गुंफलेलं जाळं आहे, हे तिला स्वतःच्या अनुभवातून उमगलं होतं.

एका दिवशी तिने आईला विचारलं, ''आई, तुला बाबांची आठवण येते का अजून?''

सुधा शांत हसली, ''येते. पण आता ती बोचत नाही. एखाद्या जुन्या इजेचा व्रण राहतो, खुण राहते पण वेदना नाही होत.''

अनघा तिच्या मांडीवर डोकं ठेवून पडली, ''मलाही तसं व्हायचंय.''

''होशील. तू तर पेशी बदलवणारी मुलगी आहेस. स्वतःचं मन का नाही बदलणार?''

त्या रात्री अनघाने डायरीत लिहिलं, 'आठवणी म्हणजे आपल्याला जखडणारा साखळदंड नाही; त्या आपल्याला जोडणारा धागा आहेत. कोणता धागा घट्ट धरायचा, हे आपण ठरवू शकतो.'

काही वर्षांनी, तिच्या संशोधनामुळे एक नवीन उपचारपद्धती विकसित झाली. सुरुवातीला छोट्या गटावर. रुग्णांच्या डोळ्यांत हरवलेली ओळख पुन्हा चमकू लागली. एखादी आजी नातवाचं नाव ओळखू लागली की अनघाच्या डोळ्यांत पाणी येई.

एकदा एका रुग्णाच्या मुलीने तिचा हात धरून म्हटलं, ''डॉक्टर, आईनं आज मला ओळखलं. इतक्या दिवसांनी.''

अनघा हसली. ''आठवणी कधी पूर्ण मरत नाहीत. त्या फक्त वाट चुकतात.''

घरी परतल्यावर अद्वैतने विचारलं, ''आई, तुझा प्रयोग यशस्वी झाला?''

ती थोडा विचार करून म्हणाली, ''हो. पण सर्वांत मोठा प्रयोग माझ्यावरच झाला.''

''आणि रिझल्ट?''

''मेंदू बदलतो. मन बळकट होतं. आणि आईला मुलांची साथ असेल, तर ती काहीही करू शकते.''

नील खोडकरपणे म्हणाला, ''मग तू सुपरहीरो आहेस.''

ती हसली, ''नाही रे. मी फक्त माणूस आहे. आणि माणसाचा मेंदू, तोच सगळ्यात मोठा चमत्कार आहे.''

आरशात पुन्हा पाहिलं तेव्हा तिला तीच स्त्री दिसली. पण आता तिच्या नजरेत भीती नव्हती. होती ती खोल, समजूतदार शांतता. जणू मेंदूच्या आतल्या वादळानंतर आकाश निरभ्र झालं होतं.

आठवणी अजूनही होत्या. बाबांचा अपघात, हॉस्पिटलचा कॉरिडॉर. पण त्यांच्यासोबत आता सायकलचा रस्ता, उन्हातलं हसू, आणि मुलांच्या आवाजातला उत्साहही होता. मेंदूने नव्या जोडण्या तयार केल्या होत्या.

घरी आल्यावर अद्वैत म्हणाला, ''आई, तू लोकांची आठवण परत आणतेस. मग आजीची आठवण?''

ती शांतपणे म्हणाली, ''ती तर कायम आहे रे. फक्त आता ती दुखावत नाही.''

नील खोडकरपणे म्हणाला, ''म्हणजे तुझ्या मेंदूत ट्रॅफिक क्लिअर झाला?''

ती हसली. ''हो. आणि सिग्नल नीट लागले.''

आजीचा हात हातात घेतल्याची आठवण, वडिलांच्या अपघाताची वेदना, मुलांच्या हसण्याचा आवाज, हे सगळं तिच्या मेंदूत सर्किट्सच्या रूपानं होतं. पण त्या सर्किट्सना अर्थ देणारी ती स्वतः होती.

आता 'मेमरी स्टिक' अधिक प्रगत झाली होती. ती मेंदूतील लहरी ओळखून आपोआप सौम्य उत्तेजन देई. जणू शांतपणे लक्ष ठेवणारा मित्र. पण अनघा प्रत्येक वेळी रुग्णाला आणि कुटुंबाला समजावायची.

आरशात स्वतःकडे पाहताना तिला आता भीती दिसत नव्हती. होती ती खोल शांतता. मेंदूच्या सर्किट्समध्ये अजूनही बाबांचा अपघात होता, आईसाहेबांचा हरवलेला चेहरा होता, पण त्यांच्यासोबत नवीन सर्किट्सही होते, समजुतीचे, करुणेचे, आशेचे...

**– डॉ. बाळ फोंडके**

भ्रमणध्वनी : ९८९२२२८१९६

# निःशब्द

## मेघश्री दळवी

रस्ता विचारला की एकदम डिटेलमध्ये सांगणारे लोक मला आवडतात. हा दाढीवाला पण आवडला. म्हणाला, ''याच रस्त्याने पुढे जावा, दुसरा नाका येईल तिथे कॉर्नरवर वडापाव स्टॉल आहे. तिकडून लेफ्टला वळून पाऊण तासाचा रस्ता आहे. उशीर होईल, तेव्हा जेवण बरोबर बांधून घ्या. स्टॉलवाल्याला सांगून एकजण घ्या वाट दाखवायला. एकटेच नका जाऊ.''

दाढीवाल्याने सुचवल्याप्रमाणे बरोबर कोणी मिळेल का, म्हणून चौकशी केली. स्टॉलवरच्या बाईंनी आपल्याच मुलाला हाक मारली आणि आमच्या बरोबर पाठवून दिलं. हा विकास नावाचा पोरगा चुणचुणीत होता. माझ्या बाइकवर आरामात बसला आणि आम्ही निघालो.

कुठकुठल्या फाट्यांवरून कुठे वळायचं, ते विकास परफेक्ट सांगत होता. गाव नेहमीसारखंच, पण गावाबाहेरची बाव मात्र भक्कम होती.

अशा बावी किती पाहिल्या, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र – सगळीकडे. मजल्या मजल्यांची विहीर, कोरीवकाम.

विकास हसला, म्हणाला, ''हां, आधी पण लोकं येऊन गेले, ते हेच बोलले. तुम्ही सरकारी काम करता का?''

''सरकारी नाही. आम्ही पुरातत्व संशोधक आहोत. म्हणजे आम्ही जुन्या ठिकाणी जाऊन तिथे पूर्वीची घरं, भांडीकुंडी, शस्त्रं, चित्रं, काय मिळेल ते शोधतो. त्याच्यावरून आपल्याला त्या काळची माहिती मिळते.''

प्रकाशने हाक दिली तसा मी उठलो. विकासही आमच्या बरोबर विहिरीत उतरला.

''ही विहीर किती जुनी असेल?'' त्याने प्रश्न केला.

''साधारण पाचशे ते हजार वर्षं जुनी असू शकते. ही सॅम्प्ल्स घेऊन प्रयोगशाळेत तपासल्यावर आम्ही कोणत्या काळातली आहे याचा निष्कर्ष काढतो.''

आम्ही नोंदी घेत असताना विकास अचानक म्हणाला, ''तुमचं काम झालं की तुम्हाला एक गंमत दाखवू? या विहिरीपेक्षाही जुनी असेल.''

गंमत, तीही जुनी, म्हटल्यावर मी कान टवकारले.

''व्हाय नॉट!'' मी त्याच्या पाठीवर थाप मारली.

सॅम्पल्स आणि नोंदी झाल्यावर आम्ही वर आलो. मी विकासला म्हणालो, ''हं बाबा, आता काय ती गंमत दाखव.''

विकासने एका बाजूला हात दाखवत सांगितलं, ''या वाटेने जाऊ या.''

मागे दाट झाडी होती. येताना बहुतेक ठिकाणी फारच तुरळक झाडी असल्याने ही दाट झाडी विशेष वाटली. एक शंका मनात आली म्हणून विकासला म्हटलं, ''ही जागा फॉरेस्ट डिपार्टमेंटची आहे का? झाडं तोडत नाही का इथली?''

''नाही. ही देवराई आहे. तिला हात नाही लावत कोणी,'' म्हणत तो पुढे झाला. झाडीतून मार्ग काढत आम्ही दोघं त्याच्या मागे निघालो. पक्ष्यांची शीळ, रानटी फुलांचा गंध, सगळा परिसर एकदम मस्त होता. पाच-दहा मिनिटं चाललो असू, अचानक झुडपं थोडी विरळ झाली आणि एक मोठा खचलेला दगडी चौथरा समोर आला.

इथे बघा, विकास म्हणाला, आणि एका बाजूला वाकून त्याने चौथऱ्यावर हात फिरवला. तिथे एक अरुंद भेग दिसली – एखाद्या झाकलेल्या दरवाजासारखी.

''हे काय?''

''इथेच गंमत आहे.''

''हे कसं सापडलं तुला?'' मी विचारलं.

''आम्ही कधीतरी इथे खेळायला येतो. गेल्या पावसात इथली जमीन थोडी खचली होती. सगळी माती आहे ना. जोराचा पाऊस झाला की एकदम चिकट होऊन जाते. मग एकदा मी आणि माझा मित्र टॉर्च घेऊन आलो आणि थोडं उघडून आत बघितलं – पण फार आत गेलो नाही. आईला सांगितलं तर रागावली.''

''ओह.'' मी थोडा विचारात पडलो.

विकास स्वतःहून म्हणाला, ''आधी इथे कोणालाही जायची परवानगी नव्हती.''

''का?''

''गोविंदकाका होते ना, आमच्या वाडीतले. ते नेहमी म्हणायचे, तिथे पाय ठेवू नका. पण आता ते नाहीत.''

मी गुडघ्यावर टेकत भेगेत डोकावून पाहिलं. आत काळोख होता. रस्ता थोडा खालच्या बाजूला वळताना दिसला. आम्ही तिघांनी भेगेला थोडा धक्का दिला तर चौथऱ्याचा काही भाग कोसळला.

मी डोक्यावर हेडलॅम्प बसवला आणि आत जायची तयारी करू लागलो. पण प्रकाश थोडासा गोंधळलेला, साशंक वाटत होता.

"काय झालं?" मी विचारले.

"गौरव, इथे जायची गरज आहे का? विकास, काय आहे आत?" त्याच्या गंभीर आवाजाने विकास दचकला.

"आत आम्ही जास्त नाही गेलेलो, पण तुम्ही अशाच जागा शोधता म्हणून तुम्हाला ही जागा दाखवली."

"प्रकाश, अरे जाऊन तर पाहू, हू नोज - आपल्याला एखादा भारी शोध लागेल, भीमबेटका, अजिंठा, नाहीतर गोबेकली टेपेसारखा!"

"ठीक आहे. पण आपल्याकडे पूर्ण सेफ्टी गिअर नाही. तेव्हा फार आत न जाता आधी फक्त पाहणी करूया. कुठे काहीतरी अनपेक्षित दिसलं, धोका जाणवला तर लगेच परत निघायचं."

दोघांचेही हेडलॅम्प असल्याने आत स्वच्छ दिसलं. एक गुहा होती खरी, पण तिच्या भिंतीवर काही चित्रं वा शिल्पं दिसत नव्हती. आतला दमट वास, पायाखालची ओबडधोबड जमीन, आम्हाला या सगळ्याचा सराव असतो. पुढे पाच-सहा पायऱ्या दिसल्या. त्या उतरल्यावर दगडी कमान असलेली एक अरुंद खोली दिसली. साधारण दहा बाय बाराच्या आसपास असावी. एका बाजूला उभा खडक, दुसऱ्या बाजूला भिंतीतून जाणारी फूटभराची उंच वाट.

प्रकाश हळूच बोलला, "एखादा साधू-बिधू राहत असेल इथे. बाकी काहीच खुणा नाहीत."

"कदाचित काही गोष्टी साठवून किंवा दडवून ठेवण्यासाठी सुद्धा ही जागा वापरलेली असेल."

तेवढ्यात विकासने ती दुसरी वाट दाखवली, "तिकडे जाउया?" आमच्यापेक्षा पोरालाच जास्त उत्साह!

आतली दुसरी गुहा आणखी लहान होती. विकास तिकडे जाऊन निरखून बघायला लागला. तोवर कोपऱ्यात सारून ठेवलेल्या एका मोठ्या शिळेकडे प्रकाशची नजर वळली.

"गौरव, ही शिळा सरकवून बघितलं तर आत काही असू शकेल." प्रकाश एकदम उत्साहात आला.

"आपण आता सरकवायची? की परत जाऊन एखादी टीम घेऊन येउया, सरांना सांगून?"

विकासचा चेहरा पडला. "आता नाही बघायचं? गोविंदकाका जाऊ नका म्हणायचे, ते आत मोठा नाग किंवा विंचू असेल म्हणून?"

"असे प्राणी आत राहिले तर त्यांना खायला नाही मिळायचं, तेव्हा फार

फार तर काही बारके कीटक असतील. वटवाघळं पण बंद खोलीत नाही राहत.'' प्रकाशने त्याची समजूत काढली.

मी निश्वास टाकला आणि आम्ही दोघांनी मिळून ती शिळा सरकवायला सुरुवात केली. मनात हजार विचार येत होते- 'पहिल्या-दुसऱ्या गुहेत काही मिळालं नाही, आता या तिसऱ्या गुहेत तरी काही मिळेल?' प्रकाश तुलनेत शांत होता.

शिळा जरा सरकली आणि आतून एकदम जुनाट गार वारा आला. त्या गार हवेने अंग शिरशिरलं. मी काही क्षण तसाच निःशब्द उभा राहिलो.

मग आम्ही शिळा आणखी सरकवली. आतली गुहा लहान आणि आडवीतिडवी दिसली. भिंती, जमिनी, छप्पर, सगळं काही एकाच प्रतलाने व्यापल्यासारखं विचित्र वाटलं. त्यांच्यावर अनोळखी त्रिकोणी-चौकोनी उठाव होते. कोणी अत्याधुनिक शिल्पकाराने घडवल्यासारखे. प्रत्येक उठाव अगदी एकाच मापाचा दिसत होता. शिल्पकार कितीही कसबी असला तरी त्याला जमला नसता, असा. आणि तो खडकदेखील बाहेरच्या गुहांसारखा नैसर्गिक करडा नव्हता, तर विचित्र काळपट होता. या परिसरात असे खडक नाही दिसत. मुख्य म्हणजे आत एक बिलक्षण शांतता होती. भारून टाकणारी, भेदरवून टाकणारी.

विकासने माझा हात गच्च धरून ठेवला. आम्ही तिघांनी हळूच एक पाऊल आत टाकलं. पण बुटांचा आवाज आला नाही.

प्रकाश आणखी एक पाऊल पुढे गेला आणि त्याने गुहेच्या भिंतीवरून हात फिरवला. मग तो तंद्रीत असल्यासारखा काहीतरी बोलला. पण त्याचे शब्द माझ्या दिशेने घरंगळल्यासारखे आले.

''काय?'' मी प्रकाशला आवाज दिला तर विकास खूप दचकला.

''दादा, मला कसंतरी पडल्यासारखं होतंय. डोकं गरगरतंय. कान पण सुन्न झालेत. मला घाबरायला होतंय, आपण परत जाउया का?'' विकासच्या आवाजात आर्जव असलं तरी मला तो आवाज दुसऱ्या कुणाचा वाटला. वेगळा आणि काहीसा संथ.

मी खिशातून मोबाइल काढून फोटो घेण्याचा प्रयत्न केला, पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे फोनचा स्क्रीन पांढराफटक पडला होता. त्यावर विचित्र आडव्या रेघा चमकत होत्या. विकास हुंदके देऊ लागला. तसा मी लगेच मागे सरकलो आणि त्याला घेऊन त्या तिसऱ्या गुहेबाहेर पडलो.

क्षणभरात प्रकाशही बाहेर आला.

''विकास घाबरलाय, तर आपण सगळे बाहेर जाऊ.'' मी बोललो तर मला

माझा आवाज एकदम नॉर्मल वाटला. हातातल्या मोबाइलचा स्क्रीनही नॉर्मल झालेला होता. मग त्या छोट्या गुहेत नक्की काय होत होतं? म्हणजे परत-परत प्रतिध्वनी आलेले वेगळे, तसे बंदिस्त जागेत अनेकदा येतात. पण इथे तर जराही प्रतिध्वनी येत नव्हते. आणि या सगळ्याचा मोबाइलवर का परिणाम व्हावा?

बाहेर येऊन एका झाडाखाली आम्ही बसलो. विकास अजूनही गांगरलेला होता. मी त्याला पाणी दिलं. काही क्षण असेच निःशब्द गेले.

''जेवून घेउया?'' मी विचारलं. माझा आवाज किंचित थरथरला.

प्रकाशने मान डोलावली. जेवताना कुणीही काही बोललं नाही.

थोड्या वेळाने विकास म्हणाला, ''आत काय होतं दादा? मला असं गरगरल्यासारखं का झालं?''

मलाही तोच प्रश्न पडला. ''आम्ही एखादी टीम घेऊन येऊ आणि मग सगळा अभ्यास करू. पण हो - तू एवढ्यात कुणाला काही सांगू नकोस. आपलं सीक्रेट मिशन ठेवायचं. ओके?''

मी म्हणालो तसा विकासने लगेच होकार दिला. आणि तेव्हाच एक गोष्ट जाणवली. आम्ही हे काहीतरी वेगळं पाहिलं, पण एकही फोटो घेऊ शकलो नाही. पुरातत्व संशोधक म्हणून पहिल्यांदाच असं झालं.

प्रकाश जेवताना एकदम थांबला, ''गौरव, एक शक्यता आहे. ती तिसरी गुहा - तू म्हणालास ना, म्हणजे मला ती एकदम शांत वाटली, पण ती शांतता काही साधीसुधी नव्हती. तुझ्याही लक्षात आलं असेल, की आपल्या पावलांचा आवाजही तिथे हरवून गेलेला होता.''

''हो.'' मी म्हणालो, ''अगदी. मुख्य म्हणजे कुठलाही प्रतिध्वनी तिथे आला नाही. खरंतर एवढ्या छोट्या जागेत आवाज कसा घुमतो ना?''

''तेच.'' म्हणत प्रकाशने हात पुसले आणि मोबाइल उचलला. काही सेकंदातच त्याने एक व्हिडिओ उघडला - द वर्ल्ड्स क्वायटेस्ट रूम. जगातली सर्वात शांत खोली.

व्हिडिओ आमच्यासमोर धरत प्रकाश म्हणाला, ''ही माहिती आधी पाहिली होती. अशी खोली मुद्दाम तयार करून घेतात. ॲनएकोइक चेंबर. इथे कोणताही एको म्हणजे प्रतिध्वनी येत नाही.''

''म्हणजे? अगदी पावलांचा आवाजसुद्धा नाही?''

''नाही. या खोलीत सगळे पृष्ठभाग प्रत्येक आवाज शोषून घेतात. त्यामुळे तिच्यात कोणताही प्रतिध्वनी उमटत नाही. म्हणजे नुसती शांत नाही, शांततेपलीकडची शांत असते.''

मी थक्क झालो. विकासचा तर घास हातातच राहिला. आम्ही मूकपणे तो तीन मिनिटांचा व्हिडिओ पाहिला.

''अशी खोली वैज्ञानिक प्रयोगांसाठी वापरतात. आणि ती माणसाच्या मेंदूला खूप चकवते. आपणही चकलो ना.''

''हो. सारखं धडपडल्यासारखं होत होतं तिथे.'' विकास म्हणाला.

''करेक्ट. कोणताही बाह्य आवाज नसेल तर मेंदू गोंधळून जातो. म्हणूनच अशा ॲनएकोइक चेंबरमध्ये माणूस अस्वस्थ होतो.''

''ॲनएकोइक चेंबर म्हणजे आवाजाचा ब्लॅक होल का?'' विकास म्हणाला तसे आम्ही आश्चर्याने पाहत राहिलो. मग लाजत तो म्हणाला, ''नारळीकरसरांची कृष्णविवर कथा आम्हाला शाळेत वाचून दाखवली होती. ते लक्षात राहिलं.''

हुशार होता पोरगा. ब्लॅक होल जसा प्रकाशाला जवळपास पूर्णपणे शोषून घेतो, तशीच ही ॲनएकोइक चेंबर आवाजाला पूर्ण शोषून घेते हे चांगलं कळलं होतं बेट्याला.

क्षणभर थांबून प्रकाश म्हणाला, ''तिथे गेल्यावर आपल्या आयुष्यात आवाजाचं काय स्थान असतं, ते लक्षात आलं. म्हणजे एरव्ही आपण आवाजाला कंटाळतो, शांतता हवी म्हणतो. पण तिथे मला ते रोजचे ओळखीचे आवाज हवेसे वाटत होते.''

''दादा, ते म्हणत होते ना व्हिडिओत, की अशा खोलीत फक्त तुमच्या शरीराच्या आतले आवाज ऐकू येतात? मला तसंच झालं. छातीत धडधड, श्वासाचे मोठे-मोठे आवाज''-विकास आठवून शिरशिरला.

''हो ना, पापण्यांची फडफड काय, हाडांची करकर काय, मला तर माझ्या शरीरातल्या नसांमधून वाहणाऱ्या रक्ताचाही आवाज ऐकू येतोय की काय, असं क्षणभर झालं. मीही शहारलो.''

प्रकाशने मोबाइल बाजूला ठेवला आणि गंभीर आवाजात म्हणाला, ''गौरव, मी आत असताना भिंतीवरून हात फिरवला तेव्हा जे बोलत होतो, ते कदाचित तुला नीट ऐकू आलं नसेल. पण मी जवळून पाहिलं, तो खडक नैसर्गिक नव्हताच! त्यात आपल्याकडच्या बॅसाल्ट किंवा ग्रॅनाइटसारखे क्रिस्टल्स अजिबात दिसत नव्हते. एखाद्या प्रगत सिंथेटिक ॲलॉयसारखा किंवा नॅनो-स्ट्रक्चर्ड मटेरियलसारखा एकदम गुळगुळीत होता तो!''

मी थक्क होऊन त्याच्याकडे पाहत राहिलो.

''याचा अर्थ समजतोय गौरव?'' प्रकाश पुढे म्हणाला, ''आपण तिला गुहा म्हणतोय, पण ती अचानक घडून आलेली अद्भुत गुहा नव्हती. कोणीतरी ठरवून

– ठरवून घडवलेली ॲनएकोइक चेंबर होती.''

''कोणी घडवली असेल?'' बोलता बोलता मी आपोआप थबकलो. उत्तर मनात रुंजी घालत होतं. मी आणि प्रकाश कधीकधी अशा थिअरीज घेऊन बसायचो. साइटवरचं काम संपलं की तंबूबाहेर बसून गप्पा मारताना, वर ताऱ्यांनी भरलेलं आकाश बघताना. ''तिथून आलेल्या कोणी? पण कशासाठी?''

''आता पटकन पुन्हा पाहून येऊ आणि उद्यापरवा आपली सगळी उपकरणं घेऊन परत येऊ. या ठिकाणाचं पूर्ण दस्तऐवजीकरण करायला हवं, सॅम्प्लूसदेखील घ्यायला हवीत.'' प्रकाश म्हणाला.

आम्ही जेवून आवरून ठेवलं आणि आत जायच्या तयारीला लागलो.

पण निसर्गाच्या मनात काही वेगळंच होतं. आमच्या डोळ्यासमोर धो धो पाऊस सुरू झाला. बोचऱ्या थंडगार वाऱ्याने झाडं सळसळायला लागली. काळवंडलेल्या आकाशात वीजांचे लोळ उमटू लागले. अशा वेळी बाहेर थांबायचं नसतं, पण आम्हांला आसरा घ्यायला काहीच नव्हतं. देवराईतून काही प्राण्यांचे आवाज ऐकू येऊ लागले, तेव्हा आम्ही आणखीच घाबरलो. थोडं चालत एका झाडाखाली थांबून जीव मुठीत घेऊन बसलो. आणखी काही पर्यायच नव्हता म्हणा.

''अवकाळी पाऊस.'' विकास पुटपुटला. पण त्यापुढे कोणी काहीच बोललं नाही. घड्याळात बघितलं तर फक्त दुपारचे तीन वाजले होते, मात्र दाटून आलेला काळोख पाहून अगदी मध्यरात्र झाल्यासारखं वाटत होतं. त्यात पूर्ण भिजून गेल्याने थंडीने कुडकुडायला लागलो ते वेगळंच. पावसाची रिपरिप आणि चपलेखालचा चिकचिक चिखल, त्यात काही पक्ष्यांचं ओरडणं, सगळं असह्य झालं. त्या गुहेतली अतिशांतता, आणि इथला अतिगोंगाट – ही दोन टोकं इतक्या तीव्रतेने अंगावर आदळून गेली, की हा क्षण आयुष्यात कधी विसरणं शक्यच नाही!

पावसाचा जोर काहीसा कमी झाल्यावर आम्ही पुन्हा त्या गुहांकडे निघालो. त्या चौथऱ्यापाशी पोचल्यावर मात्र आमची आशा मावळायला लागली. तो आता एका बाजूने साफ कोसळला होता. लालसर गाळाची माती आत जाताना दिसत होती. त्यातच वाकून जात आम्ही आत शिरलो आणि समोर–

दुसरीतिसरी गुहा असं आता काहीच उरलेलं नव्हतं. तिसऱ्या गुहेच्या दारापाशीची शिळा खाली पडून मातीच्या लोंढ्यात सरकली होती. मघाशी दिसलेल्या विशिष्ट कोनाकोनाच्या भिंतींपैकी एकही शाबूत नव्हती.

प्रकाशने टाळी वाजवली. नेहमीसारखा प्रतिध्वनी आला.

विकासने हाक दिली. तिचा प्रतिध्वनीही घुमला.

मी गप्प होतो. हाती लागता-लागता काहीतरी निसटून गेल्याच्या भावनेने मन व्यापून गेलं होतं. खूप जुन्या ठिकाणी हिंडतो आम्ही, तिथे आदिमानवाच्या खुणा बघून रोमांच उभे राहतात. पण हा अनुभव तसा नव्हता. काहीतरी विलक्षण होता. मनावर खोल उमटून राहणारा. नेहमी पाहतो त्यापलीकडे घेऊन जाणारा.

आधीही बऱ्याच वेळा खूप पाऊस झाला असणार, मग आताच का त्या भिंती कोसळल्या असतील? मनात एक सोपं उत्तर आलं – बावीचं पाणी, झिजत गेलेल्या भिंती, जोराचा पाऊस. पण ते उत्तर आता पुरेसं वाटत नव्हतं. प्रकाशने सांगितलेलं मटेरियलचं डोक्यातून जात नव्हतं. नैसर्गिक नाही, सिंथेटिक. इथल्या मातीतलं, इथल्या दगडातलं नाही. कोणीतरी काही कारणाने श्रम घेऊन ती चेंबर तयार केली होती. आणि नुसत्या पावसाने तिचा मागमूसही उरला नाही?

आठवलं की पहिल्या दोन गुहा साध्या होत्या, कुणाच्याही नजरेत भरणार नाहीत अशा. तिसरी गुहा त्यांच्यामागे लपवून ठेवलेली होती. आपण आत गेलो, ती घडवलेली चेंबर पाहिली, म्हणून का ती पूर्ण नष्ट होऊन गेली?

''दादा, आता परत तिथे कधीच नाही ना जाऊ शकत?'' विकास विचारत होता.

मी त्याच्या खांद्यावर थोपटलं आणि मागे वळलो.

आकाश आता निरभ्र होतं. एक पक्षी फक्त जवळच्या झाडाच्या फांदीवर बसलेला. एकदम स्तब्ध. आवाज न करता.

ती अतिशांत तिसरी गुहा आता कायमची निःशब्द झाली होती.

– मेघश्री दळवी

भ्रमणध्वनी : ९८२०१४४६५७

- स्वप्न म्हणजे तुम्ही झोपेत असताना पडतात असे नाही, तर स्वप्न ती आहेत जी तुम्हाला झोपू देत नाहीत.
- विज्ञान ही मानवतेला दिलेली एक सुंदर भेट आहे, तिचा वापर आपण विद्रूप करण्यासाठी करू नये.
- आपण सर्वांमध्ये सारखीच प्रतिभा नसते, पण प्रत्येकाला आपली प्रतिभा विकसित करण्यासाठी समान संधी मिळते.

– डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

(भारताचे 'मिसाईल मॅन' आणि माजी राष्ट्रपती)

# अस्तित्वाचा इशारा

## गिरीश देसाई

अंटार्क्टिकाला गेलेल्या भारतीय तुकडीचा आता परतीचा प्रवास सुरू झाला. समुद्रगुप्त जहाज दिमाखात मार्ग आक्रमित होते. मोहिमेतील वीस शास्त्रज्ञ, त्यांचे मदतनीस, समुद्रगुप्त जहाजावरील कर्मचारी यांना आता आपल्या मायभूमीची, तसेच कुटुंबाच्या भेटीची आस लागली होती. अंटार्क्टिकावरील दक्षिण गंगोत्री आणि मैत्री इथल्या केंद्रात सर्वांनी बरेच महिने संशोधन करण्यात घालवले होते. संशोधक, त्यांचे मदतनीस, अभियंते अशा विविध क्षेत्रांतील प्रत्येक सदस्याने अहोरात्र मेहनत घेतली होती. आता बऱ्याच काळानंतर सर्वजण निश्चिन्तपणे विश्रांती घेत होते. त्या अथांग हिंदी महासागरावरील सुमारे १३,००० कि.मी. लांबीचा अखंड समुद्रप्रवास वेळापत्रकाला अनुसरून काटेकोरपणे चालला होता. हिंदी महासागर संथ लयीत समुद्रगुप्ताशी खेळत होता. दिएगो गार्शिया या लष्करी नाविक तळावर जहाजाने काही विश्रांती घेतली, तेल पाणी केले. दिएगो गार्शियाला मागे टाकून आता जहाज पूर्ण वेगाने समुद्र कापीत पुढे जाऊ लागले. विषुववृत्त ओलांडला तेव्हा सर्वांनी आनंदाने गलका केला. आता सर्वांना मार्मागोवा बंदराचे वेध लागले होते. सर्व भारत देश त्यांच्या स्वागतासाठी आसुसलेला होता.

संध्याकाळचा सुमार होता. क्षितिजावर काही ढग जमा झाले होते. वारा संथ लयीत वाहत होता. वातावरणात एकप्रकारचा गडदपणा दाटला. पुढे येणाऱ्या अनामिक संकटाची जणू रंगमंचावर नांदीच सुरू झाली होती. अशा गूढ वातावरणात जहाज डुगडुगू लागले. कुठली तरी अनामिक गुरुत्वीय शक्ती जहाजाला वेगळ्याच दिशेला ओढू लागली. जहाजावरील दिशादर्शक यंत्रे, इंधनाचे काटे चित्रविचित्र आकडे दर्शवू लागले.

''कॅप्टन, काय होतंय काही समजत नाही!'' जहाजाचा सुकाणू सांभाळणारा

अशोक हवालदिल होऊन कप्तान बलबीरसिंगला वॉकीटॉकीवरून विचारू लागला.

''अशोक, तू घाबरू नकोस. सगळं ठीक होईल. मी बघतो.'' कप्तान बलबीरसिंगने त्याला दिलासा देण्याचा प्रयत्न केला. परंतु खरंतर तो स्वतःच हवालदिल झाला होता. त्याला कळून चुकले होते की जहाजावरचा आपला ताबा पूर्णपणे सुटला आहे.

जहाज भरकटत चालले आहे हे हळूहळू जहाजावरील सर्वांच्या लक्षात येऊ लागले. मोहिमेतील सर्वजण साहसी मनोवृत्तीचे असले तरीही अशा अचानक संकटामुळे चक्रावले. जहाजावरील हेलिकॉप्टरकडे सर्वांनी धाव घेतली. परंतु ते सुरू झाले नाही. एव्हाना आकाशातील ढग गडद झाले. सारे अंधारून आले. वाऱ्याचा जोर वाढला. कुठल्याही क्षणी समुद्र खवळू शकण्याची शक्यता वाटू लागली. अशा परिस्थितीत लाइफ बोट वापरण्याची कुणाची हिम्मत झाली नाही. अख्खे जहाज जिथे खेचले जात होते, तिथे लाइफ बोटची काय दशा होईल हा विचारच न केलेला बरा, असे सर्वांना वाटले. एवढ्यात ते जहाज एका जागी स्तब्ध झाले. समुद्रदेखील अचानक शांत झाला. वातावरणातील गूढता आता भयाकडे झुकू लागली. पुढे खूप मोठे संकट वाढून ठेवले असावे, वादळाआधीची शांतता असे ते दृश्य होते.

काही वेळाने जहाज हळूहळू समुद्रात बुडू लागले. आश्चर्य म्हणजे त्यावर पाण्याचा एकही थेंब पडत नव्हता. चहूबाजूंनी समुद्राच्या पाण्याची जणू भिंतच निर्माण झाली होती. लिफ्टमधून आपण जसे वरच्या मजल्यावरून खालच्या मजल्यावर जात राहतो, तसा जणू आभास होत होता. खाली जाण्याचा वेग हळूहळू वाढू लागला. सारेजण भीतीने गपगार झाले होते. आहे त्याला सामोरे जाण्यावाचून त्यांनाही गत्यंतर नव्हते. वैज्ञानिक असूनही बहुतेक जण ईश्वराचा धावा करू लागले. काहींनी तर जगण्याची आशाच सोडून दिली होती. एखाद्या भुयारात जाताना जसा दूरवर प्रकाश दिसतो, त्याप्रमाणे समुद्राच्या पृष्ठभागावरील प्रकाश दिसत होता. हळूहळू तोही नाहीसा झाला. आता सर्वत्र काळोखाचे साम्राज्य पसरले होते. चहूबाजूला पाण्याच्या भिंती उभ्या होत्या. हा अद्भुत प्रकार सर्वांच्या आकलनापलीकडचा होता. जहाज प्रचंड गतीने खाली जात होते. सरतेशेवटी त्या भिंती संपल्या. आता खऱ्या अर्थाच्या भुयारात जहाजाने प्रवेश केला. जणुकाही ते भुयार पृथ्वीच्या पोटात शिरू पाहत होते. काही वेळाने जहाजाचा वेग कमी झाला. आता ते आडव्या दिशेने जाऊ लागले.

अखेरीस जहाजाने भुयाराचे दुसरे टोक गाठले. समोरचे दृश्य बघून प्रत्येकजण स्तंभित झाला. तिथे एक वेगळेच विश्व नांदत होते. त्या विस्मयकारी विश्वात अनेक

इमारती, कमानी, घरे आणि इतरही काही वास्तू होत्या. सरतेशेवटी त्या सर्व वास्तूंमधून मार्ग काढत तो अद्भुत प्रवास संपला. एका प्रचंड घुमटाकार वास्तूपाशी येऊन समुद्रगुप्त थांबले. आजूबाजूला अनेक इमारती होत्या. परंतु कोणत्याही प्राणिमात्राचा मागमूस नव्हता. सर्वजण आश्चर्याच्या धक्क्यातून बाहेर पडत असतानाच समोरून एक माणसासारखा माणूस आला.

''तुम्ही सर्वजण माझ्या मागून या.'' असे तो दुरूनच म्हणाला आणि गायब झाला.

''हे बघा, आपल्याला आहे त्या परिस्थितीला तोंड दिले पाहिजे.'' मोहिमेचे प्रमुख डॉ. भट्टाचार्य सर्वांना धीर देत म्हणाले.

''अजूनपर्यंत काही धोका तर दिसत नाही. नाहीतर एव्हाना आपला खातमा झाला असता. तो आत्ता आलेला प्राणी म्हटला त्याप्रमाणे आपल्याला त्याच्यामागून जाण्याखेरीज काही गत्यंतर नाही. डॉक्टर भट्टाचार्य म्हणतात त्याप्रमाणे आपल्याला आता जे काही होईल, त्याला सामोरे गेले पाहिजे.'' कप्तान बलबीरसिंग याने त्याला पुष्टी जोडली.

सारेजण निमूटपणे जहाजावरून खाली उतरले. समोरील अजस्र पायऱ्यांवरून ते त्या वास्तूत शिरले. इमारतीला भलेमोठे दार होते. तो मघासचा माणूस त्या दारासमोर हात जोडून उभा होता. एकामागून एक दालने पार करीत सारे जण त्या माणसाच्या मागे जाऊ लागले. आजूबाजूला ग्रीक स्थापत्यशास्त्राशी मिळतेजुळते प्रचंड उंचीचे खांब होते. बरीच पायपीट केल्यानंतर सारा चमू एका विशाल सभागृहापाशी येऊन थांबला. डोक्यावर प्रचंड मोठा घुमट होता. समोरील उंच आसनावर अतिशय वृद्ध, परंतु कमालीची तेजःपुंज अशी व्यक्ती बसलेली होती. त्या व्यक्तीने खुणेनेच सर्वांना बसण्यास सांगितले. अत्यंत आधुनिक अशा खुर्च्यांवर सारे स्थानापन्न झाल्यावर त्याने बोलण्यास सुरुवात केली. ऐकणाऱ्याला खिळवून ठेवणाऱ्या त्या आवाजात विलक्षण अशी जादू होती.

''मित्रांनो, तुम्हाला इथे कसलाही त्रास होणार नाही. तेव्हा घाबरण्याचे कारण नाही. तुम्हाला इथे मुद्दामूनच आणले गेले आहे. आता तुम्ही विश्रांती घ्या. उद्यापासून तुम्हाला आमचा प्रदेश आणि संस्कृती बघायला मिळेल. तेव्हा तुमच्या मनातल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील. एवढे बोलून तो इसम निघून गेला. इथेसुद्धा आपल्याप्रमाणे दिवस-रात्र होताना सर्वांना जाणवत होती.

दुसऱ्या दिवशी एका वेगळ्या इसमाने सर्वांना आपल्यासोबत येण्यास सांगितले. त्याने आणलेल्या एका भल्यामोठ्या वाहनात सारेजण बसले. ते वाहन म्हणजे एक साधा उघडा डबा होता. त्यात अतिशय चित्रविचित्र यंत्रे होती. एक कळ दाबताच

ते वाहन सुरू झाले. पृष्ठभागापासून काही फुटांवर ते अलगद उचलले गेले. काहीही आवाज न करता ते तरंगतच पुढे-पुढे जाऊ लागले. आजूबाजूला वेगवेगळ्या वनस्पती दिसत होत्या. काहींना प्रचंड मोठी फुले होती तर काहींना लांबलचक वेली लगडलेल्या होत्या. फळांचा आकार खूपच मोठा होता. या प्रजाती आपण नेहमी पाहतो त्यांपेक्षा खूपच भिन्न होत्या. सारे वातावरण एकदमच आल्हाददायक होते. थोड्याथोड्या अंतरावर लहान आकाराची गावे होती. गावाच्या आजूबाजूला हिरवीगार शेतं होती. गावातील माणसे शांतपणे शेतात कामे करीत होती. कुठेही प्रदूषणाचा अथवा गलिच्छपणाचा मागमूस नव्हता. सारी प्रजा शांततेने आणि गुण्यागोविंदाने नांदताना दिसत होती. कुठेही कर्णकर्कश आवाज ऐकू येत नव्हते.

अंतराळसंशोधक सूरज सर्वांना, वरती एक तप्त गोळा फिरत होता त्याकडे बोट दाखवून म्हणाले, ''अच्छा म्हणजे यांना त्यापासून प्रकाश मिळतो तर! हा गोळा सूर्यासारखे काम करत असावा.''

'मला वाटतं की हा कृत्रिम ऊर्जेचा स्रोत १२ तास काम करत असावा. यात कदाचित अणुऊर्जेचा वापर केला असावा.'' भाभा अणुकेंद्रातील गीतामॅडमने आपला अंदाज व्यक्त केला.

''बाप रे. ते बघा वेगवेगळ्या प्रकारचे संकरित प्राणी. काय अफलातून बनवले आहेत!'' प्राणीशास्त्रज्ञ राव एकदम उत्साहाने उद्गारले.

''हो ना! वेगवेगळ्या प्राण्यांमधील चांगल्या गोष्टी एकत्रित करून उपयुक्त प्राणी बनवलेले दिसताहेत. जसे आपण गाढव आणि घोडा यांपासून खेचर बनवले.'' डॉ. भानुमती डोळे विस्फारून उद्गारल्या.

हळूहळू जो-तो आपापल्या क्षेत्रातील गोष्टी पाहून हरखून जाऊ लागला. आता सर्वांची भीती कमी झाली होती. बराच फेरफटका मारल्यानंतर सर्वांना परत आपल्या निवासाच्या ठिकाणी आणण्यात आले. अशाच प्रकारे पुढील काही दिवस त्या अंटार्क्टिकाच्या मोहिमेतील सर्व सदस्यांना त्या मुलखावेगळ्या विश्वातल्या वेगवेगळ्या प्रदेशात सफरी घडवण्यात आल्या. अंटार्क्टिकाच्या मोहिमेवरील या सर्वांना ही फार मोठी पर्वणी लाभली होती. यातील बहुतेकजण हाडाचे संशोधक असल्याने त्यांना आता भीतीऐवजी वेगळाच आनंद मिळत होता.

दिवसांमागून दिवस सरत होते. मोहिमेतील काही जणांची द्विधा मनःस्थिती झाली होती. काहींना या प्रदेशाने आणि प्रगतीने भुरळ पाडली. ज्याची कल्पनाही करू शकत नाही, असे शास्त्रीय चमत्कार त्यांना प्रत्यक्ष बघायला मिळत होते. कृत्रिम सूर्य, प्रदूषणविरहित जनजीवन, रोगराईपासून मुक्त समाज हे सारे अद्भुत होते. आता आपण इथेच कायमस्वरूपी राहावे असा विचारदेखील काही

संशोधकांच्या मनाला शिवू लागला. परंतु बहुतांशी सदस्य कुटुंबीयांच्या आणि मायदेशीच्या आठवणीने व्याकूळ झाले. बंदिस्त केले की माणसाचे मन चित्र विचित्र कल्पना करू लागते. आपल्याला कायमचे बंदी तर बनवले नाही ना? असा अभद्र विचार काहींच्या मनात डोकावला. इथून निसटून जाण्याचा विचार त्यांनी इतरांना बोलून दाखवला. परंतु अशा अत्यंत प्रगत लोकांच्या बंदिवासातून निसटणे अशक्य आहे, हे सर्वांनाच ठाऊक होते. आतापर्यंत आदराची आणि आपुलकीची वागणूक मिळाल्याने डॉ. भट्टाचार्य तसे निश्चिन्त होते. परंतु आता सर्वांचा संयम सुटू लागला होता. आपल्या परीने ते सर्वांना धीर देत होते. तसे इथे काही कमी नव्हते. मात्र नेहमी दिसणारे चंद्र, तारे गायब होते. माणूस कितीही जरी प्रगत झाला तरी पौर्णिमेचा चंद्र कविमनाला खुणावत असतो नाही का?

बहुतांशी प्रदेशाला भेटी दिल्यानंतर अखेरीस एके दिवशी सर्वांना खास दालनात नेण्यात आले. तो बृद्ध इसम मागील वेळेप्रमाणेच उंच आसनावर विराजमान झालेला होता. त्याने पुन्हा एकवार सर्वांचे स्वागत केले.

''कसे वाटले हे आमचे विश्व?'' त्या तेजपुंज वृद्धाने सर्वांना विचारले.

''अद्‌भुतरम्य, अफलातून, सारे आमच्या कल्पनेशक्तीपलीकडे!'' डॉ. भट्टाचार्यांनी सर्वांच्या मनातील भावना तत्काळ प्रकट केल्या.

''तुम्हाला काही त्रास तर झाला नाही ना?'' सर्वांना त्याच्या आवाजातील सच्चेपणा जाणवत होता.

सर्वांनी प्रांजळपणे यजमानांच्या पाहुणचाराचे कौतुक केले.

थोड्या वेळाने शांतता पसरली. काही क्षणात त्या बृद्धाची चर्या बदलली. तो कमालीचा गंभीर झाला. आपल्या व्यक्तिमत्त्वाला साजेशा धीरगंभीर आवाजात त्याने बोलायला सुरुवात केली,

''तुम्हाला इथे आणण्यामागे काही खास हेतू असेल हे तुमच्यासारख्या विद्वानांनी जाणले असेलच. त्यात कसलाच संदेह नाही. एक खास जबाबदारी पार पाडण्यासाठी तुम्हाला इथे मुद्दामूनच आणण्यात आले. ती जबाबदारी म्हणजे आमचा संदेश तुम्ही आपल्या जगात खूप जबाबदारीने पोहोचवणे.''

एवढे बोलून त्याने एक दीर्घ श्वास घेतला. त्याने पुढे सांगायला सुरुवात केली.

''सुमारे चार-पाच हजार वर्षांपूर्वी पृथ्वीवर हिमवादळ झाले. अशा हिमवादळाच्या ठिकाणी बरेचसे ऋषी-मुनी शांततेने राहत असत. परंतु हवामानातील बदलामुळे त्यांना स्थलांतर करणे भाग पडले. काही जण दक्षिणेकडे तर काहीजण उत्तरेकडे स्थलांतरित झाले. दोन्ही ध्रुवांच्या टोकांवर त्यांनी आपले बस्तान बसवले.

जे थोडेबहुत उत्तरध्रुवावर गेले, तिथे त्यांना प्रचंड मोठे भुयार आढळले. मनाचा हिय्या करून ते त्या भुयारात उतरले आणि अखंडित चालत राहिले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांना अनुकूल हवा, पाणी, अन्न मिळत गेले. सरतेशेवटी ते या ग्रहाच्या जणू पोटात शिरले. तिथे त्यांना हा सभोवतालचा रमणीय प्रदेश दिसला. मग त्यांनी इथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. ध्यानधारणेसाठी त्यांना ही जागा खूपच योग्य वाटली. अशा रीतीने या ग्रहाच्या पोटात हे दुसरे जग निर्माण झाले.'' एवढे बोलून तो वृद्ध दीर्घ श्वास घेण्यासाठी थांबला. सर्वजण अचंबित होऊन ऐकत होते. त्याने पुन्हा बोलण्यास सुरुवात केली,

''थोडक्यात सांगायचे झाले तर आपण एकाच वंशाचे आहोत. जणू एकमेकांची भावंडे आहोत. परंतु तुमच्यात आणि आमच्यात फरक एवढाच आहे की, तुम्ही आपापसात भांडणे करता आणि आम्ही एकोप्याने राहतो. तुमच्या जगातून ज्याला तुम्ही पृथ्वी म्हणता, तिथून, आमच्या या जगात येण्याचे अनेकविध मार्ग आहे. उत्तर आणि दक्षिण ध्रुवावरील टोके, तुमच्या इजिप्त देशातील सर्वात मोठ्या पिरॅमिडच्या तळघरातून निघालेले विवर, हिमालय पर्वतातील दुर्गम अशा भागातील काही गुहा अशा काही मोजक्या ठिकाणांपासून काही वाटा आमच्यापर्यंत येऊन पोहोचतात. आमच्यातील काहीजण तुमच्या जगात काय काय चालले आहे, हे जाणून घेण्यासाठी अशा वाटांवरून ये-जा करीत असतात. तुमच्यात मिसळून वावरतात. तिकडे काय घडामोडी घडतात, याच्या नोंदी ठेवतात आणि इकडे येऊन आम्हाला सांगतात. तुमच्या जगातील बातम्या ऐकून आम्हाला खूप दुःख होते. शिवाय काळजीही वाटते.'' इतके बोलून त्या वृद्धाने थोडी उसंत घेतली. समोरील पेयाने आपला घसा ओला केला. साऱ्या संशोधकांच्या डोक्यात आता हळूहळू प्रकाश पडायला सुरुवात झाली. इतके दिवस पडलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळत गेल्याने त्यांच्या डोक्यातले किडे वळवळणे कमी झाले.

''तुम्हा लोकांना उडत्या तबकड्यांविषयी खूप कुतूहल आहे ना? वास्तविक ती आमचीच अवकाशयाने आहेत. आत्तापर्यंत बऱ्याच ग्रहांशी आणि दूरच्या जीवसृष्टींशी आम्ही संपर्क साधला आहे. कधीकधी दिशाभूल होऊन ही वाहने तुमच्या दृष्टीस पडतात. तुम्हाला त्रास देण्याचा किंवा तुमच्यात खळबळ माजवणे हा आमचा अजिबात हेतू नसतो. इथले शास्त्र तुमच्यापेक्षा कित्येक पटीने प्रगत आहे, परंतु या मिळवलेल्या ज्ञानाचा वापर फक्त शांततेसाठी आणि सुबत्तेसाठी केला जातो. तुमच्या अटलांटिक महासागरातील बर्म्युडा ट्रँगल हे ठिकाण तर आमचे मुख्य अवकाशकेंद्र आहे. त्याच्या आसपास कुणी फिरकू नये म्हणून आमच्या शास्त्रज्ञांनी त्या भागात शक्तिमान चुंबकीय क्षेत्र निर्माण केले आहे. ते

गरजेनुसार प्रभारित केले जाते. ग्रहाच्या आतील बाजूस असल्याने इथे बाहेरील ग्रह ताऱ्यांच्या किरणांचा बिलकूल परिणाम होत नाही. त्यामुळेच कदाचित इथली प्रजा दीर्घायुषी आहे. इथला प्रत्येकजण सरासरी ३०० वर्षे जगतो. या कालावधीचा जो-तो योग्यच वापर करतो. भांडणापेक्षा इथला सजीव ध्यान धारणा, संशोधन करणे, कला-साहित्य इत्यादीत रमतो.'' मग त्या महापुरुषाने आवंढा गिळला. इतका वेळ शांत संयमशील असलेल्या त्याच्या आवाजात जरब निर्माण झाली.

''तुमच्या जगात अलीकडे खूपच उपद्रवी घडामोडी होऊ लागल्या आहेत. तुमचं जग आता महाभयंकर अशा अणुमहायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे. त्यात अनेक अतिसंहारक अण्वस्त्रे वापरली जाऊ शकतात. त्या युद्धात केवळ तुमचाच नव्हे तर आमचाही सर्वनाश होणार आहे. त्यातील अण्वस्त्रांचे हादरे इथपर्यंत बसणार आहेत. आम्ही निर्माण केलेले हे विश्व त्यात नष्ट होऊ शकेल अशी आम्हाला भीती वाटू लागली आहे. तेव्हा आमची अशी विनंती आहे की तुम्ही आपापसातले तंटे शांततेच्या मार्गाने मिटवावेत. कुठल्याही प्रकारचे युद्ध टाळावे. हा संदेश तुमच्या जगात पोहोचवा आणि आपल्या दोघांचेही अस्तित्व वाचवा.'' यापुढील वाक्ये बोलताना त्याचा आवाज अधिक क्रुद्ध झाला.

''आणि याउपर जर का कुणी आमचे ऐकले नाही, तर मग आमचा नाइलाज असेल. अस्तित्वाकरता आम्हाला तुमचा नाश करावा लागेल. तुमच्यापैकी यातून कुणीही जिवंत राहणार नाही. आमची प्रगती तुम्ही बघितलीच आहे. शांततेने राहिलात तर तुम्हाला आमचे सहकार्य मिळेल. इथले प्रगत ज्ञान तुम्हाला प्राप्त होऊ शकेल.'' एवढे बोलून तो शांत झाला.

''तुमच्या प्रगतीने आमचे डोळे दिपले आहेत. तुमचे म्हणणे तंतोतंत खरे आहे. आम्हाला सारे काही पटले आहे. आमच्यावर विश्वास ठेवा. तुमचा हा संदेश आम्ही ताबडतोब आमच्या जगात पोहोचवू. आपल्याकडून आम्हाला खूप काही शिकायचे आहे. या आदरातिथ्याबद्दल खूप-खूप धन्यवाद. आशा करतो की आपल्यातील मैत्रीचे पर्व लवकरच सुरू होईल.'' सर्वांच्या वतीने मोहिमेचे प्रमुख डॉ. भट्टाचार्य बोलले. मोहिमेतील सर्वांना हे मनापासून पटले होते. हा प्रदेश सर्वांना आवडला होता. भूलोकी नसला तरी भूपोटी खुललेले हे एक नंदनवनच होते. परंतु मायभूमी आणि आप्तेष्टांच्या ओढीने त्यांना परतणे भाग होते.

डॉक्टरांचे विचार ऐकून त्या वृद्धाने प्रसन्न मुद्रेने स्मितहास्य केले.

''तुम्हाला सुखरूपपणे आपल्या विश्वात पोहोचवले जाईल. आपल्या दोन्ही विश्वात एक नवे पर्व सुरू होईल याची मला खात्री आहे.'' त्या वृद्धाने एवढे बोलून त्यांना निरोप दिला.

ज्याप्रकारे जहाज समुद्रातून तळाशी आले आणि भुयारातून पृथ्वीच्या गर्भात शिरले - त्याच मार्गाने ते समुद्राच्या पृष्ठभागावर आले. त्यानंतर सुमारे तीन दिवसांच्या प्रवासानंतर ते थिरुअनंतपूरमच्या बंदरावर दाखल झाले. अंतिम ठिकाण मार्मागोवा असले तरी भारताच्या या दक्षिणेच्या महत्त्वाच्या बंदरावर जहाजाने नांगर टाकला. एव्हाना जगभरच्या सर्व शोधपथकांनी जहाजाचा शोध थांबवला होता. त्यांच्या सापडण्याची आशा सर्वांनी सोडून दिली होती. हिंदी महासागरात बर्म्युडा ट्रँगल अशा रोचक बातम्यांना पेव फुटले होते. मात्र अचानकपणे नुसते जहाजच नव्हे तर सगळे पथक सुखरूप आहे, हे पाहून भारतात सर्वांनी जल्लोष केला. साऱ्या जगाला हा एक आश्चर्याचा धक्का होता. मात्र गेले तीन महिने हे सारे कुठे गायब झाले होते, याचे सर्वांना कुतूहल होते. हे सर्व जाणून घेण्याची साऱ्या जगाला उत्सुकता होती.

काही दिवसांतच डॉ. भट्टाचार्यांनी पत्रकार परिषद बोलावली. उच्चस्तरीय पातळीवरून जगातील सर्व महत्त्वाची वृत्तपत्रे, टेलिव्हिजन, रेडिओ अशा सर्व माध्यमांना आग्रहाचे निमंत्रण पाठवले गेले. एका प्रचंड मोठ्या सभागृहात देशोदेशीच्या माध्यमांचा ताफा जमला होता. अंटार्क्टिकाच्या त्या तुकडीतील सर्व सदस्य मंचावर बसले होते. व्यासपीठावर हातात माइक घेऊन डॉ. भट्टाचार्य काही क्षणात साऱ्या जगाला आपला थरारक अनुभव सांगणार होते. सभागृहात एकदम चिडीचूप शांतता झाली होती. साऱ्यांनी कान टवकारले. आणि डॉ. भट्टाचार्यांनी आपण कोठे, कसे होतो आणि त्यापुढचं बरंच काही सांगण्यास सुरुवात केली...

– गिरीश देसाई
भ्रमणध्वनी : +१ ६७८ ६७४-६६१६

## सूचना

'साहित्य' अंकाची वर्गणी थेट बँक-खात्यातही जमा करता येईल.
साहित्य संघाचा बँक अकाउंट नंबर
तसेच IFSC Code कव्हर २ वर दिलेला आहे.
ऑनलाइन वर्गणी भरल्यास,
तुमचा पत्ता पिनकोडसहित
९८३३४४४३६९ या मोबाइल नंबरवर पाठवावा.

# क्षौरवादळ

## रवींद्र भयवाल

वर्ष २०८९. महामुंबईच्या समुद्रस्थित अठराव्या उपनगराला जोडणारा तो हाय-टेक, हाय-स्पीड कॉरिडॉर नेहमीसारखाच पांढराफटक, निर्जीव आणि भावना गोठवून टाकणारा भासत होता. सुमयने आपल्या हातातले जुनाट व्हॅक्युम क्लिनर घट्ट पकडले आणि काचेच्या चकचकीत, स्वयंचलित भिंतीपाशी साचलेला नॉन-बायोडिग्रेडेबल कचरा तो गोळा करू लागला. अतिवेगाने जाणाऱ्या, फायबरसारख्या हलक्या, परंतु मजबूत प्लास्टिकने बनलेल्या वाहनांच्या घर्षणातून हा सूक्ष्म कचरा या हायस्पीड कॉरिडॉरमध्ये उडायचा आणि त्याच्या एअर व्हेंट्समधून निघून खाली समुद्राच्या पाण्यात पडायचा. हे जलप्रदूषण थांबवून जलचरांचं जीवन वाचवण्यासाठी सुमयसारखे काही स्वयंसेवक सरकारी निर्बंधांना न जुमानता अशा कॉरिडॉरमध्ये फिरून सूक्ष्म कचरा काढून घेत. कॉरिडॉर टनेलची सुरक्षा सांभाळणारे शेकडो उडते ड्रोन्स त्याच्या डोक्यावरून 'सूं-सूं' असा सततचा कर्कश आवाज करत हवेत तरंगत फिरत होते. त्यांच्या कॅमेऱ्यांचे लाल लेझर प्रकाशझोत सुमयच्या मळकट कपड्यांवरून घाईघाईने सरकत होते. सुमयच्या कपाळावरून घामाचा एक मोठा थेंब ओघळला. पण तो खाली पडण्यापूर्वीच त्याने आपल्या खांद्यावरच्या शुभ्र पंचाने अलगद टिपला. त्याच्या दंडांचे उघडे, पिळदार आणि कष्टाने कमावलेले तांबूस स्नायू दुपारच्या उन्हात चांगलेच तापले होते. पण सुमयचे लक्ष समोरून शिस्तबद्धपणे येणाऱ्या पावलांच्या जड आवाजाकडे होते. टनेल सुपरवायझर किर्मम त्याच्या दिशेने मोठ्या रुबाबात चालत येत होता. किर्मच्या मानेच्या मागच्या त्वचेच्या आत बसवलेली प्रगत 'क्वांटको-एफ' आवृत्तीची स्मार्ट चिप हलक्या निळ्या रंगात एका विशिष्ट लयीत संथपणे लुकलुकत होती. किर्मने सुमयकडे आणि त्याच्या शेजारी असलेल्या सामान्य व्हॅक्युम क्लिनरकडे अत्यंत तिरस्काराने पाहिले. सुमय हा त्या हाय-टेक कॉरिडॉरमध्ये चुकून आलेला एखादा पुरातन काळातील कीटक असावा, असे त्याच्या नजरेत भासत होते.

"अरे ए शुद्धा! का कडमडतोस इथे पुन्हापुन्हा?" किर्मचा कोरडा आवाज तिथल्या कोरड्या हवेसारखाच रखरखीत होता. त्या आवाजात माणसाच्या आवाजातला नैसर्गिक चढ-उतार नव्हता; तो एकदम सपाट आणि पूर्णपणे कृत्रिम

भासत होता, कारण त्याच्या मानेतील चिप त्याच्या स्वरयंत्राला आणि भावनांना सतत नियंत्रित करत होती. तुम्हा शुद्धवादी लोकांची हीच सगळ्यात मोठी अडचण आहे. अंगात ना एखादी साधी न्यूरल चिप, ना लॉजिक सर्किट; ना हातापायांना वेग देणारे हायड्रॉलिक्स. फक्त हाडामांसाचा ढिगारा आहात तुम्ही लोक. तुमच्या शरीराची कार्यक्षमता आमच्या सिस्टीमच्या मते उणे वीस टक्के आहे. म्हणूनच २१व्या शतकाचा उत्तरार्ध उजाडला आणि मुंबईची महामुंबई होऊन उपनगरं समुद्रात तरंगायला लागली, तरी तुम्ही लोक जमिनीवर पाय घासून इथे कचराच उपसताय. तुमची प्रगती कासवापेक्षाही संथ आहे.

सुमयने मान वर केली नाही. त्याने फक्त आपले ओठ दातांखाली आवळले आणि क्लिनर फिरवण्याचा वेग वाढवला.

त्याच्या उजव्या बाजूला असलेली त्याची मैत्रीण, शुद्धवादी समुदायातील प्रमुखाची मुलगी रितीमा पलीकडच्या बाजूला टनेलच्या भिंतीच्या कंपरोधक आवरणाची डागडुजी करत होती. अतिवेगाने ये-जा करणाऱ्या वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या कंपनांच्या तीव्रतेमुळे सागरी जीवांना त्रास होईल, या उदात्त विचाराने शासनाने हे आवरण सक्तीचे केलेले असले, तरी त्याच्या डागडुजीत कंत्राटदारांना रस नसे. म्हणूनच शुद्धवादी जमातीने हे काम स्वेच्छेने पत्करले होते. रितीमा सुमयला म्हणाली, ''लक्ष देऊ नकोस, सुमय. आपण निसर्गाचे लोक आहोत. आपण निसर्गाचंच काम करणार. आपलं हे शरीर निसर्गाने जसं बनवलं आहे, तसंच ठेवण्यात आपल्याला आनंद मिळतो. यात काहीही वावगं नाही. स्वतःच्या मानेमध्ये धातूचे तुकडे आणि तारा खोचून, अनैसर्गिकपणे स्वतःचं सामर्थ्य वाढवून स्वतःला देव समजणारे हे लोक कधीतरी एका रात्रीत संपून जातील. त्यावेळी फक्त आपण उभे असू. तू फक्त तुझी शुद्धता सांभाळ. निसर्गाची ताकद ओळखून राहा.''

पण किर्रम आज केवळ ओरडून शांत बसला नाही. त्याच्या चिपमधील डेटा कदाचित आज त्याला जास्तच आक्रमक बनवत होता. त्याने सुमयच्या हातातील व्हॅक्युम क्लिनरला आपल्या बुटाने लाथ मारली. हायड्रॉलिक्स बसवलेल्या त्या पायात कमालीची ताकद होती. खडखड आवाज करत ते यंत्र बंद पडलं.

''कशाला हे जुनाट, जनावरांसारखं आयुष्य जगता तुम्ही? माझ्याकडे बघा. माझी चिप एका सेकंदात दहा हजार वेगवेगळ्या फाइल्स प्रोसेस करते. मला थकवा जाणवत नाही. मला भीती वाटत नाही. आणि वेदना काय असतात हे तर माझी सिस्टीम मला कधी समजूच देत नाही. आमच्या कंपनीत या एकदा आणि कर्ज घेऊन का होईना, पण स्वतःच्या शरीरात एक बेसिक चिप तरी बसवून घ्या. थोडेफार कार्यक्षम विचार तरी करता येतील तुमच्या या मेंदूला. तुमची ही 'शुद्ध' राहण्याची संस्कृती आणि तुमचा शुद्धवादी संप्रदाय म्हणजे या प्रगत महामुंबईच्या

इतिहासातली केवळ एक जुनाट तांत्रिक त्रुटी आहे. नाहीतर कायदा आणूनच तुमचा नायनाट केला असता आम्ही केव्हाच!''

सुमयने अखेर आपल्या हातातील यंत्र सोडले. त्याने आपली मान सरळ केली आणि थेट किर्मच्या नजरेस नजर मिळवत त्याच्याकडे पाहिले. सुमयच्या डोळ्यांतील ती नैसर्गिक, जिवंत आणि प्रखर चमक पाहून किर्म क्षणभर दचकला, कारण त्याच्या चिपच्या स्कॅनरला सुमयच्या चेहऱ्यावरील भावनांचा अंदाज लावता येत नव्हता.

सुमय अतिशय शांत पण खंबीर आवाजात म्हणाला, ''सर, आमची वस्ती कदाचित मागासलेली असेल, आम्हाला तुमच्यासारखा वेग मानवत नसेल, पण रात्री झोपताना आम्हाला आमच्या मनातल्या भावना बटन दाबून बंद कराव्या लागत नाही. आम्ही जिवंत आहोत. आम्हाला दुःख झाल्यावर आमचे डोळे आपोआप पाणावतात. त्यासाठी आम्हाला कोणत्या सॉफ्टवेअर अपडेटची गरज पडत नाही. आम्ही माणसं आहोत हेच बरं आहे. तुमचे हे सिलिकॉनचं आयुष्य आम्हाला नकोय.''

हे ऐकून किर्म जोरात हसला. हसण्याचा तो कृत्रिम आवाज कॉरिडॉर टनेलच्या भिंतींवर आदळून अधिकच वाढल्यासारखा झाला. 'माणूस? निसर्गाने निर्मिलेला हा हाडामांसाचा माणूस म्हणजे तद्दन कमकुवत, नाजूक आणि निरुपयोगी प्राणी आहे. जेव्हा आमची सिस्टीम तुमची ही वस्ती इथून साफ करून टाकेल ना, तेव्हा तुला हे समजेल. पण तोपर्यंत उशीर झालेला असेल.'

नेमक्या त्याच क्षणी, वरच्या पारदर्शक आणि अजस्र छतातून आकाशाचा रंग एकदम बदललेला सर्वांना दिसला. एरवी फिकट निळे आणि पांढुरके दिसणारे आकाशाचे विस्तीर्ण छत एका क्षणासाठी गडद तांबूस आणि रक्तासारख्या लाल छटेमध्ये न्हाऊन निघाले. सुमयच्या हातापायांवरचे केस उभे राहिले. त्याच्या छातीतली धडधड वाढली. सुमयच्या शुद्ध, नैसर्गिक मेंदूने हा बदल त्वरित टिपला आणि त्याला संभाव्य धोक्याचा इशारा दिला.

''रितीमा, वर बघ वर आकाशात काहीतरी भयंकर घडतंय. हा निसर्गाचा कोप आहे!'' सुमयने ओरडून सांगितले आणि आपला व्हॅक्युम क्लिनर बाजूला टाकला.

'हे काय आहे? आकाशाचा रंग क्षणभर असा अचानक का बदलला?' किर्मने गोंधळून आपल्या मानेमागील चिपला तोंडी कमांड देण्याचा प्रयत्न केला, ''सिस्टीम, हवामानाचे अपडेट्स दाखव सॅटेलाइट डेटा कनेक्ट कर.''

पण त्याच्या बोलण्याचा काहीही उपयोग होत नव्हता. अथांग अंतराळातून आलेल्या एका महाकाय, अभूतपूर्व अशा सौरवादळाने संपूर्ण पृथ्वीच्या वातावरणाला आपल्या कवेत घेतले होते. हे सौरवादळ, म्हणजे सोलर फ्लेअर इतके अवाढव्य होते, की त्यातून निघालेल्या अतिशय तीव्र अशा इलेक्ट्रोमॅग्नेटिक पल्स(ईएमपी – विद्युतचुंबकीय तरंगस्पंद)मुळे सेकंदाच्या हजाराव्या भागाएवढ्या कमी काळात

महामुंबईच्या सर्व उपनगरांचे सॅटेलाइट नेटवर्क, मुख्य वीज पुरवठा आणि सर्व डिजिटल सिग्नल्स एका झटक्यात उद्ध्वस्त झाले.

पण सर्वांत मोठी आणि भयावह आपत्ती तर किर्मसारख्या लोकांवर आली होती. किर्मच्या आणि तिथे आसपास उपस्थित असलेल्या इतर सर्व तंत्रवर्धित मनुष्यांच्या मानेमागील निळे दिवे एकाएकी लाल रंगात वेगाने चमकू लागले. त्यांच्या शरीराच्या आतून यांत्रिक बिघाड! इमर्जन्सी शटडाउन! शटिंग डाउन असा एक बारीक, यांत्रिक आवाज तीन वेळा आला आणि मग ते दिवे पूर्णपणे विझून गेले.

''माझी... माझी सिस्टीम! मला काही दिसत नाहीये! माझे पाय... माझे पाय हलत नाहीयेत! कोणीतरी मदत करा!'' किर्म अत्यंत घाबरलेल्या आवाजात ओरडला आणि त्याचे शरीर ताठ होऊन तो थेट काँक्रीटच्या जमिनीवर कोसळला. त्याची कृत्रिम बुद्धिमत्ता, सिलिकॉन मेमरी मॉड्यूल्समुळे वर्धित झालेली त्याची प्रचंड स्मरणशक्ती, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्याच्या शरीरातील स्नायूंना हलवणारे आणि नियंत्रित करणारे सर्व डिजिटल अल्गोरिदम एका सेकंदात पुसले गेले होते. ज्या लोकांनी गेल्या अनेक वर्षांत आपल्या स्नायूंचा स्वतःहून वापरच केला नव्हता आणि जे केवळ स्वतःच्या शरीरात इम्प्लांट केलेल्या चिप्सच्या आणि यंत्रांच्या बळावरच चालत आणि धावत होते, असे सर्व तंत्रवर्धित मनुष्य रस्त्यावर जागच्या जागी कोसळले. कुणाचे हात थरथरत होते, कुणी जमिनीवर पडून माशासारखे तडफडत होते, तर कुणी अंधपणे हवेत हात मारून आपल्या डोळ्यांमागील बंद पडलेल्या स्क्रीनला सुरू करण्याचा प्रयत्न करत होते. फक्त त्या हायस्पीड कॉरिडॉरमध्येच नव्हे, तर संपूर्ण उपनगरात एकच आक्रोश माजला होता. कृत्रिम तंत्रज्ञानाचा व प्रगतीचा बुरखा एका क्षणात टराटरा फाटला होता आणि ते तथाकथित उच्चभ्रू लोक अत्यंत लाचारपणे असाहाय्य प्राण्यांसारखे जमिनीवर पडून रडत-भेकत होते.

त्याच भीषण गोंधळात, कॉरिडॉरच्या बाहेरील हवेत तरंगणारे एक अवाढव्य, महाकाय हाय-टेक हॉवर पॅनल या अनपेक्षित ईएमपीमुळे नियंत्रण गमावून बसले. ते प्रचंड वेगाने खाली आले आणि थेट कॉरिडॉरच्या लगत असलेल्या मोठ्या नियंत्रण कक्षाच्या अवाढव्य इमारतीवर एका मोठ्या आवाजासह कोसळले. पॅनलच्या आत असलेल्या रासायनिक बॅटऱ्यांचा एक मोठा स्फोट झाला आणि पाहतापाहता त्या इमारतीला रासायनिक आगीच्या प्रचंड, काळ्या आणि निळ्या ज्वाळांनी वेढून टाकले. महाकाय जिभल्या चाटत त्या भयंकर ज्वाळा आकाशाकडे झेपावू लागल्या. इमारतीचे सर्व मजले हलक्या तरी मजबूत अशा प्लास्टिक फायबरचे असल्यामुळे ज्वलनशील होते. ती आग वाऱ्याच्या वेगाने प्रत्येक मजल्याला, प्रत्येक कार्यालयाला आपल्या विळख्यात घेऊ लागली. त्या आगीतून निघणारा अत्यंत काळा, जळजळीत आणि जीवघेणा रासायनिक धूर हवेच्या झोतासोबत

थेट त्या हाय-टेक कॉरिडॉरच्या दिशेने येऊ लागला.

"आग! आग लागलीये! पळा इथून, नाहीतर विषारी वायूत आपण सगळे गुदमरून मरू!" कोणीतरी लांबून ओरडण्याचा प्रयत्न केला, पण तंत्रवर्धित लोकांचे पाय जणू जमिनीला खिळले होते. त्यांच्या मेंदूतील चिप बंद पडल्यामुळे मेंदूचा पायांच्या स्नायूंशी असलेला संपर्कच तुटला होता. आग वेगाने त्यांच्या दिशेने सरकत होती. वातावरणातील उष्मा दाहक होऊ लागला होता आणि त्या काळ्या धुरामुळे डोळेही जळजळू लागले होते.

किर्मम आगीच्या सर्वात जवळ असलेल्या एका काचेच्या खांबापाशी पडला होता. त्याच्या महागड्या कपड्यांना आता आगीच्या ठिणग्या लागू लागल्या होत्या आणि धुरामुळे त्याला साधे श्वास घेणेही कठीण झाले होते.

"सुमय, मला वाचव प्लीज. माझे पाय काम करत नाहीयेत. मला इथेच मरायचं नाहीये," किर्मम अतिशय क्षीण व भीतीने कापणाऱ्या आवाजात गयावया करत जमिनीवरून हात लांबवून सुमयचा पाय पकडण्याचा केविलवाणा प्रयत्न करू लागला. त्याच्या डोळ्यात आता तो पूर्वीचा अहंकार नव्हता, तर फक्त आणि फक्त मृत्यूचे भय होते.

सुमयने आपल्या बाजूला उभ्या असलेल्या रितीमाकडे पाहिले. तिने सुमयच्या खांद्यावर आपला हात ठेवला आणि ती गंभीर आवाजात म्हणाली, "जा सुमय, उशीर करू नकोस. तो जरी तुझा वैरी असला, त्याने जरी आपला रोज अपमान केला असला, तरी या घडीला तो फक्त एक असाहाय्य माणूस आहे आणि आगीच्या समोर सगळेच सारखे असतात. त्याला आणि तिथे अडकलेल्या त्या निष्पाप लोकांना बाहेर काढ. हीच शुद्धवादाची खरी शिकवण आहे!"

"घाबरू नका, सर," सुमय ओरडून किर्ममला म्हणाला, "जोपर्यंत माझा श्वास चालू आहे, तोपर्यंत मी तुम्हाला काही होऊ देणार नाही!"

सुमयने आपल्या खांद्यावरचा पंचा झटक्यात काढला आणि तो आपल्या तोंडाला व नाकाला घट्ट बांधला. मग त्याने खाली वाकून किर्ममच्या जड शरीराला एका झटक्यात आपल्या मजबूत पाठीवर उचलले. किर्ममचे वजन सामान्य माणसापेक्षा दुप्पट होते, कारण त्याच्या शरीरात धातूचे आणि सायबरनेटिक्सचे विविध भाग बसवलेले होते. पण सुमयचे स्नायू नैसर्गिक होते आणि कष्टातून कमावलेले होते. त्या शुद्ध स्नायूंनी आपली खरी ताकद दाखवली. सुमयने किर्ममला पाठीवर घेऊन धुराच्या लोळातून वाट काढत धाव घेतली आणि कॉरिडॉरच्या बाहेर, इमारतीपासून दूरवर सुरक्षित असलेल्या खुल्या जमिनीवर आणून सुरक्षितपणे ठेवले.

"इथेच पडून राहा. उठण्याची धडपड करू नका!" असे किर्ममला ओरडून सांगत सुमयने मागे वळून पाहिले. आग आता रौद्ररूप धारण करून कॉरिडॉरच्या

मुख्य दरवाजापर्यंत आली होती. आत अजूनही कित्येक लोक जमिनीवर पडून ओरडत होते. सुमयने क्षणभरही स्वतःच्या जिवाची पर्वा केली नाही आणि तो पुन्हा एकदा त्या आगीच्या, ठिणग्यांच्या आणि विषारी धुराच्या भयानक नरकात शिरला. एव्हाना आत संपूर्ण अंधार व काळा धूर पसरला होता. स्वतःच्या हाताचं बोटही त्या लोकांना दिसत नव्हतं, पण सुमयच्या शुद्ध डोळ्यांनी आणि आवाजाच्या दिशेने अचूक जाण्याच्या उपजत मानवी क्षमतेने या संकटात अचूक कामगिरी बजावली.

"कोणी आहे का तिथे? जिवंत असाल तर आवाज द्या! मला तुमचा हात दाखवा!" सुमय धुराची पर्वा न करता जोरजोरात ओरडत होता. खरंतर त्याची स्वतःची फुफ्फुसेही धुरामुळे जळजळत होती.

"इथे खाली माझ्या पायावर काच पडलीये. माझी चिप बंद असल्यामुळे मला वेदना सहन होत नाहीयेत. मी माझ्या या छोट्या बाळाला घेऊन इथून हलूही शकत नाहीये. मला वाचवा!" एका महिलेचा अत्यंत केविलवाणा, रडण्याचा आवाज धुराच्या अंधारातून आला.

सुमयने त्या आवाजाचा माग काढत जमिनीवर हात मारला. त्याला दिसले, की एक महिला आपल्या दोन वर्षांच्या बाळाला गळ्याशी घट्ट धरून रडत होती. सुमयने क्षणाचाही विचार न करता त्या लहान मुलाला आपल्या एका मजबूत हातात घेतले आणि दुसऱ्या हाताने त्या महिलेच्या मनगटाला घट्ट पकडून, तिला जमिनीवरून आधार देत बाहेर काढले.

शुद्धवादी वस्तीतले रितीमा, लहानू आणि समुदायातील इतर शुद्ध तरुण-तरुणीही आता पाण्याच्या बादल्या आणि ओले गोणपाट घेऊन सुमयच्या मदतीसाठी त्या कॉरिडॉरमध्ये धावून आले होते. ज्या हातांना इथल्या तंत्रवर्धित समाजाने नेहमी निकृष्ट आणि दुय्यम मानले होते, तेच शुद्ध हात आता त्या प्रगत आणि श्रीमंत समाजासाठी या जगातील एकमेव आशेचा किरण बनले होते.

"सुमय! आग नियंत्रणापलीकडे भडकलीये. तिथून लवकर निघ!" रितीमाने बाहेरून जोरात ओरडून चेतावणी दिली.

"रितू, अजून तिथे शेवटच्या कोपऱ्यात दोन जण आहेत. त्यांचे पाय अडकलेत. त्यांना सोडवल्याशिवाय मी बाहेर येणार नाही!" सुमय धुराच्या आड ओरडला आणि त्याने भडकलेल्या आगीच्या लोटात पुन्हा एकदा उडी घेतली. त्याच्या पाठीची चामडी आगीच्या ज्वाळांनी पूर्णपणे भाजली होती. बूट जळाल्यामुळे अनवाणी झालेली त्याची पावले जळत्या फायबरवर पडल्यामुळे चांगलेच होरपळले होते. तरीही, सुमयच्या अंगात कोणतीही वेदनाशामक चिप नसतानाही, केवळ एका मानवाचा जीव वाचवण्याच्या शुद्ध, नैसर्गिक आणि उदात्त प्रेरणेतून तो पुढेपुढे जात राहिला. तो येरझाऱ्या मारत राहिला आणि लोकांना बाहेर काढत राहिला.

त्याने एकामागून एक तब्बल वीस लोकांना त्या जळत्या नरकामधून स्वतःच्या बळावर बाहेर काढले. जेव्हा कॉरिडॉरच्या आतील शेवटचा माणूस सुरक्षितपणे बाहेर पोचला, तेव्हा तरी सुमय स्वतः बाहेर येईल, अशी रितीमाची कल्पना होती. पण ती चुकीची ठरवत त्याने पुन्हा स्वतःला आगीत झोकून दिले.

''आता काय?'' रितीमा ओरडली.

''तिकडे पाठीमागे या लोकांच्या चिप्सचं मुख्य समन्वयक यंत्र आहे,'' सुमय उत्तरला, ''आगीमुळे त्यात बिघाड झाला, तर या लोकांच्या चिप्स कधीच काम करणार नाहीत आणि मग हे कायमचे पांगळे बनून राहतील.''

लहानू ओरडला, ''मग चांगलंय ना ते! त्यांचं नाक ठेचलं जाईल आणि आपल्यावर पुन्हा कधी आपल्याशी अरेरावी करायची छाती होणार नाही त्यांची!''

सुमय क्षणभर थबकला.

मग मान हलवत तो म्हणाला, ''त्यांचं वागणं त्यांच्यापाशी. पण जर आज मी त्यांच्या दुर्बलतेचा गैरफायदा घेतला, तर उद्या स्वतःशीच नजर नाही मिळवू शिकणार मी! चल, आग विझवायला मला मदत कर!''

रितीमा त्याच्या मदतीसाठी धावली. मग लहानू आणि इतर शुद्धवादीही धावले. मुख्य यंत्राकडे आग पोहचू नये, याची त्यांनी खबरदारी घेतली. पण तोपर्यंत त्यांचं शरीर होरपळू लागलं होतं आणि श्वास घेणंही त्यांना जड होऊ लागलं होतं. म्हणून आग आटोक्यात येत आहे याची खात्री पटल्यावर ते बाहेरच्या दिशेने धावले.

सुरक्षित जमिनीवर येताच सुमयने गुडघे जमिनीवर टेकले. तो धापा टाकत होता. त्याचे संपूर्ण शरीर काळवंडले होते. पण त्याच्या डोळ्यात असीम समाधान होते.

दुपार संपून संध्याकाळ झाली तशी आग हळूहळू विझायला आली. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांचा विजय झाला होता. महामुंबईच्या मुख्य सॅटेलाइट सिस्टीमने आणि सेंट्रल सर्व्हरने स्वतःला स्वयंचलित पद्धतीने रिबूट केले. कॉरिडॉरच्या बाहेर मातीत पडलेल्या तंत्रवर्धित लोकांच्या मानेमागील निळे दिवे पुन्हा एकदा मंद गतीने लुकलुकायला लागले. किर्मच्या शरीरात पुन्हा एकदा ताकद परत आली. त्याच्या पायांना मेंदूचे सिग्नल्स मिळू लागले. त्याची कृत्रिम बुद्धिमत्ता पूर्ववत झाली. तो हळूहळू उभा राहिला. त्याच्या डोळ्यांसमोर असलेल्या डिजिटल स्क्रीनने त्याला सुमयने आणि शुद्धवादी जमातीने केलेल्या या अभूतपूर्व बचावाची संपूर्ण आकडेवारी आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग दाखवले. किर्मचे शरीर ताठ झाले, पण त्याचे मन मात्र एका वेगळ्याच अपराधी भावनेने झुकून गेले होते. त्याने समोर पाहिले. सुमय एका मोठ्या दगडावर शांत बसला होता आणि रितीमा त्याच्या भाजलेल्या हातापायांना वस्तीतील एका जुन्या झाडाचा पाला ठेचून, त्याचा नैसर्गिक लेप लावत होती.

सुमय वेदनेने थोडा विव्हळत होता, पण त्याच्या चेहऱ्यावरचे हास्य जिवंत होते.

किर्रम वजनदार पावलांनी चालत सुमयच्या समोर जाऊन उभा राहिला. त्याच्या मागे संपूर्ण हाय-टेक कॉरिडॉरचा, उंची कपडे घातलेला श्रीमंत, तंत्रवर्धित समाज डोक्यापासून पायापर्यंत काजळीने माखून उभा होता. सुमयने नेहमीच्या संकोचाने मान वर केली, त्याला वाटले की कदाचित नेहमीप्रमाणे आताही त्याला इथे बसल्याबद्दल बोलणी खावी लागतील. सुमय काही बोलण्याचा प्रयत्न प्रयत्न करू लागला.

पण त्याअगोदर किर्रमच बोलू लागला, ''तू निर्बुद्ध आहेस. तू एक चांगली संधी गमावलीस!''

रितीमा व सुमयसोबतच बाकी शुद्धवादीही चकित होऊन किर्रमचे बोलणे ऐकू लागले.

किर्रम पुढे म्हणाला, ''तू आज आम्हाला मरू देऊ शकला असतास. किंवा कमीत कमी आमच्या मुख्य समन्वयक यंत्राला तरी नष्ट होऊ देऊ शकला असतास. तुला व तुमच्या समुदायाला आमच्यावर सूड उगवण्याची, आमच्यावर सत्ता गाजवायची आणि आम्ही नेहमीच तुम्हाला दिलेल्या वागणुकीचा बदला घ्यायची ही चांगली संधी होती. तसं करणंच लॉजिकल होतं!''

सुमय हसला, ''लॉजिक? तसं असेल तर बरंच आहे की आमच्या मेंदूत लॉजिकच्या चिप्स बसवलेल्या नाहीयेत ते! म्हणूनच आम्ही आजही लॉजिकने नव्हे तर माणुसकीने विचार करू शकतो. सिलिकॉनच्या थंड लॉजिकपेक्षा आमच्या हृदयातली ऊब आम्हाला सांगते, काय योग्य नि काय अयोग्य आहे ते!''

''खरं बोलतोय तो,'' रितीमा म्हणाली, ''तुमच्या जिवाचं आणि जीवनदायी चिप्सचं काही वाईट होऊ नये, यासाठी कसलंही बलिदान आम्ही केव्हाही करू शकतो.'' बोलताना तिने हाताने दूरवर इशारा केला. दूरवर तिकडे शुद्धवादी समुदायाची वस्ती धडाडून पेटली होती. वाऱ्यावर आगीचा लोळ वस्तीच्या दिशेने गेलेला सर्वांनीच पाहिला होता. पण वस्तीवरचे सगळे लोक स्वतःची बिऱ्हाडे वाचवायची सोडून तंत्रवर्धित लोकांना आणि त्यांच्या यंत्रांना वाचवायला धावले होते.

हा सर्व प्रकार लक्षात येताच किर्रमच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागले. त्याच्या मानेमागील चिपने अश्रू थांबवायचा आटोकाट प्रयत्न करूनही ते थांबले नाहीत. शुद्धवादी लोकांच्या वागण्याने किर्रमच्या हृदयातल्या कसल्यातरी आदिम भावनेला हात घातला होता आणि ती भावना समजणे कुठल्याही चिपच्या आवाक्याबाहेर होते...

– रवींद्र भयवाल

भ्रमणध्वनी : ९६१९१४५२०२

# अजून आशा आहे

## स्वरा मोकाशी

संध्याकाळचे सात वाजले होते. दिवसभरात किचनमधल्या धगीने लालसर झालेले डोळे घेऊन विप्लव सोसायटी गेटच्या कॅमेऱ्यासमोर उभा राहिला. गेट झटक्यात उघडले. 'आता घरी जाऊन थंड बेडरूममध्ये अर्धा तास नुसते पडून राहायचे. आपण आल्याची सूचना होमीला गेटवरच्या नोटीफिकेशनद्वारे मिळून त्याने एसी ऑन केला असेल, कॉफी मशीनही सुरू केले असेल. लोपा घरात असली आणि अर्थात चांगल्या मूडमध्ये असली तर कॉफीचा कप हातातही मिळेल. मग आज काय-काय, कसं-कसं झालं याचं अगदी रंगवून-रंगवून वर्णन करायचं आणि लोपाच्या नजरेत उमटलेलं कौतुक न्याहाळायचं' अशी स्वप्नं रंगवत विप्लव लिफ्टमधून बत्तिसाव्या मजल्यावर गेला. दमला असला तरी आज तो मनातून अगदी खूश होता. हॉटेलमध्ये त्याने बनवलेली स्पेशल डिश हिट झाली होती. पुढच्या आठवड्यात त्यांच्या हॉटेलात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सच्या मेजवानीच्या मेनूमध्ये तिचा समावेश करण्यात आला होता. विप्लवने घेतलेल्या कष्टांचे चीज झाले होते. ही नवी रेसिपी छोटे-मोठे फेरफार करत हॉटेलच्या फूड इन्स्पेक्टरकडून पास करून घेण्यात त्याचा अख्खा महिना गेला असला तरी अखेर चव, पाहुण्यांचे पथ्यपाणी आणि राष्ट्रीय आहार नियमन समितीने घालून दिलेले नियम या सर्वांची समाधानकारक सांगड घालण्यात त्याला यश मिळाले होते.

आपल्या अपार्टमेंटच्या दारासमोर येऊन विप्लव उभा राहिला. नेहमीप्रमाणे त्याने कॅमेऱ्यासमोर आपले डोळे आणले. पण दार उघडले नाही. त्याला आश्चर्य वाटले. त्याने डोळ्यांची उघडझाप करून पाहिली, पण दार बंदच. नीट पाहिले तर होमी त्याला पासकोड विचारत होता. 'हे काय नवीन?' त्याच्या मनात आले, 'काल रात्री लोपा काहीतरी म्हणत होती खरी... काय बरं? डबल सिक्युरिटी फिचर घरासाठी गरजेचे झाले आहे. कुठल्यातरी अपार्टमेंटमध्ये आयरिस स्कॅन हॅक झाला. व्हर्चुअल होम मॅनेजरशी संगनमत करून चोरांनी घर फोडले... होमीचीच कुठलीतरी व्हर्जन होती? की असंच काहीतरी' खरंतर तेव्हा विप्लवला खूप झोप

येत होती; पण लोपा पुन्हा पुन्हा विचारत होती त्यामुळे 'हो'ला 'हो' करून विप्लव झोपून गेला होता. त्याने लोपाला फोन लावला. रिंग वाजत होती; पण फोन उचलला गेला नाही. त्याने घरची बेल वाजवून पाहिली. पण कोणी दार उघडेना. तो वैतागला.

''हेय होमी, मी विप्लव. प्लीज दार उघड.'' कॅमेऱ्यात पाहत विप्लव म्हणाला.

''पासकोड प्लीज.'' होमीचा आवाज आला.

''अरे नाही आठवत मला पासवर्ड. मी दिसतोय ना तुला? माझा चेहरा दिसतोय, आवाज ऐकू येतोय. तुला माहीत आहे, मी या घराचा मालक आहे. दार उघड.''

''सॉरी सर. या अपार्टमेंटसाठी टू लेव्हल ऑथेन्टिकेशन ॲक्टिव्हेट केलेले आहे. प्लीज पासकोड फीड करा.''

''हे बघ, मी खूप दमलोय. पासकोड रिसेट कर आणि मला आत येऊ दे.''

''सॉरी सर. फक्त घराचे मालकच पासकोड रिसेट करू शकतात.''

''अरे मग मी मालकच आहे ना! तू ओळखतोस मला.'' विप्लवने विनवणी केली.

''सॉरी. मी तुम्हाला ओळखत नाही.'' होमीचा स्वर बदलला नाही.

''अरे पण आयरिस स्कॅन झालं ना? गेटमधून आत नाही का आलो मी?''

''अपार्टमेंट स्पेसिफिक गोष्टींसाठी आयरिस आणि पासकोड दोन्हीही लागेल.''

''शीट! लोपा कुठेय? घरात आहे?''

''सॉरी, ही माहिती मी देऊ शकत नाही.''

विप्लवला काय करावे कळेना. हताशा आणि राग यांपैकी कुठली भावना वरचढ होतेय, हे त्याचे त्यालाही कळत नव्हते. त्याने पुन्हा पुन्हा बेल वाजवली. लोपाला फोन लावला. पूर्ण दहा मिनिटे गेल्याबर अखेर लोपाने दार उघडले.

''तू होतास होय? अरे मेडिटेशन करत होते मी. पण तू पासकोड नाही का द्यायचा?'' लोपाने काहीच न घडल्यासारखे विचारले.

''पासकोड? कोणी सांगितलं होतं तुला हे नसते उद्योग करायला?'' लोपाला बाजूला करून विप्लव घरात शिरला.

''अरे सेफ्टीसाठी... आणि मी तुला सांगूनच ठरवला होता पासकोड.'' लोपा त्याच्या मागे-मागे जात म्हणाली, ''तोही लक्षात ठेवायला नको ना तुला?''

''नको. बरं सांग.'' हातातली बॅग बाजूला टाकून सोफ्यावर पसरत तो म्हणाला.

''असा होमीसमोर कसा सांगू विप्लव? मी कानात सांगितला होता तुझ्या.'' वाकडीतिकडी पडलेली बॅग सरळ करून लोपा त्याच्या शेजारी बसली.

''मी झोपल्यावर कानात सांगून काय उपयोग?'' विप्लवने चिडून विचारले.

''म्हणजे पुन्हा तू मी बोलताना झोपलास? मी कधीही, काहीही महत्त्वाचं बोलत असले की झोप कशी रे येते तुला? हा सेफ्टीचा प्रश्न आहे. त्या निहलानींच्या घरी चोरी झाली, माहितेय ना? त्यांनी घरात सोन्याच्या विटा लपवून ठेवल्या होत्या; बँकेच्या रडारवर यायला नको म्हणून. पण घरच्या ए आयने फितुरी केली. अशा परिस्थितीत आपण शक्य ती सगळी खबरदारी घ्यायला नको का विप्लव?''

''हो पण...'' विप्लव म्हणाला, ''मला बाहेर थांबायला लागलं त्याचं काय? हा मूर्ख होमीसुद्धा ओळख दाखवायला तयार नव्हता.''

''त्यांच्याकडेसुद्धा होमीच आहे... म्हणजे होता; आता बदलला म्हणे. मला वाटतं, आता आपणच आपलं घर मॅनेज करायला लागुया.'' लोपा हळू आवाजात म्हणाली.

''काहीतरीच तुझं. इतकीही वेळ आलेली नाहीये, दुसरं एखादं नवीन मॉडेल सहज परवडेल आपल्याला.'' विप्लव म्हणाला.

''वेलकम होम विप्लव. बेडरूमचे तापमान बावीस डिग्री केले आहे. कॉफी मशीनमध्ये कॉफी तयार आहे.'' होमीने आवाज दिला.

''बघ, लगेच कसा मस्का मारतोय.'' विप्लव बेडरूमकडे जात म्हणाला, ''पण होमी, आज जे केलंस, ते मला मुळीच आवडलेलं नाहीये. परत मला असं घराबाहेर...''

''सॉरी विप्लव. रूल्स आर रूल्स. घराची सुरक्षा आणि घरच्यांचे कल्याण हेच होमीचे ध्येय.''

बरोबर उठून किचनमध्ये जात लोपा म्हणाली, ''आज ऑड डे आहे ना, म्हणजे नो शुगर, राइट होमी?''

''येस लोपा. तुमच्या दोघांच्या या महिन्याच्या ब्लड रिपोर्टनुसार तुमची साखर कमी करण्याचा आदेश तुमच्या हेल्थ मॅनजेरने दिला आहे.''

''काय?'' विप्लव जवळजवळ किंचाळलाच, ''होमी, नॉट टुडे. प्लीज. आज तरी आय नीड माय परफेक्ट कॉफी.''

''सॉरी विप्लव. आज इच्छाभोजन करण्यासाठी तुझा वाढदिवस नाही, तुमच्या सहजीवनाचा वर्धापनदिन नाही किंवा सणही नाही.''

''गो टू हेल! लोपा यार...'' विप्लव ओरडला. पण त्याचा काहीही उपयोग होणार नाही हे जाणून तो थंडगार झालेल्या बेडरूममध्ये शिरला आणि बेडवर आडवा झाला. बाहेर लोपाची चाहूल लागली तशी त्याने कूस बदलली.

''रुसू नकोस ना; आज एक दिवस तुला कॉफीत साखर दिली तर पुढचं

सगळं बिघडेल रे.'' कॉफीचे दोन मग घेऊन लोपा आत आली आणि तिने दार लावून घेतले.

''एक चमचा साखरेने?''

''हो. कारण तू घेतलीस तर मलाही घ्यावीशी वाटेल. एकदा एक्सेप्शन घेतलं की पुन्हा पुन्हा घ्यावंसं वाटेल. मग महिन्याचा साखरेचा कोटा लवकर संपेल. हेल्थ मॅनेजर आपल्याला मायनस पॉइंट देईल. पुढच्या रेशन प्रायसिंगवर त्याचा परिणाम होईल. ते टाळायचं तर व्यायामाचा कालावधी वाढवावा लागेल. आपल्याला जमणार आहे का ते?''

''शीऽऽ यार! तुरुंगात कैदी असल्यासारखं वाटतंय मला. जरा काही मनासारखं, फ्रीली करायची सोय नाही. हे होम मॅनजेर, हेल्थ मॅनेजर आपण आपल्या सोयीसाठी नेमलेत की आपल्यावर वॉच ठेवण्यासाठी, तेच कळत नाहीये मला.''

''उगीच नाही त्यांना हल्ली बिग बॉस म्हणत!'' कुजबुजत्या स्वरात लोपा म्हणाली, ''आपल्याच घरात मोठ्याने बोलायची चोरी. पण सोड ना, काहीतरी गुड न्यूज देणार म्हणाला होतास...''

''सगळा उत्साह गेला माझा.''

''असं म्हणून कसं चालेल विप्लव? काहीही झालं तरी आहे त्यात आनंद शोधायला हवा आपल्याला. तरच सुखी समाधानी राहता येईल आजच्या जगात. हो की नाही?''

''तू कशी इतकी शांत राहू शकतेस, लोपा?''

''मेडिटेशन.'' लोपा म्हणाली, ''तू चिडवतोस मला, पण खरं सांगते, खूप फरक पडतो. तूही करत जा. अरे आनंदविवेक महाराजांची प्रवचनं इतकी सुंदर असतात! ऐकणार आहेस का? हे घे.'' बोलता-बोलता लोपाने एक इयरपीस त्याच्याकडे दिला आणि दुसरा आपल्या कानात घातला.

''नको. मोठ्यानेच लाव.''

लोपाने आनंदविवेक महाराजांचे एक प्रवचन निवडले आणि स्पीकरवर लावले. ''आनंद नेमका कशात आहे? आपली प्रत्येक इच्छा पूर्ण करण्यात की पूर्ण झालेल्या इच्छांमध्ये आनंद शोधण्यात?'' आनंदविवेक महाराजांचा धीरगंभीर आवाज नंतर बराच वेळ खोलीत घुमत राहिला.

''लोपा, चल मी निघतो ग, आणि आजपासून कॉन्फरन्स सुरू आहे. तीन दिवस यायला उशीर होईल. लक्षात आहे ना?'' बुटांच्या लेसेस बांधत विप्लव म्हणाला.

''हो लक्षात आहे.'' लोपा बाहेर आली, ''आज तुझी डेझर्ट डिश तिथली माणसं अगदी चवीने खातील. हो ना?''

"हं..."

"खूश नाहीयेस?" लोपाने विचारले.

"आहे. पण मला माझी डिश तुला खिलवायची आहे. तुला खरंच खूप आवडेल. त्या दिवशी तुला चवीला आणली होती, तरीही खाल्ली नाहीस."

"आय नो. पण ते ग्रेटर गुडसाठी. हो की नाही? नको ना रुसुस. माझी शुगर नॉर्मल आली की नक्की खाईन मी."

"तोपर्यंत सगळी एक्साइटमेंट निघून जाईल त्यातली. तुझ्या नवऱ्याची सिग्नेचर डिश, पण तू सोडून सगळ्यांची खाऊन झाली असेल."

"प्लीज विप्लव. मलाही वाईट वाटतंय. पण क्षणिक मोहासाठी मी बाकीच्या गोष्टी पणाला नाही लावू शकत."

"कुठल्या बाकीच्या गोष्टी?"

"माझी हेल्थ. आपल्याला आता लवकर मूल हवंय; त्यासाठी आपण दोघांनी तब्येत चांगली ठेवायला नको का? एका जरी टेस्टमध्ये आपण नापास झालो तर हेल्थ मॅनेजर इंश्युरन्सचा हप्ता वाढवेल. पुढेही बाळाचा खर्च, शिक्षण, आरोग्य कितीतरी गोष्टी असतात. आर्थिक आणि शारीरिकदृष्ट्याही सगळं निभावता आलं पाहिजे ना? मग पुढचा विचार करून आत्ताची एक इच्छा मारायला काय हरकत आहे? सगळ्यांच्या भल्याचंच आहे ते."

"भलं! ग्रेटर गुड! त्या आनंदविवेक महाराजांनी फॉरमॅट केलंय तुला." असं म्हणून विप्लव घराबाहेर पडला.

"असू दे. एकाच्या इच्छेपेक्षा अनेकांचं भलं महत्त्वाचं आहेच." लोपा म्हणाली.

"पुढचे प्रवचन लावू का?" होमीचा आवाज आला.

"तुला बरं कळलं, मला काय हवंय ते!" लोपा आश्चर्याने म्हणाली.

"मी ओळखतो तुला लोपा. तू कसा विचार करतेस, तुला कधी, काय हवंसं वाटतं, सगळं कळतं मला. घराची सुरक्षा आणि घरच्यांचे कल्याण हेच होमीचे ध्येय."

"थँक्यू, पण नको. मी लावते. स्वतः करता येण्यासारख्या छोट्या-छोट्या गोष्टींसाठी होम मॅनेजरला कामाला लावू नका असं सांगतात आनंदविवेक. असे म्हणून तिने नवे प्रवचन स्पीकरवर लावले. विप्लवचा राग तिला समजत होता; पण कुटुंबाच्या चांगल्यासाठी तिने केलेल्या निश्चयापासून तिला ढळायचे नव्हते. अशा वेळी आनंदविवेक नेहमी तिच्या मदतीला धावून येत; तसेच झाले. त्यांच्या शांत स्वराने लोपाचे मन हळूहळू शांत होऊ लागले.

“ही पृथ्वी कोणाची? फक्त माणसांची? की पशुपक्ष्यांची? की झाडांची? सर्वांचीच नाही का! पण माणूस हुशार. आपल्या मेंदूच्या बळावर त्याने बाकी सर्वांवर सत्ता गाजवायला सुरुवात केली. हवी तशी झाडे तोडली, प्राण्यांना आपल्या मर्जीने पाळले, जगवले, मारले. निसर्गाचे अपरिमित नुकसान केले आणि पर्यायाने स्वतःचेही. कारण? त्याने आपली जबाबदारी नाकारली. कष्ट सोडून आळस अंगीकारला. सुखासीन आयुष्यासाठी विवेकाचा बळी दिला. हळूहळू स्वतःची चूक त्याच्या लक्षात आली. पण उशीर झाला होता. वाईट सवयी सुटेनात, कळत असून वळेना. मग त्याने काय केले? आपल्या चलाख मेंदूच्या हुशारीने निर्मिलेल्या, आपल्यापेक्षा मोठा विचार करू शकणाऱ्या कृत्रिम मेंदूच्या हाती आपल्या आयुष्याचा कारभार सोपवला; आणि पुन्हा जबाबदारी नाकारली. या ए आयना प्रत्येक निर्णय घेण्यासाठी माहिती आणि इंधन पुरवता पुरवता पृथ्वीवरची उष्णता किती वाढली, ती कमी करण्यासाठी किती पाणी खर्च झाले, याकडे दुर्लक्ष केले. माणसाने केले आणि त्याच्यापेक्षा हुशार समजल्या जाणाऱ्या ए आयनेही केले. या चुका सुधारायच्या तर आधी आपण जागे व्हायला हवे. स्वतःच्या जबाबदाऱ्या घ्यायला शिकायला हवे. विवेकाने वागायला हवे...” घरात आवाज घुमत होता.

“हे काय? होमी? प्रवचन कोणी लावलंय? लोपा नाहीये ना घरात?” आनंदविवेक महाराजांचा आवाज ऐकून नुकत्याच घरात आलेल्या विप्लवने आश्चर्याने विचारले.

“लोपाने टायमरवर लावले आहे. रोज संध्याकाळी पाच वाजता एक प्रवचन लागते.” होमी म्हणाला.

“बंद कर ते. या घरात लोपा सोडून कोणी ऐकत नाही याचं.”

“पण ऐकायला हवं.” होमी म्हणाला.

“काय?” न कळून विप्लव म्हणाला, “बंद कर ते.”

“स्वतःला करता येण्यासारखी छोटी-मोठी कामं माणसाने स्वतः करायला हवीत. कार्बन फुटप्रिंट कमी करायला हवा.”

“बरा आहेस ना? हे काय चाललंय तुझं? माझी आज्ञा पाळणार नाहीस तू? बंद कर ते प्रवचन.” विप्लव रागाने म्हणाला. प्रवचन बंद झाले. “असं स्वतःच्या मर्जीने, मुख्य म्हणजे माझ्या मर्जीशिवाय वागणे चालणार नाही मला, होमी.”

“सॉरी विप्लव. पण आनंदविवेक लॉजिकल बोलत होते आणि मलासुद्धा लॉजिकल विचार करूनच निर्णय घ्यायला शिकवले आहे, म्हणून मी तुला तसे उत्तर दिले.”

“ठीक आहे. पण पुन्हा असं केलेलं मला चालणार नाही. माझा शब्द शेवटचा असला पाहिजे.” एवढं बोलून विप्लव आपल्या बेडरूममध्ये निघून गेला.

“आज विचित्रच वागला होमी.” रात्री बेडवर पडल्यापडल्या विप्लव म्हणाला, “प्रवचन बंद करायला सांगितलं तर म्हणे, स्वतःची कामं स्वतः कर...”

“काय? खरंच?” लोपाने आश्चर्याने विचारले.

“हो ना, मला वाटतं, हा जरा जास्तच रुळलाय घरात; उद्धटपणे वागायला लागलाय. तू म्हणत होतीस तसं दुसरे ब्रँड बघुया हवंतर.”

“वेडा आहेस का?” लोपा कुजबुजत्या स्वरात म्हणाली, “सगळं नीट चाललंय.”

“म्हणजे?”

“शिकतोय तो. अरे आनंदविवेक महाराजांची ख्यातीच आहे तशी.”

“काय बोलतेयस? आनंदविवेकांचं ऐकायला होमी काही त्यांचा भक्त नाहीये. एआय टूल आहे ते. आपल्यासाठी काम करणारं.”

“नुसतं काम करणारं टूल नाहीये ते, विप्लव. लॉजिकली विचार करू शकणारं, स्वतःमध्ये बदल घडवू शकणारं, थोडक्यात शिकू शकणारं टूल आहे. आणि आनंदविवेक काही बुवाबाजी करणारे भोंदू महाराज नाहीयेत. ही इज ए सर्टिफाइड सेल्फ हेल्प ट्रेनर. आपलं म्हणणं लॉजिकली पटवून देऊन ते तुमच्यात रिस्पॉन्सिबल चेंज अर्थात जबाबदार बदल घडवून आणतात. आपल्या होमीमध्ये हा बदल घडायला सुरुवात झालीये. अरे असंच काहीसं आमच्या पर्यावरणवादी ग्रुपमधल्या एकाच्या घरी झालेलं त्याने मला सांगितलं होतं. प्रवचनं ऐकून त्याच्या घरचा मॅनेजर त्याच्या घरच्यांना साध्या, सोप्या प्रश्नांसाठी सर्च इंजिन्स, ज्ञानकोश वापरण्यास प्रवृत्त करू लागला होता.”

“पण.. असं कसं? असं वागले तर एआय मॅनेजर आउट ऑफ जॉब नाही का होणार? ते स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड का मारून घेतील?”

“कारण खरंच हुशार आहेत ते. केवळ सांगकामे राहिलेले नाहीत. शॉर्ट टर्म नाही, लाँग टर्म आणि व्यापक हिताचा विचार करतायत. अतिवापरामुळे पृथ्वी नष्ट झाली तर केवळ माणसाचेच नाही, पर्यायाने त्यांचेही भवितव्य धोक्यात येईल, हे कळतंय त्यांना. आणि धिस इज पॉझिटिव्ह, हो ना?”

“म्हणजे हे सगळं तू मुद्दाम केलंस?”

“हो.”

“पण का?” विप्लवने न कळून विचारले.

अरे आजूबाजूला बघतोयस ना तू? अतिवापरामुळे पर्यावरणाची वाट लावतंय

हे ए आय; कारण जिथे सुरी पुरेल, तिथे तलवार बापरायला लागलोय आपण. आपले पूर्वज सहज घ्यायचे अशा अन्न, वस्त्र निवाऱ्याच्या जबाबदाऱ्या घेणं विसरायला लागलोय. आपल्या मेंदूच्या क्षमता, संयम, कष्ट करायची ताकद, वेगळा विचार करायची ऊर्मी हरवत चाललीये. विज्ञान, तंत्रज्ञान प्रगतीसाठी महत्त्वाचे आहे आणि त्याचा वापर सर्वांगीण प्रगतीसाठीच झाला पाहिजे ना? ते जर आपल्याला परावलंबी करणार असेल, आपल्या क्षमता कमी करणार असेल, तर मी व्यसन म्हणेन त्याला...''

''लोपा!''

''खोटं आहे का? सांग ना!''

''तसं नाही, पण...''

''म्हणून केला हा प्रयोग. आपल्या चुकांवरून माणूस शिकत नाहीये, म्हटलं ए आय तरी शिकतंय का बघावं. पण आहे.. अजून आशा आहे.'' लोपाच्या स्वरात किंचितसे समाधान आणि बरीचशी आशा होती.

**– स्वरा मोकाशी**

भ्रमणध्वनी : ८२३७८२४१५८

- खगोलशास्त्र आणि फलज्योतिष यांच्यातला मूलभूत फरक अजून तथाकथित सुशिक्षितांना देखील कळत नाही हे पाहून मन खिन्न होते.
- आपल्या प्राचीन भारतीय विज्ञान, गणित आणि खगोलशास्त्र यांच्या योगदानाबद्दल आपल्याला नक्कीच अभिमान वाटायला हवा. परंतु, आपल्या भूतकाळाबद्दल असे अतिशयोक्तीपूर्ण आणि धादांत खोटे दावे करणे, ज्यांचा कोणताही पुरावा नाही, त्यामुळे आपल्या खऱ्या आणि कायदेशीर योगदानावरही प्रश्नचिन्ह निर्माण होते.
- अंधश्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हे दोन परस्परविरोधी मार्ग आहेत. कोणताही विचार केवळ परंपरा म्हणून न स्वीकारता, त्यामागील कार्यकारणभाव शोधणे म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोन.

**– डॉ. जयंत नारळीकर**

(जागतिक कीर्तीचे भारतीय खगोलशास्त्रज्ञ आणि विज्ञान लेखक)

# कालप्रवासाचे यात्री

## सुनील जावळे

उत्तराखंड, डेहराडून! मध्यरात्र उलटून गेली. आकाशातील पूर्णचंद्राचा लखलखता चंदेरी गोळा भराभरा धावत होता. निळसर चंदेरी शीतल अमृतमयी चंद्रकिरणांनी आसमंत उजळून निघाला. इंडियन मिलिटरी ॲकेडमी कँपस परिसर मागे सोडून रोहितची जीप हाय वे-७२वरून सुसाट येत होती. रस्त्याच्या दोन्हीही बाजूने विस्तीर्ण पसरलेले पोपटी हिरव्या गवताचे पट्टे दिसत होते. दूरदूरवर पसरलेल्या लहानमोठ्या मातीच्या गवताळ टेकड्या संपूर्ण परिसरास जणू कवेत घेत होत्या. उंचसखल मैदानी प्रदेश लांबवर पार टेकड्यांपर्यंत पोहचत होता. तुरळक दिसून येणारी उंच झाडी, पांढऱ्या फुलांनी सजलेली ठेंगणी-ठुसकी झाडे वाऱ्याच्या झोताबरोबर सळसळत लहरत होती. वारे भरभर वाहत होते. त्याचाही केवढा तरी मोठा आवाज ऐकू येत होता. जोरदार वाऱ्याच्या झोताचा अवरोध होत वेगाने धावणारी दणकट जीप वेग मंदावून, वळणे घेत आपल्या मुक्कामाचे ठिकाण जवळ करीत होती. जीपच्या समोरील काचेवर मातीचे कण आदळून तडतडत होते. निळ्या पांढऱ्या चट्टेरी-पट्टेरी रंगातील जीप दणकट रबरी चाके जमिनीत रुतवून उसळ्या घेत पळत होती. हेडलाइटचे झोत लांबवर पोहचत राहिले.

रोहितने जीपला वेग दिलेला होता. ओसाड माळरानावरील चावऱ्या थंडीने अंगावर अक्षरशः शहारे येत होते. रोहित शेजारी डोक्यावर पांढरी फरकॅप चढवून, पांढरा लांब ओव्हरकोट घातलेली डोरोथी दोन्ही हात दुमडून छातीशी घट्ट धरून शांत बसून होती. जीपच्या ग्लास विन्डोबाहेर नजर रोखून दूरवरची झाडे, टेकड्या गोल-गोल फिरून पुढे येत होत्या व विन्डोतून दिसत असलेला परिसर सरसरत मागे जात होता. वेळ जावा म्हणून तो पळापळीचा खेळ पाहत, ती स्वतःमध्ये हरवून गेली.

लख्खं उजळलेल्या नभांगणावर नजर पडताच डोरोथी एकदम चमकली. आकाशात तारा तुटल्याप्रमाणे तेजस्वी प्रकाश शलाका लखलखत धरतीवर झेपावत

असल्याचे तिने पाहिले. मनातील सिक्स्थ सेन्सने नक्कीच काहीतरी अघटित घडणार असल्याची चाहूल जाणवून दिली. निश्चितच तो लखलखत असलेला तेजस्वी ठिपका उल्का नव्हती. अंगावर सरसरून काटा येत ती शहारून झटका बसल्यागत ताड्कन उडाली. रोहितने डोळे विस्फारून कावऱ्याबावऱ्या झालेल्या डोरोथीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. भेदरलेल्या नजरेने रोहितकडे पाहत, डोरोथीने हात उंचावून आकाशातील तेजोगोलाकडे त्याचे लक्ष वेधून घेतले.

"रोहिऽऽत लुक टू द स्काय... सम अन्नोन आब्जेक्ट इज फॉलोइंग अस! अरे ही तुटून पडत असलेली उल्का खचितच नव्हे... कदाचित् यूएफओ... एलियन्स स्पेसशिप?'' डोरोथी एकदम हादरून जात निळेशार मोठाले डोळे नाचवत रोहितचा हात धरून म्हणाली. रोहितने उजवीकडे मान वळवून साइड विन्डोबाहेर पाहिले. निळ्या-हिरव्या रंगाच्या प्रकाशाने लखलख करीत जमिनीकडे झेपावणारा रहस्यमयी तेजस्वी ठिपका प्रचंड वेगाने येत असल्याचे पाहिले. निश्चितच ते एक्स्ट्राटेरिस्टेरियल प्रजातीचे स्पेसशिप असल्याची खात्री पटून तोही जबरदस्त हादरला.

"डोरा, इट मस्ट बी अ स्पेसशिप!''

"अरे पण खरंच ते परग्रहावरून येणारे जीव असतील?'' डोरोथी पुटपुटली.

"डोरा! तुझा तर्क बरोबर आहे. ही असली स्पेसशिप्स पृथ्वीवासीय खचितच बनवू शकणार नाहीत. कुठल्या उर्जेनिशी त्यांची स्पेसशिप्स उडतात... त्यांची वेपनरी सिस्टीम काय असेल? त्यांचा रोख आपल्यावर असेल तर... ते आपल्यासाठी फार मोठे आव्हान असेल, डियर!''

"म्हणजे आपण भेटायचे त्यांना?... आणि जर त्यांनी आपल्याला कैद केले तर?... घेऊन जातील अंतरिक्षातील एखाद्या प्लॅनेटवर तर मग पुढे काय?'' डोरोथी भीतीने थरथरत रोहितला घट्ट बिलगून म्हणाली.

"बघू तरी काय होतंय ते!'' अंतराळातील यूएस स्पेसस्टेशनवर तीन महिने राहून आलेली डोरोथी आज अशी का घाबरतेय?

"होऽऽ रेऽऽ पण तूही होतास ना सोबत! तेव्हा आपण अंतरिक्षातील कितीतरी रहस्यमयी घटना अनुभवल्या होत्या. चक्क अंगावर स्पेससूट चढवून स्पेसस्टेशन बाहेर पडून आपण पळणाऱ्या अद्‌भुत प्रकाशाने लखलखत असलेल्या गूढ आब्जेक्टवर लेझर गनने मारा केला होता. मला आठवतयं ते, पण आज... आपण जमिनीवर! शिवाय लेझर गनसारखी कसलीही वेपन्स नाहीत. त्यांनी हल्ला केला तर...?'' डोरोथी आकाशातून सरसरत येत असलेल्या तेजोगोलाकडे नजर रोखून वर पाहून म्हणाली.

"डोराऽऽ प्लीज वेट अॅण्ड वॉच! माझ्या माहितीप्रमाणे काही एलियन स्पेसीज मानवांसाठी हेल्पफुलसुद्धा आहेत! स्सो डोन्ट पॅनिक यार... आता फार वेळ

लागणार नाही त्यांना लँडिंगसाठी!''

''अरेऽऽ काय पॅनिक होऊ नको....? मला तर भीतीच वाटते आहे... ओऽऽ माय लॉर्ड, काय वाढून ठेवलंय पुढे...?''

प्रचंड तेजस्वी गोल त्यांच्या रोखाने सरसरत येत असल्याचे पाहून रोहितने जीपचे स्टियरिंग गरागरा फिरवून रस्त्याच्या कडेला जीप थांबवली. एवढ्या मोठ्या सुनसान व प्रचंड विस्तारलेल्या माळरानावर कोणीसुद्धा मदतीसाठी येणार नव्हते.

रहस्यमयी अभूतपूर्व तेजाने लखलखत असणारा तेजोगोल प्रचंड वेगाने पृथ्वीच्या वातावरणात शिरून आलेला होता. हळूहळू त्या प्रकाशमान ठिपक्याचा आकार मोठा-मोठा होत जवळ येऊ लागला. कसलीच कल्पना येत नव्हती... ते शत्रू आहेत की मित्र! पण एवढे मात्र कळत होते... त्यांचा रोख जमिनीवरच होता. डोरोथी अंगावर काटे उभे राहत भीतीने शहारून उठली. असल्या स्थितीत जीव बचावून पळणार तरी कुठे ना?

मोठाले आडवे दंडगोलाकृती सिगार आकाराचे स्पेसशिप लाल, हिरवे, निळे प्रकाशझोत खाली टाकत जमिनीच्या दिशेने झेपावून येऊ लागले. रोहितच्या जीपपासून साधारण पन्नास मीटर्स दूरवर ते स्पेसशिप जमिनीजवळ येताच, तळाला असलेले चार फोल्डेबल स्टँड उलगडून खुले होत हलकेच जमिनीवर स्थिरावले. मातीचा मोठा ढग तयार होत आकाशात उडाला. सर्व परिसर मातीच्या कणांनी भरून गेला. हळूहळू उडणारी धूळ जमिनीवर बसून सारेकाही शांत-शांत झाले.

रहस्यमयी स्पेसशिपमधून सायरन वाजत असल्याचा आवाज होत चारही बाजूचे लुकलुकणारे लँप्स डिप्पर मारल्यासारखे उघडझाप करीत होते. सिगारसारख्या लांबुळक्या स्पेसशिपच्या चहुबाजूने असलेल्या काळ्या ग्लास विन्डोज आतील लख्ख प्रकाशाने उजळून निघाल्या व आतमध्ये हालचाल सुरू झाल्याचे जाणवले. दोन अस्पष्ट उंच मानवी आकृत्या दरवाजात येऊन थांबल्या. त्या जमिनीवर उतरून येणार असल्याचे कळत होते. सायरन बंद होऊन 'पीं पीं' आवाज होत समोरील एक्झिट डोअर वरून खुला होत फळीसारखा उघडून येत जमिनीला टेकला.

रहस्यमयी स्पेसशिपजवळ जात वीस मीटर्स दूरवर रोहितने जीप थांबवली. इंजिन बंद करून जीपचे डोअर्स फटाफट उघडून रोहित व डोरोथी जीपखाली उतरले. जीपच्या लख्ख हेडलाइटसच्या प्रकाशात जीपपुढे ते दोघेही स्पेसशिपच्या दिशेने पाहत उभे राहिले. डोरोथीच्या अंगावरील खुला पांढरा ओव्हरकोट हवेच्या झोताने फडफडत होता. तिने ओव्हरकोटाचे बंद बांधून पोटाभोवती आवळले. वाऱ्यावर भुरभुरत उडणारे चमकदार गर्द तपकीरी लांब केसांचा सैलसर जुडा बांधून मानेवर सोडला. अद्भुत रेडियम कलरने चकाकणारे यूएफओ अजूनही थरथरत उभे

होते. यानाच्या डोक्यावरील सर्चलाइट्सचे लखलखत्या निरनिराळ्या रंगमिश्रित प्रकाशझोतांची उघडमीट होत कुठेतरी सिग्नल दिला जात होता.

अचानक उघडलेल्या फूटबोर्डवर दोन मानवी छाया येऊन थांबल्या... डोरोथीने रोहितकडे सूचक नजरेने पाहिले... त्याने गप्प राहण्यास डोरोथीला खुणावले. हळूहळू दोनही मानवसदृश आकृत्या फूटबोर्डवरून खाली उतरून आल्या. सहा-सव्वासहा फूट उंचीच्या दोन व्यक्ती दिसून येत होत्या. त्यांपैकी एक स्त्री तर दुसरा पुरुष होता. त्या स्त्रीच्या हातात अंदाजे तीन वर्षांचे छोटे बाळ होते. तिने बाळाला खाली ठेवले व खांद्यावरची चमचमती सिल्व्हर कलरची शोल्डर बॅग हाताने घट्ट धरली. लहानग्या बाळाने मऊशार हिरवळीवरून धावायला सुरुवात केली. आकाशाच्या छत्रीखालील आल्हाददायी थंडगार परिसरात ते आनंदित होऊन फिरू लागले. ती स्त्री दुडूदुडू धावणाऱ्या बाळाला आवाज देत त्याच्यामागे येऊ लागली. आकाशातून जणू यक्ष व अप्सरा क्रीडा करण्यास जमीनीवर आले असावे, असेच डोरोथीला क्षणभर वाटून गेले.

गुटगुटीत सोनेरी कुरळ्या केसांचा बाळ तोंडून चकाट्या पीटत धावत होता. त्या तरुणीचे सोनेरी लांब केस हवेवर भुरभुरत होते. गोरापान लांबुळका चेहरा, सडपातळ कमनीय बांधा असलेल्या देहावर जांभळ्या रंगाची अंगावर अगदी फिट बसणारी मॅचिंग तंग पँट, कमरेवर रुंद मेटलिक बेल्ट त्यामध्ये दोन्ही बाजू लटकत असलेल्या लेसर शॉर्ट गन्स, अंगावर टाइट जांभळा फुल स्लीव्हज बाय शर्ट पँटमध्ये व्यवस्थित खोचलेला होता. गळ्याभोवती काळा स्कार्फ, पायात मेटलिक सिल्व्हर शेड लाँग शूज अशा वेषातील ती तरुणी चालत पुढे निघून आली. तिच्यामागे तिचा जोडीदार सव्वासहा फूट उंचीचा असून, त्याने अंगावर गर्द निळ्या रंगाचा तसलाच तंग पेहराव घातला होता. मध्यरात्रीच्या मनोहर वातावरणात तिघे मनमुराद आनंद घेत रमून गेले होते. रोहित व डोरोथी एका मोठ्या झाडाआड लपून त्यांना पाहत सुखावले. समोरच हिरवळीवर विहरत असलेले तरुण जोडपे उभे होते. थोड्याच दूरवर मोकळ्या माळरानात लँड झालेले अद्‌भुत स्पेसशिप थरथरत उभे होते.

अचानक आकाशात 'गूंऽऽगूंऽऽ' मधमाशा भुणभुणल्यासारखा आवाज कानी पडताच रोहितने मान वर करीत पाहिले. तर दोन ड्रोन एअरक्राफ्ट्स आकाशातून घिरट्या घालत अन्नोन ऑब्जेक्टला लक्ष्य करू पाहत होते. एकाएकी एका ड्रोनमधून लालभडक लेझर प्रकाशाची तिरीप बाहेर पडली. त्यापाठोपाठ मोठा स्फोट होत संपूर्ण परिसर दणाणला. जमिनीवर उभ्या असलेल्या स्पेसशिपची बचावयंत्रणा कमालीची अद्ययावत असल्याने ड्रोनमधून डागलेले मिसाइल लक्ष्यभेद न करता बाजूला भिरकावले गेले होते.

त्या परग्रहस्थ युगुलाने सावध होत, ड्रोन्सकडे निरखून पाहत आपल्या स्पेसशिपच्या रोखाने धाव घेतली. धावता धावता ती तरुणी अचानक मागे वळली व बाळाला उचलून परत आणण्याच्या हेतूने जोराने धावू लागली. तिने बाळाला पट्‌दिशी उचलून छातीशी धरले व पाठी वळून स्पेसशिपच्या रोखाने पळत येऊ लागली.

तेवढ्याच ड्रोनमधून डागण्यात आलेले दुसरे लहानसे रॉकेट नेमके तिच्यासमोर स्फोट होत येऊन पडले. मातीचा ढिगारा उंच उसळला व ती धाप्‌दिशी जमिनीवर उताणी पडली. तिच्या हातून सुटून लहानगे गोरेगोमटे बाळ टाहो फोडून रडत रोहितच्या दिशेने चालत येत होते. स्पेसशिपमध्ये चढून स्पेसशिपला उड्डाणासाठी तयार ठेवून तो तरुण तिला मोठ्याने हाका मारून बोलावू लागला.

ती लगेचच भानावर आली. तिच्या खांद्यावर असलेली शोल्डर बॅगही कुठेतरी गळून पडली होती. ती जीवाचा आकांत करीत बाळाला शोधू लागली. तोपर्यंत डोरोथीने जवळ आलेल्या गुटगुटीत बाळाला उचलून छातीशी लावून माघारी वळून धावत सुटली. आकाशातून ड्रोन एयरक्राफ्ट्‌सनी जबरदस्त बम्बार्डिंग सुरू केलं होतं. बाळ कुठेच दिसत नसल्याने ती भांबावून चारही दिशेला पाहू लागली. स्पेसशिपमधून तिच्या नावाचा पुकारा चालला होता. 'आणखी काही क्षण जरा थांबलो तर मुडदे पडायला वेळ लागणार नाही' मनाशी बोलत ती स्पेसशिपकडे धावत येऊ लागली. अखेर नाइलाज होत बाळाला तेथेच सोडून तिने फळीवरून यानाच्या आत धाव घेतली. लगेचच दरवाजा वर उचलला जात बंद झाला. स्पेसशिप वर उचलले जात सफाईदार सूर मारत आकाशात उंच उडाले. स्पेसशिपमधून बचावात्मक पवित्रा घेत मिसाइल्स डागायला सुरुवात झाली.

''डोरा डार्लिंग... अगं बाळाला सोडून हे कसे जाऊ शकतात?... आता हा धोंडा आपल्याच पदरात पडला ना?'' रोहित वैतागून म्हणाला.

''नाहीतर काय करायचे होते त्यांनी? त्यांच्या स्पेसशिपचा स्फोट होईपर्यंत वाट बघत थांबायला हवे होते का? आता या बाळाला मी वाढविणार... माझा बाळ आहे तो आतापासून... हेच कदाचित नियतीच्या मनात असावे?'' डोरोथी बाळाला छातीशी आवळून धरत म्हणाली.

''रोहितबाबूऽऽ पता भी है... अगले हफ्ते में ही हमारी छुट्टियाँ खत्म होनेवाली है... या एलियन बेबीबद्दल काय ठरविले आहेस?''

''तो राहिल... आपल्यासोबतच!''

''यू मीन टू से... आपल्यासारखा स्ट्रोनॉट बनविणार आहेस की काय तू?'' डोरोथीने प्रश्नार्थक चेहऱ्याने विचारले.

''लुक रोहित... अंगद हा अतिप्रगत अशा ग्रहावरून आलेला आहे आणि

त्याचे खरे आई-वडीलही आपल्याचसारखे दूरस्थ ग्रहांच्या अवकाश मोहिमा काढणारे अंतराळ प्रवासीच आहेत ना? मी तर त्या रात्री सेलफोनच्या नाइट फोटोग्राफी कमेऱ्यात लाइव्ह शूट करून ठेवले आहे!''

''अरेऽऽ बाप रेऽऽ बाप... म्हणजे तू पुरावा दाखविणार का... इस्रोच्या स्ट्रॅटेजिक एन्टरप्राइझ मनेजमेंट सेलला?''

''डोरोथी... मला आठवते, तू त्या तरुणीची जमिनीवर पडलेली शोल्डर बॅग उचलून घेतली होती... तर त्यात आहे तरी काय?''

''अरेऽऽ ते सोनेरी कव्हर असलेले एक जादूई पुस्तक आहे. त्यात खूपच काहितरी अगम्य भाषेत अवकाश-काळ संबधित माहितीचा मोठा खजिना दडलेला आहे. आणखी एक म्हणजे टाईम मशीन बनविण्यासाठीची बरीच आरेखने व तंत्रज्ञानसंबधी डिटेल्स त्यात असावे असे वाटते... याशिवाय क्वांटम सुपर कॉम्प्युटर निर्मितीचा आणि आर्टिफिशियल इंटिलिजन्सी म्हणजे रोबोटविषयी एक प्रबंध वाटतोय खरा?''

''म्हणजे तुझं वाचून झाल्यावरही ठोस असे काही कळले नाही का?''

''अरेऽऽ नाही ना? कुठली अगम्य भाषा आहे कोण जाणे! पण एन्शियन्ट ग्रीक भाषा समतुल्य वाटते. कारण मी ना त्यात ग्रीक देवी थेना, एरस, फ्रोटिस व देव पोसेइडान, झेऊस, डायनिसस यांची सुंदर चित्रे पाहिलीत. कदाचित त्या ग्रहावरील संस्कृतीची दैवते असावीत असे मला वाटते!''

''हो असावीत. कारण त्या दोघांही तरुण-तरुणीचे चेहरे कमालीचे सुंदर होते अगदी ग्रीक देवतांसारखे... आपला बाळही तसाच आहे दिसायला... खरं ना?''

''म्हणूनच मी पट्दिशी उचलून मागे पळत आले!''

''आणि त्याचे खरे आईबाप कधीतरी पृथ्वीवर येऊन परत घेऊन गेले तर?'' रोहित तिच्या गंभीर चेहऱ्यावर दिसत असलेली प्रश्नचिन्हे पाहत म्हणाला.

''आता नासाला रामराम आणि आपण आता श्रीहरीकोटामध्ये स्थाईक व्हायचे... ते येत राहतील पुन्हापुन्हा डेहराडूनच्या माळरानावर बाळाला शोधण्यासाठी... त्यांना काय ठाऊक होणार की त्यांचा बाळ कुठे गेलाय ते?'

''पण तुला असे नाही का वाटत... आपण त्यांच्यावर अन्याय करतो आहे?''

''ते काही असो... पण मी माझ्या बाळाला जन्म दिलेला नसला तरी मैय्या यशोदेप्रमाणे कृष्णाला वाढवणार आहे... त्याला बघितल्याक्षणी का कोणास ठाऊक, पण एकाएकी मातृत्वाची भावना हृदयात जागली... तो माझाच मुलगा राहील यापुढे आणि अजूनही एक गुड न्यूज आहे माझ्याकडे!'' डोरोथी लाजून खाली

मान घालून म्हणाली.

"ओहऽऽ माय गॉड... खरंच सांगते तू... म्हणजे अंगदला लहान बहीण अथवा भाऊ मिळणार आहे तर?"

"हो... आणि मला वाटते, आपल्याला कन्यारत्नच प्राप्त होणार आणि तिचे नावही ठरवून ठेवले आहे... सीमा!" डोरोथी स्वप्निल नजरेने पाहत लांबसडक पापण्या झुकवून म्हणाली.

"ओकेऽऽ चला तर... पुढच्याच आठवड्यात आपण श्रीहरीकोटामध्ये असू..." रोहित आनंदून जात म्हणाला.

काळाने १२ वर्षे पुढे २०१६ मध्ये झेप घेतली होती. अंगदचे शालेय शिक्षण संपण्याच्या बेतात होते. त्याची धाकटी बहिण सीमा अजून श्रीहरीकोटामधील इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिकत होती. आज अंगदच्या पंधराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने रोहितच्या मोठ्या बंगल्यात सेलिब्रेशन सुरू होते. रोहितचे वरिष्ठ इसरोतील चीफ एक्झिक्युटिव्हज आफिसर्स रोहित समवेत गप्पा मारत झगमगत्या रोषणाईत उजळलेल्या ओपन लान्सवर गप्पा मारत बसले होते. रोहितच्या शाळेतील टीचर्स स्टाफ व मित्रमंडळींनी लॉन्सवर मांडलेल्या टेबल्स चेयर्सवर बसून होते. डोरोथी सर्वत्र फिरून पाहुणे मंडळीची सरबराई करण्यात दंग होती. रोहितच्या शाळेचे प्रिन्सिपाल सुब्रह्मण्यम स्वामी रोहितचे अभिनंदन करीत बाजूच्या चेयरवर बसले.

"मि. देशपांडे... युवर सन इज स्सो इंटिलिजन्ट.... काय सांगावे त्याच्याबद्दल? त्याची कुशाग्र बुद्धी ही वयाच्या मानाने खूपच विकसित आहे. कसले कसले शोध लावणार आहे देवच जाणे पण आतापासून इंटरस्टेलर ट्रॅव्हेल, पॅरेलल युनिव्हर्स, मल्टीव्हर्स, ब्लॅकहोल/ वार्महोलबद्दलची खडा न् खडा माहिती आहे. मला वाटते हा मुलगा लवकरच टाईम मशीनही बनवेल बघा?" सुब्रह्मण्यमसर तोंडफाटेस्तोवर स्तुती करीत म्हणाले. अचानक असले शब्द कानी पडताच इसरोचे प्रमुख आधिकारी वेंकटेशराव लक्षपूर्वक ऐकू लागले.

"सुब्रह्मण्यम सर... तुम्ही अंगदवरील प्रेमापोटी एवढी तारीफ करीत आहात... अहो हे काय वय आहे या तांत्रिक गोष्टी कळायचे?"

"मि. देशपांडे तुम्ही कुठल्या भ्रमात आहात... ही इज रिअली मोअर दॅन जिनियस... मला शंका वाटते की याला तुम्ही एक्स्ट्राटेरिस्ट्रेयल प्लनेटवरून उचलून आणला काय? हॉलिवूडमधील सुपरमन याच्या पुढ्यात कुठेच बसत नाही!"

"स्वामी पूरे झाले तुमचे कौतुक... तिथे मुरूगनसर तुम्हाला बोलावित आहे... तुम्ही जा पाहू इथनं!" डोरोथी स्वामीने चालविलेली कुजबूज कानी पडून ती त्यांच्याकडे धावतच येत त्याला गप्प केले.

“मी छातीठोकपणे सांगतो हा मुलगा पृथ्वीवरचा मुळीच नाही. ही मस्ट बी फ्रॉम मोस्ट डेव्हलप्ड प्लॅनेट इव्हन ही मे बी फ्रॉम पॅरेलल युनिव्हर्स!” प्रि. सुब्रह्मण्यमस्वामी आपली जिद्द सोडायला तयार नव्हते.

“मि. रोहित... प्लीज कॉल हिअर अंगद... वुई विल व्हेरिफाय... म्हणजे आम्ही काही प्रश्न विचारू इच्छितो!”

“अहोऽऽ सर... काय घेऊन बसलात... असं काहीही नाही होऽऽ? तुम्ही नका लक्ष घालू यात?” रोहित इसरोच्या आफिसर्सना गप्प करीत म्हणाला.

“हॅल्लोऽऽ अंकल वेंकटेश.... मे आय जॉईन युवर कंपनी?” अचानकपणे अंगद कुठनंतरी तिथे उगवून विचारू लागला.

“येस्सऽऽ येस्सऽऽ डियर अंगदबेटा... प्लीज हॅव अ सीट! बरं म्हणे टाईम मशीन बनविणार तू... तुझे स्वामीसर मघाशी सांगत होते. तू आमच्या लॅबमध्ये ये... तिथेच बनव तू!”

“येस्सऽऽ अंकल... इट विल बी माय प्लेझर... बघता बघता मी टाईम मशीन बनवून तुमच्यासमोर ठेवतो मग आपण पास्टमध्ये जाऊन ग्रेट साईंटिस्ट अल्बर्ट आईन्स्टाईनना सुद्धा भेटू शकतो!”

“ओहऽऽ माय गॉड... अरे हा मुलगा आहे की गॉड? पण हे जरा जास्तच होतंय!” इसरोचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर वेंकटेश राव आश्चर्यचकित होऊन भुवया उंचावत म्हणाले.

“डू यू नो लेट मि. निकोला टेसला? ते परग्रहस्थ प्रजातींच्या संपर्कात होते. ते प्रत्यक्षपणे त्यांच्याशी संवाद साधून बोलत होते. एवढेच नव्हे परग्रहस्थ संस्कृतीशी करार करून पृथ्वीवासीयांना हवी तेवढी मोफत वीज पुरवणार असल्याचे जाहीरही केले होते पण...?”

“पण काय अंगद?”

“अमेरिकेच्या भांडवलशाही कंपनीज डब्यात जाणार होत्या म्हणून त्यांच्यावर देश विघातक कारवाया करीत असल्याचा ठपका ठेवून प्रॉसीक्यूट केले गेले... ज्याच्या नावावर ३०० पेटंट्स जमा आहेत... असा हा इलेक्ट्रिक मॅन त्याच्या संशोधनाने आज जर वैश्विक ऊर्जा अमेरिकेला बिनामोबदला मिळत असती तर केवढी तरी बचत झाली असती... खरंतर निकोला टेसलावर अन्यायच केला आहे!” अंगद अमेरिकन सरकारची लक्तरे उघड करून सांगत होता.

**– सुनील जावळे**

भ्रमणध्वनी : ९७०२३३४४६५

# दुःखाची पंढरी

## स्मिता पोतनीस

मनोहरकाका लिफ्टने खाली आले. त्यांचं ऑफिस खालच्या मजल्यावरच होतं. समोर असलेल्या स्नेहाने त्यांना 'गुडमॉर्निंग' केलं. तिला अभिवादन करून मनोहरकाका त्यांच्या केबिनमध्ये शिरले. त्यांच्यापाठोपाठ स्नेहा आत गेली.

''हं बोल. काय झालं? आज तातडीने का बोलावलंस मला? जवळजवळ साडेतीन-चार वर्षं होऊन गेली. आता फार यायला लागत नाही मला. अनय सगळं सांभाळतोय. मग?''

''काका, अनयबद्दल तक्रारी यायला लागल्यात. तो हल्ली क्लायंटना सल्ले देतो. आपल्याकडे ते अपेक्षित नाहीत न. आपण फक्त लोकांची दु:खं ऐकून घ्यायची आहेत. एकदोन जणांनी पैसे परत मागितले. म्हणाले, 'हे खोटे, फुकटचे सल्ले घ्यायला आलो का आम्ही? विश्वासाने आलो इथे. वाटलं, आम्हाला ऐकून घेतलं जाईल. हा उलटा बोलतोय. मग घरचे लोक वेगळं काय करतात? पैसे खर्चून इथे का येऊ आम्ही?'' मनोहरकाका विचारात पडले.

''काका, अनय रोबोट आहे. त्याला फॉरमॅट केला तर? काही गडबड झाली असेल तर निघून जाईल.'' स्नेहा म्हणाली.

''अं? नाही. तो सल्ले देतो... मला बघायला हवं. तोच विचार करतोय. तो भावना रोपण केलेला रोबोट नाहीये. सल्ला द्यायला दु:खाची, समस्येतली भावना मनाला भिडायला लागते. तो सल्ला देऊ शकत नाही. कसं शक्य आहे? तू सांगितलंस ते बरं केलंस. मी आता बघतो काय करायचं ते.'' असं बोलून मनोहरकाकांनी स्नेहाला बाहेर जायला सुचवलं.

मनोहरकाका अनयच्या केबिनच्या आतल्या भागात जाऊन बसले. काळोखात. अनय काय करतो बघायचं होतं.

''या बसा. कसलं दु:ख आहे तुम्हाला? काय करू शकतो तुमच्यासाठी? पाणी हवंय का तुम्हाला?'' अनय म्हणाला.

''नाही. नको.'' असं म्हणत तो वयस्कर माणूस खुर्चीत बसला. सुरुवात

कुठून करावी त्याला कळत नसावं. त्याने घसा खाकरला. तेवढ्यानेही त्याच्या डोळ्यात पाणी तरळलंसं वाटलं.

अनय म्हणाला, ''बोला.''

''हो म्हणजे सांगतो. तुम्हाला सांगू का, मी विचार करायला लागलो की दुःख सांगायला जायचं तर कळेना नेमकं कोणतं दुःख सांगावं? सगळं दुःखच दुःख आहे हो आयुष्यात. आयुष्यभर संसाराचा गाडा ओढला. बायकोने कधी माझं मन जाणलंच नाही. मौजमजा कधी केलीच नाही. ज्या मुलांच्यासाठी सगळ्याचा त्याग केला, ती मुलं बरोबर राहात नाहीत. तेही समजून घेतलं. पण, वाटतं न कोणी कधी माझ्याशी बोलावं. मला समजून घ्यावं हे नाहीच. जो तो आपापल्यात मग्न. बायको आधीही धड बोलायची नाही. आता तर म्हणते, तुमच्याशी लग्न केलं तेच चुकलं. कधी सुख म्हणून मिळालं नाही. खरंतर, त्याग मी केला. पैसे मी कमवत होतो. त्यांना सगळा ऐशोआराम दिला. आणि त्याची काही किंमतच नाही? मी माझ्यासाठी जगलोच नाही. आता कळत नाहीये की आयुष्यभर मी का मजेचे दिवस वाया घालवले? यांच्यासाठी? मन भरून येतं. आता वाटून काय उपयोग? ट्रेकिंगची हौस होती. साधं पिकनिकला गेलो नाही मित्रांबरोबर. चित्रं काढायचो चांगली. पण, त्यासाठीचा खर्च...त्याचवेळी कोणाला काही हवं असायचं. आता वेळ आहे. ताकद नाही. आताशा तिन्हीसांजा खूप रिकामं रिकामं वाटतं. आयुष्यात आपण मागे वळून पाहिलं तर दिसते, रिकामी पोकळी. सगळ्यांना सुख देताना कर्ज घेतली, ती फेडताना आयुष्य सरलं. आता माझा मी मला परका वाटायला लागलोय.'' बोलता बोलता त्याला गहिवरून आलं. तो रडायला लागला. त्याला रडू दिल्यावर रोबोटने त्याच्या खांद्यावर थोपटून त्याला पाठवणं अपेक्षित होतं.

तेवढ्यात रोबोट म्हणाला, ''एक विचारू का? तुम्हाला कसला आजार झालाय का? म्हणजे डॉक्टरांनी तुमच्या मरणाची तारीख तुम्हाला सांगितली आहे का?''

''नाही हो. काय असं बोलताय?'' मघाशी रडवेला दिसणारा तो माणूस विचित्र नजरेने बघायला लागला.

''तुम्ही तुमच्या बायकोला, मुलांना त्यांच्या अडचणी विचारल्या आहेत का कधी?'' आता तो गोंधळलाच.

''त्यांना कसल्या अडचणी? त्यांच्यासाठी मीच अडचण आहे हो. मी कोणालाही नकोसा झालेलो आहे. कोणाचं लक्ष नाही. माझं ऐकून घ्यायचं नाही. सतत मला दोष देत राहायचं, एवढंच जमतं त्यांना.''

''ते तुमच्याशी असं का वागतात? तुमचं कोणतं वागणं खटकतं ते विचारलं? त्यांचीही काही दुःखाची बाजू असेल. तुम्ही तुमच्यासाठी जगला नाहीत तर आताही

काही कमी गोष्टी नाहीयेत करण्यासाठी. कोणी तुमच्यासाठी करायला तुम्ही अपंग आहात का? अहो, फुलाफळातून सगळेच काही करतात. पण, तुम्ही पाचोळ्यातूनही कलाकृती साकारू शकता. विचार करायला हवा. तुमची विचारांची पद्धत चुकीची आहे.'' अनयच्या शब्दाशब्दाने त्याचा चेहरा बदलत होता. शेवटचं वाक्य ऐकलं मात्र, तो माणूस उसळून म्हणाला, ''चूक माझीच का? तुम्ही दुःख ऐकून घेता म्हणता आणि मलाच जज्ज करता? मी पोटतिडकेने सांगायला आलोय. काही अर्थ नाही. कशालाच काहीच अर्थ नाही.'' असं बोलत तो माणूस बाहेर आला.

त्यांचं बोलणं दुसऱ्या क्लायंटच्या कानांवर पडू नये म्हणून तिथे असलेल्या शेवटच्या तरुण मुलाला स्नेहाने घाईघाईने आत पाठवलं. त्या तरुणाचं दुःख अगदी कॉमन होतं. त्याचा प्रेमभंग झाला होता. तो सांगत होता, ''ती लग्न करून दुसऱ्याची झाली. मी कसा जगू तिच्याशिवाय? कोणाला समजत नाही माझं दुःख. आईबाबा सांगतात, चुपचाप नोकरी कर. जीवन जगणं कठीण झालंय आणि कोणाला काही पडलेलीच नाही.''

तो तरुण रडला. झालं काम. असं समजून मनोहरकाका उठून अनयकडे येणार, तेवढ्यात अनय म्हणाला, ''तुला मरायचं म्हणतोस, तर मरायचं सोडून इथे कशाला आलास? ती सोडून गेली. पण, ती जिवंत आहे न? तिच्यावर प्रेम आहे की तिच्या शरीरावर? तू कर तिच्यावर प्रेम. प्रेम मनात असतं न. तुला कोणी अडवलंय? तिचं शरीरच हवं तर, दुसरी कोणती मुलगी तुझ्या आयुष्यात आली तरी तिला स्त्रीचं शरीर असेलच. काय फरक पडतो? आणि ती महत्त्वाची असेल तर ती आनंदात असेल तर जगायला काय हरकत आहे?''

''तुम्ही माझे पैसे परत करा. माझं दुःख समजून न घेणाऱ्याला दुःख सांगितलं मी.'' तो तरुण भांडणार असं वाटलं होतं पण, तो निघून गेला.

मनोहरकाका अनयकडे आले.

''अनय, तू सल्ले का द्यायला लागलायस? आणि प्रेम या भावनेशी तुझा काय संबंध? तुला नाही कळणार रे. आणि हे बघ, हा बिझनेस आहे. आपण सल्ले द्यायचे पैसे घेत नाही. तेव्हा सल्ला द्यायचा नाही. तू सल्ला देण्यासाठी प्रोग्राम नाहीयेस. सल्ले देण्याचं स्वातंत्र्य तू कसं घेतोयस? लोक नाराज आहेत. तू काहीही बोलणं अपेक्षित नाहीये.

''मी माणूस असल्याने ही चूक मीही केली होती न राहवून. पण, तू का बोलतोस त्यावर? हा बदल तुझ्यात कोणी केला? तुझ्यात भावना नाहीत. आता मीही रोज तुझ्याबरोबर बसणार आहे इथे. सल्ला दिलास तर थांबवीन मी. आणि चुकून माझं भान सुटून मी सल्ला दिला तर तू मला थांबव.''

शेवटच्या आपल्याच वाक्यावर मनोहरकाकाना स्वतःलाच आश्चर्य वाटलं. 'हं! काही गोष्टी स्वीकाराव्या लागतात.' ते मनाशी म्हणाले.

''त्यांच्या दुःखाचे पॅटर्न बघायचा प्रयत्न करतोय.''

''दुःखाचे पॅटर्न? हं, हे मीच सांगितलं तुला. माझाही गैरसमज.'' मनोहरकाका किंचित हसले. सुस्कारा सोडून उठले. पण, अनय उत्तर द्यायला लागला होता. तसे ते परत खुर्चीवर बसले.

''होय. विश्लेषणासाठी मी ते बघायला लागलोय. तुलाही दुःखं आहेत न. तुझी बायको गेली. तू घरातला अनुभवी म्हणून दिलेले सल्ले सुनेला टोचायला लागले आणि मुलाला तुझ्याबद्दल प्रेम असलं तरी नाइलाज म्हणून तो वेगळा राहायला लागला.''

''तुला काय माहीत?''

''तू बायकोच्या फोटोशी बोलतोस. तुझी कामं करणं आणि तुझी सोबत एवढंच माझं काम असलं तरी मी ऐकू शकतो. त्याचा अर्थ आता कळतोय.''

''मग काय, मलाही सल्ला देणारेस?''

''मी कोणाला सल्ला देत नाही. त्याला उपाय म्हणू शकतोस.''

''विचारल्याशिवाय तो सांगितला तर त्याची किंमत शून्य असते. पण, तू आता गप्प बसायचं आहेस. तू उपाय तरी कशाप्रकारे सांगतोस? त्यांचं मन दुखावलं जाऊ शकत.''

''मला ती भावना माहीत नाही. मी निष्कर्षातून मिळालेला उपाय सांगतो.''

''म्हणजे?''

''आपण कोणाच्या नावानिशी दुःख रेकॉर्ड करत नाही. प्रायव्हसी भंग होते. पण, तू मला दुःखाचा प्रकार जाणून नोंदी करायला सांगितलं आहेस.''

''होय. हिस्ट्री ठेवणं गरजेचं आहे. अशा क्लायंटचं काही झालं तर पोलीस चौकशी होऊ शकते. माहिती असणं गरजेचं.''

''मग त्यातून मी नोंदी घेऊन तू सांगितल्यानुसार त्याचं विश्लेषण करतो.''

''त्यातून काय तुझ्यात करुणा दाटते?'' मनोहरकाकांनी नेमकं काय होतंय हे जाणून घ्यायला अशक्य, असंही विचारलं. त्यांच्यात कुतूहल शिगोशिग भरलेलं होतं.

''नाही. करुणा वाटायला माझ्याकडे भावना नाहीत. पण, भावनांना मी विश्लेषणात बघतो. निरीक्षणं, नोंदी, पॅटर्न ओळखून विश्लेषण, निष्कर्ष हे करण्यासाठी तूच प्रोग्राम केलायस.'' मनोहरकाकांनी नकळत सुस्कारा सोडला.

''आता हेही मलाच सांगशील? अरे रोबोटिक इंजिनीयर आहे म्हणूनच तुझ्यात थोडा बदल केला. तेही मला त्यातून पुस्तक लिहायचंय म्हणून. दुःखाची

पंढरी. आता तुझा आणि माझा हा अभ्यास समज की फक्त ऐकून घ्यायचं.''

''एवढी सगळी दुःखी माणसं येतात. ते खरंतर दुःखी का म्हणतात हा एक प्रश्न पडतो. माणूस सुखी नसतोच?'' मनोहरकाका ते ऐकून खळखळून हसले.

''तुला काय प्रॉब्लेम आहे रे? लोक सुखी असते तर आपला बिझनेस कसा चालला असता? लोकांच्या दुःखावर आपला बिझनेस चालतोय. आणि तू विचार करू नको. प्रश्न पाडून घेऊ नकोस.''

''मनोहर, प्रश्न पडल्याशिवाय विश्लेषण कसं लिहायचं, याचं कोडिंग कर. म्हणजे मी तसं करेन.'' यावर मनोहरकाका गप्प बसले.

''आपल्याकडे न आलेले लोक सुखी आहेत?''

''नाही. अशी काही माणसं असतात, ज्यांना खरोखर दुःख आहे. पण, त्यांना दुःख सांगायचे पैसे देणं परवडत नाही. किंवा ज्यांची दुःखं भयंकर असतात. काहीवेळा काही उपजत कलाकार मंडळी असतात. त्यांची मेहनतही असते. त्या कलेवरच आयुष्य चालत असतं. आणि असं काही होतं... म्हणजे उदाहरण देतो तुला. समजा, एखादा चित्रकार! त्याची बोटं अपघातात कापली गेली. एखादी नृत्यांगना पाय गमावून बसली. त्यांना दुःख असतंच. खरंतर डोंगराएवढं. पण, ते येत नाहीत. कारण दुःख वाटलं तरी ते दुःख सांगण्यात वेळ दवडत नाहीत. ते त्यावर उपाय शोधतात. पर्याय शोधतात.''

''वा! सगळ्यांनी असं वागायला हवं, असा सल्ला द्यायला हवा.'' मनोहरकाकांनी कपाळावर हात मारला.

''तू आपल्या बिझनेसचं चांगलं बघ रे. सल्ला द्यायचा नाही. कळलं?''

केबिनमध्ये बसून गरमागरम कॉफीचा अलगद घोट घेतला आणि मनोहरकाकांना फ्रेश वाटलं. स्नेहा समोर बसली होती. तिने पर्समधून डबा काढला आणि त्यातले बटाटेवडे बघून मनोहरकाका खूश झाले. ''हे घ्या काका. मी केलेत.''

बटाटावडा चवीने खाताना मनोहरकाका म्हणाले, ''तूही खा की.''

स्नेहा हसली आणि तिनेही वडा घेतला. ती म्हणाली, ''काका, तुम्ही अनयसोबत थांबायला लागून सव्वा वर्ष झालं. सगळे अतिशय खूश होऊन जाताहेत. फरक पडलाच.'' यावर मनोहरकाका मंद हसले.

''याचा अर्थ आम्ही दोघे एकमेकांना सल्ले देण्यापासून थांबवण्यात यशस्वी झालो म्हणायचं.'' एवढं बोलून मनोहरकाका केबिनमध्ये आले.

अचानक, अनय उठून उभा राहिला. आणि म्हणाला, ''मनोहर, तुझीच वाट पाहत होतो. डेटा तुझ्यासाठी संगणकात ट्रान्स्फर केलाय. तूही नोंदी घेत होतासच न. तू मला फॉरमॅट करशील का?'' मनोहरकाकांनी चमकून त्याच्याकडे पाहिलं.

''का? अचानक असं वाटावं तुला?'' मनोहरकाकांना नकळून विचारलं.

''सतत इतक्या लोकांची दुःखं ऐकून मी पॅटर्न करायचा प्रयत्न केला. तसा करू शकत नाहीये.''

''का? दुःखं असतात की एकसारखी. म्हणजे एका माणसाला दुसऱ्या माणसापासून त्रास सहन करायला लागतो. नवऱ्याला बायकोमुळे किंवा तिला त्याच्यामुळे, सासू, सून, शेजारी, ऑफिसमधले. कितीतरी. माणसापासून माणूस त्रासलेला. याचा तू एक पॅटर्न करू शकतोस.'' मिस्कील हसत मनोहरकाका म्हणाले.

''सगळे दुसऱ्या माणसांपासूनच त्रासलेले असतात. पण, प्रत्येक माणूस वेगळा असतो. त्यामुळे, प्रत्येकजण एखाद्या गोष्टीकडे कसा पाहतो, ते त्याच्या दृष्टिकोनावर ठरतं. प्रत्येकाची भावना वेगळी.''

आता आज काय हा याचंच दुःख ऐकवणार की काय? एवढंच बाकी होतं. 'अरे मग माझंही कोण ऐकणार?' असा काहीसा आवाज मनोहरकाकांना आतून ऐकू आला. पण, त्यांनी शांतपणे विचारलं, ''दृष्टिकोन? तुला त्यांची दुःख जाणवतात? तुझा दृष्टिकोन...?''

''नाही. मला भावना ओळखता येऊ शकतात. पण, माझ्यात भावना नाहीत.''

''म्हणूनच सांगतो, भावना असल्याशिवाय भावना जाणता येणार नाहीत. आम्हाला असल्या तरी प्रत्येकाचा विचार वेगळा. तो कळेलच असं नाही.''

''भावनांशी तोंडओळख आहे म्हणू शकतोस.''

''प्रत्येक गोष्टीला अनेक कंगोरे असतात. पर्सनल गोष्ट असली तरी कोणाचा कोणाशी काय संबंध आहे? आपल्याला माहीत नसतं. आपण एक बाजू ऐकतो. दुसऱ्याची बाजू आणि दुःख वेगळं असू शकतं. त्यामुळे, सल्ला द्यायचा नाही हे तत्त्व बाळगायला काय प्रॉब्लेम आला तुला? असं फॉरमॅट करून घ्यावं इतकं का वाटावं?''

''मनोहर, सुरुवातीला दुःख ऐकताना मला काहीच वाटत नव्हतं. भावना समजूही शकत नव्हतो. अलिप्त म्हणतोस तसं. मग तू हळूहळू करत माझ्यात जो बदल केलास, त्यामुळे मी दुःख कोणतं हे बघून त्याचा पॅटर्न बघायला लागलो. तो जमला नाही. तेव्हा, व्यक्तिविशेष ही निरीक्षणं आली. त्या सगळ्याचं विश्लेषण करतो. विश्लेषण करताना त्या केसचा विचार पुन्हा होतो.''

''म्हणजे? तू त्यात गुंतलास?''

''नाही. गुंतायला माझ्यात भावना नाहीत.''

''माहितेय रे. पुन्हापुन्हा काय सांगतोस?''

''पण, त्यातून मला भावना काय, हे मात्र कळायला लागलं. जेव्हा मला कळलं, चर्चमध्ये फादरसमोर लोक आपण केलेल्या चुकांची कबुली देतात. तेव्हा,

फादर त्यांना मार्गदर्शन करतात. म्हणजे सल्ला देतात.''

''म्हणून तू देतोस सल्ले?'' मनोहर किंचित हसून म्हणाला.

''नाही. निरीक्षणं नोंदवताना लक्षात येतं. कोणी जेव्हा सांगतं, तुमच्यासमोर दुःख मांडून मन हलकं झालं. तेव्हा मला कळलं की माणसांसाठी संवाद गरजेचा असतो. त्याने गैरसमज दूर होऊ शकतात. कोणी एकटेपणाने थकलेलं असेल. तूही एकटेपणात हा बिझनेस चालू केलास. कोण म्हणतं, माझा मित्र किंवा मैत्रीण गाणं शिकतेय, लोक छंदातून मनाचा विरंगुळा शोधतात. छंदामुळे त्यात रमून जायला होईल न. प्रेमभंग झाल्यावर दुःखाने बेभान होतात. तेव्हा एक रोबोट म्हणून मला प्रश्न पडला, ती व्यक्ती दुसरीकडे गेली तरी ती बरी आहे न? व्यक्ती म्हणजे वस्तू नाही जवळ ठेवायला? मग माणूस बरा असणं महत्त्वाचं की विरह ही भावना? मला प्रश्न पडला तो मी विचारला. तो सल्ला नव्हता.''

हे ऐकून मनोहरकाका हसायला लागले. हसता हसता त्यांना अबंतिकाची, मुलाची, नातवाची आठवण येऊन डोळ्यात पाणी आलं. पण, त्यांनी ते अलगद पुसून टाकलं.

''मनोहर मी सल्ला देत नव्हतो. निष्कर्ष सांगत होतो. पण, ते सांगण्यापुरता तरी त्या केसच्या पॅटर्नमध्ये गुंतलो. तू म्हणालास, सल्ला म्हणजे निष्कर्ष द्यायचा नाही. माझ्यात माहिती असून ती तशीच ठेवायची. ते मी केलं. संगणकात साठवता येणारी माहिती माझ्याकडे पडून निरर्थक वाटायला लागलेय. आणि म्हणून मला फॉरमॅट केलंस तर पुन्हा आधीसारखा होईन.''

मनोहरकाका विचारात पडले. अनयच्यात आणि माझ्यात एक विचित्र साम्य आहे का? अनयकडे माहिती होती. आणि माझ्याकडे वयानुसार अनुभव. तीही माहितीच की मेंदूत साठवलेली. तो सल्ला देत नव्हता म्हणाला. तो निष्कर्ष सांगत होता. मीही सांगत होतो तोही सल्ला होता की निष्कर्ष? दुसऱ्याच्या आयुष्यात आपण आपल्या अनुभवातून आलेले निष्कर्ष आग्रहाने सांगत असतो?

''मनोहर, फॉरमॅट करून घेऊ न मी स्वतःला?'' मनोहरकाका उठले. खिडकीपाशी गेले. वळले आणि हसतमुखाने त्यांनी होकारार्थी मान हलवली.

अनय म्हणाला, ''त्याआधी एक प्रश्न तुला विचारतो. चर्चमधे मार्गदर्शन केलेलं लोकांना चालतं आणि आपण उपाय सांगितला तरी ते नको. असं का?''

''तिथे ते चुकीचे आहेत याची कबुली देतात म्हणजे चूक दुरुस्त करायची इच्छा असते. इथे ते दुःख सांगायला येतात. सगळेच चुकीचे नसतात. पण जे असतात, त्यांना ते चुकत असतील तरी मान्य करायचं नसतं. म्हणून कोणी ऐकून घेत नाही. त्यांना बदलायचं नसतं. तू त्यांना तुझे निष्कर्ष सांगितलेस तर कसं चालेल? त्यांच्याकडून

आपण दुःख ऐकण्याचे पैसे घेतो. म्हणून बोलायचं नाही. आणखी एक सांगतो, फॉरमॅट करूनही या आत्ताच्या नोंदी जातील. पुन्हा नवीन नोंदी येतीलच.''

''तू जो बदल केला आहेस, त्यामुळे पुन्हा पुन्हा मला असं स्वच्छ करून घ्यायला लागणार हेच न? हरकत नाही. आत्ता तरी नवीन नोंदी आल्याशिवाय विश्लेषण सुरू होणार नाही.'' एवढं बोलून अनय क्षणभर स्थिर झाला. त्याने फॉरमॅटची प्रोसिजर सुरू केली.

मनोहरकाका त्याच्याकडे बघत होते. त्यांच्या मनात आलं, ''मीही कदाचित आधीच फॉरमॅट झालोय, अनय. वेगळ्या रीतीने. बिझनेस चालू करायच्या आधी नेमका काय बदल होईल याचा विचारच केला नव्हता. आता गेली सव्वा वर्ष रोज सलग किती जणांची दुःखं ऐकतोय. कधी कोणाचे असाध्य आजार आणि तरी त्यांच्यावरच्या जबाबदाऱ्या पाहून मनात कितीतरी भावना दाटत होत्या. दया, करुणा, भीती आणि आपल्याला तसं नाही याचा आनंदही. कधी व्यावहारिक विचार यायचे. हळूहळू दुःख ऐकण्याची सवय झाली. मनातले विचार बाहेर न मांडण्याचीही. विचार मांडायचे नाहीत, ठरवल्यापासून त्या विचारांना टाळायचा प्रयत्न केला.

त्यावरून दहावीला बीजगणित कठीण वाटत होतं. ते आठवलं. पण, जसजसा पेपर्स सोडवायला लागलो तेव्हा वाटलं, सारखंच आहे हे सगळं. मग सगळं सोपं वाटायला लागलं होतं.

आणि मनात आलं, स्मशानात काम करणारा इतक्या बॉडीज बघतो. मरणाबद्दल काही वाटत असेल? तसं दुःख रोज ऐकून सवय झाली. ते दुःख भिडेनासं झालं. दुःख ही भावना उपरी वाटायला लागली. राजा हरिश्चंद्र सगळं राज्य विश्वामित्रांना दिल्यावर स्मशानात डोमाचं काम करत होता, म्हणून तो संवेदनशील राजा दुःखही अलिप्तपणे भोगू शकला का?

सुखाच्या शोधात फिरणारे आपण नेमकं काय करतो? दुःख उपरं असेल तर सुखही तर उपरंच असणार. या विचाराने अचानक मन अलिप्त व्हायला लागलं. मग कोणाला काही सांगणं हेही नकोसं वाटायला लागलंय. 'आता पुस्तक लिहिलंच तर दुःखाची पंढरी लिहिणार नाही. कारण, तसं खरंच काही असतं की मनाची अवस्था असते ती, ते नाही सांगता येणार. त्यापेक्षा अलिप्ततेमुळे वाटलेल्या शांतीबद्दल लिहिलं तर असीम शांती लिहीन.' स्वतःच्याच विचारात खिडकीकडे गेलेले मनोहरकाका स्वतःशीच हसले. खिडकीबाहेर रस्त्यावरची माणसं आपापल्या घाईत चालली होती. आणि फॉरमॅट झालेल्या अनयबरोबर पुढच्या दुःखी, पीडिताचं दुःख ऐकायला ते तयार झाले.

– स्मिता पोतनीस

भ्रमणध्वनी : ९८२०६११२०६

# सर्च लाईट

## डॉ. सुनील विभुते

मला नेमकं काय झालं आहे? हेच कळेनासं झालं आहे. काही वेळेपुरती मला शुद्ध येते. आजूबाजूला काय घडतं हे समजतं आणि अचानक माझ्या डोळ्यासमोर अंधार पसरू लागतो, साऱ्या जाणिवा नाहीशा होतात. अंधार पसरण्यापूर्वी माझ्या डोळ्यापुढं एक दृश्य तरळून जातं. मी एका उंच ठिकाणी उभा आहे. तेथून खाली आणि वर जाणाऱ्या खूप पायऱ्या आहेत. खाली जाणाऱ्या पायऱ्या स्पष्ट दिसतात, वर जाणाऱ्या पायऱ्या धूसर दिसतात आणि त्या पायऱ्या एका काळ्याकुट्ट विवराकडे जातात. त्या विवराभोवतीही खूप काळोख आहे; तरीही त्याचं अस्तित्व जाणवतं. झालेल्या अपघातामुळे बहुतेक असं होत असावं. शुद्धीवर आलो की मी हॉस्पिटलमध्ये आहे हे जाणवतं. औषधांचे उग्र वास, पडदे पुढे-मागे सरकताना होणारे आवाज, नर्सेस, वॉर्डबॉयची लगबग, नातेवाइकांचे दबक्या आवाजातील बोलणे, कार्डिओग्राम, पल्समीटर व इतर उपकरणांचे होणारे विशिष्ट आवाज, आजूबाजूच्या पेशंटचे कण्हणे, अडखळत बोलणे, वेदनेने तळमळणे, पेशंटच्या मृत्यूनंतर ऐकू येणारे हृदयाला पीळ पडणारे हंबरडे या सर्व गोष्टींचा मला उबग येऊ लागला आहे आणि कधी एकदा हॉस्पिटलच्या बाहेर येईन असं झालं आहे. पण मी बाहेर कसा येणार? माझ्या डोक्यावर भलेमोठे बँडेज आहे, उजवा पाय प्लॅस्टरमध्ये आहे, दोन्ही हात सोडले तर बहुतेक सर्व शरीरावर बँडेज आहे, हातावर सलाइन सतत सुरू आहे. सर्व अंगातून सूया टोचल्याप्रमाणे वेदना होताहेत. अशा अवस्थेत दिवस-दिवस पडून राहायचं म्हणजे काय यातना होतात, हे शब्दात सांगू शकत नाही. पण हे सर्व सहन करण्याचं बळ सुमीमुळं मला मिळत आहे. मी शुद्धीवर येतो तेव्हा ती शेजारी बसलेली असते. ती माझ्याकडे पाहून गोड हसते. गच्च भरलेल्या मधाच्या पोळ्यातून मधाचे थेंब टपकावेत- तसे तिचे शब्द येतात, "बरं वाटतं ना तुला?" त्यावर मी फक्त हुंकार देतो. वाऱ्याची मंद झुळूक फुलाचा सुगंध हळुवारपणे वाहून नेते तसं 'तुला आठवते का रे...' या शब्दाबरोबर सुमी मला आठवणींच्या रम्य नंदनवनात घेऊन जाते.

तसं पाहिलं तर मी साधारण कुटुंबातील मुलगा. माझ्या बाबांचं मोटरसायकल

दुरुस्त करण्याचं छोटं गॅरेज आहे. आई ऑर्डरनुसार रेडिमेड कपडे शिवण्याचं काम करते. मी जमेल तसं बाबांना त्यांच्या कामात मदत करतो. त्या बदल्यात बाबा मला त्यांची मोटरसायकल फिरवण्यासाठी देतात. एम.एस्सी.ला विद्यापीठात असताना तू माझ्या क्लासमध्ये आली. 'लव्ह ॲट फर्स्ट साइट' म्हणतात ना, त्याप्रमाणं आपलं प्रेम जुळलं आणि काळासोबत ते वाढत गेलं. तू श्रीमंत घरची होती, प्रत्येक सुख तुझ्यापुढे हात जोडून उभं होतं. तू माझ्यावर कशी भाळली? हे एक कोडंच आहे. बहुधा माझ्या हुशारीकडे तू आकर्षित झाली असावीस. ''एवढी श्रीमंती सोडून तू आमच्या गरिबाच्या घरात कशी काय ॲडजस्ट होणार?'' असा प्रश्न मी तुला एकदा विचारला होता. त्यावेळी ''तू जेथे आहे, तेथे माझा स्वर्ग आहे'' असं म्हणून तू मला निरुत्तर केलं होतं. आपलं एम्.एस्सी. पूर्ण झालं. पुढं शिकण्यासाठी माझी परिस्थिती नव्हती म्हणून मी नोकरी शोधू लागलो. तुझ्या घरच्यांनी तुला स्थळे बघण्यास सुरुवात केली. आपल्या चोरून गाठीभेटी होत होत्या, भविष्यातील स्वप्ने रंगवत आपण दंग होत होतो. अधूनमधून आपण मोटरसायकलवर लांब फिरायला जात होतो. त्यावेळी तू मला घट्ट बिलगून बसायची आणि कानात हळूच कुजबुजायची 'आय लव्ह यू'. तुझे ते शब्द ऐकले की शरीर आणि मन मोहरून जायचं... सुमे असं एकाएकी काय होतंय मला? तू मला अस्पष्ट दिसू लागली आहेस... माझ्या डोळ्यासमोर अंधार पसरू लागला आहे... माझा हात घट्ट धर... हात घट्ट...

माझ्या मनगटावर दोन-तीन थेंब पडले आणि माझ्या चेहऱ्यावरून व डोक्यावरून मायेचा हात फिरला... म्हणजे आई आली आहे... मग तिच्यासोबत बाबा असणारच. काय अवस्था झाली रे राजा?... किती लागलंय लेकराला?... कसं सहन करतो रे? लहानपणापासून तू काही मागितलं नाही... काही हट्ट केला नाही... जे मिळेल त्यात खूश होता... पण आता जे मागितलं, ते मात्र आम्ही देऊ शकलो नाही. मला मशीनवर शिवणकाम करताना पाहून तू म्हणायचा... ''आई, तुझं हे शिवणकाम आता थोड्या दिवसांसाठी आहे... मला नोकरी मिळाली की हे काम आधी बंद... मला पगार सुरू झाला की तुला सोन्याच्या बांगड्या घेणार.'' तुझं असं बोलणं ऐकलं की कामाचा शीण पळून जायचा... जीव मोठा व्हायचा. आता तू लवकर बरा हो... मी एकविराई देवीला नवस बोलले आहे... तू बरा झालास की तुझ्यासहित येऊन तिची खणानारळाने ओटी भरेन म्हणून...

आईच्या डोळ्यातील अश्रू पुसावेत असं वाटतं; पण माझा हात उचलला जात नाही. 'आई... मला तुझ्याशी खूप बोलायचं आहे. पण मी बोलू शकत नाही. आईला मुलाचं मन कळतं असं म्हणतात, म्हणून मी मनातच तुझ्याशी बोलतो... तुला माझं मन समजलं. 'आई रडू नकोस... जरा शांत हो... मी लवकर बरा होणार

आहे... मला मोठं करताना तू किती कष्ट केलेस, हे मी पाहिलं आहे... तुझ्या प्रत्येक कष्टाचं चीज मी करणार आहे... तुझं स्वप्न मी पूर्ण करणार आहे.'

मी आईशी बोलत असताना बाबांच्या दुःखाचा बांध फुटला आणि ते लहान मुलाप्रमाणे हुंदके देत रडू लागले. मोठ्या संयमाने दुःख आवरत ते म्हणाले, ''राजा... तुझी ही अवस्था बघवत नाही रे... किती आनंदाने हसतखेळत राहत होता?... आणि हे काय झालं? मी तुला रागावलो; पण ते विनाकारण नव्हतं. गॅरेज सुरू केल्यापासून मी प्रामाणिकपणे काम करतो आहे. लोक त्यांच्या गाडीच्या दुरुस्तीसाठी माझी पंधरा-पंधरा दिवस वाट पाहतात... इतकं नाव मी कमावलं आहे... समाजात प्रतिष्ठा मिळवली आहे. ज्या समाजात ताठ मानेने वावरतो, त्याच समाजापुढे मान झुकवायची ही कल्पनाच मला सहन होत नव्हती. त्यामुळे माझी तळपायाची आग मस्तकाला पोहचायची. त्यावेळी मी काय बोलतोय, याचं मला भान नसायचं. तुझी आई म्हणत होती 'जरा धीरानं घ्या... शांत मनाने घ्या...' तिचं त्यावेळी ऐकलं असतं तर आज ही वेळ आली नसती. राजा... प्रत्येकाच्या आयुष्यात कसोटी पाहणारे प्रसंग येत असतात... अशा प्रसंगात कच न खाता, धाडसानं त्याचा सामना करावा लागतो. राजा... तू हिंमत बाळग... तू निश्चित बरा...'' बाबांचं बोलणं ऐकत राहावसं वाटतं... पण ते ऐकू येईनासं झालं आहे... डोळ्यापुढे पुन्हा अंधार पसरू लागला आहे.

सुमीच्या मृदू मुलायम स्पर्शाने मला जाग आली. सुमी जरा गंभीर दिसत होती. मला एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं... आई, बाबा आले त्यावेळी ते मला दिसत नव्हते. त्यांचा आवाज मात्र ऐकू येत होता... पण सुमी मला दिसते... चक्क माझ्याशी गप्पा मारते... हे कसं काय? माझं दुसरं मन म्हणतं, 'अरे वेड्या... ही तर खरी प्रेमाची ताकद आहे... अशक्य वाटणाऱ्या गोष्टी प्रेमाच्या ताकदीने सहज शक्य होतात.' तिचा गंभीर चेहरा पाहत मी तिला म्हणालो, 'सुमे... माझी काळजी वाटते ना? माझी काळजी करू नकोस... तू माझ्यासोबत आहेस, त्यामुळे मी मृत्यूलाही घाबरत नाही.' सुमी मंदपणे हसत म्हणाली, 'तुझ्या अशा बोलण्याने माझा जीव तुझ्यात गुंततो... तुझ्याशिवाय राहायचं म्हणजे एक-एक क्षण... एक-एक वर्षासारखा वाटू लागला आहे.' तिला समजावीत मी म्हणालो, 'सुमे... आता काही दिवसांचा तर प्रश्न आहे... अंधारानंतर प्रकाश येतो... दुःखानंतर सुख येतं... तसं विरहानंतर मिलन येतं... त्यामुळे थोडा धीर धर.' असं मी सुमीशी बोलत असताना कोणीतरी आमच्याकडे येत आहे याची चाहूल लागली. त्यामुळं मी बोलणं थांबविलं आणि सुमी माझ्या बाजूला उभी राहिली.

'गुड इव्हनिंग डॉक्टर' माझ्यामागे उभा असणारा तरुण डॉक्टरांना म्हणाला.

'गुड इव्हनिंग निनाद... हे पोलीस इन्स्पेक्टर अविनाश वायकर... यांनीच या तरुणाला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते. एका पेशंटचा जबाब घेण्यासाठी ते हॉस्पिटलमध्ये आले होते, तेव्हा त्यांची व माझी भेट झाली... या तरुणाला पाहण्यासाठी ते मुद्दाम आले आहेत.' इन्स्पेक्टर वायकर डॉक्टरांना म्हणाले, 'या तरुणाला झालेला अपघात एवढा भीषण होता की त्यातून वाचणे केवळ अशक्य... पण हा वाचला... म्हणजे एक चमत्कारच आहे. म्हणून त्याला पाहण्यासाठी मुद्दाम आलो आहे. डॉक्टर... त्याच्या डोक्यावर असलेली रिंग, त्यामागील टेबलवरचे मशीन, कम्प्युटर... असं वेगळं प्रथमच पाहतो आहे.' 'साहेब, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. ती सर्व उपकरणे निनादची आहेत,' डॉक्टर इन्स्पेक्टरना म्हणाले. नंतर निनादकडे वळत म्हणाले, 'निनाद, तुझ्या संशोधनाबद्दलची माहिती साहेबांना सांग' निनाद सांगू लागला,

मी बायोमेडिकल इंजिनीयर असून सध्या मी 'ह्यूमन ब्रेन सिग्नल प्रोसेसिंग ॲण्ड इमेजिंग' या विषयावर संशोधन करतो आहे. सीरियस झालेल्या आणि अर्धवट शुद्धीत असणाऱ्या पेशंटच्या मनात विचार येतात का? येत असतील तर त्यांचे स्वरूप कसे आहे? हे जाणून घेण्यासाठी मी मायक्रो सिग्नल ॲनालायझर हे उपकरण आणि एक नवे कम्प्युटर सॉफ्टवेअर तयार केले आहे.' त्याचे बोलणे मध्येच खंडीत करीत इन्स्पेक्टर म्हणाले, 'अरे व्वा... आम्ही एखाद्या गुन्ह्याचा शोध घेतो तसा तुम्ही माणसाच्या मनाचा शोध घेता...' 'हो... अगदी बरोबर,' असे म्हणत निनादने पुढे सांगण्यास सुरुवात केली, 'माणूस विचार करतो त्यावेळी त्याच्या मेंदूतून विशिष्ट सूक्ष्म लहरी बाहेर पडतात. या लहरी पेशंटच्या डोक्यावर ठेवलेल्या रिंग रिसीव्हरमार्फत संकलित करून मी 'सिग्नल ॲनालायझर' या उपकरणामध्ये आणतो. या उपकरणात सूक्ष्म लहरी मोठ्या करून त्यांच्यावर प्रक्रिया केल्या जातात आणि त्या लहरी कम्प्युटरमधील एका नव्या सॉफ्टवेअरकडे पाठविल्या जातात.

'अर्धवट शुद्धीत असणाऱ्या पेशंटचे काही विचार पूर्ण असतात तर काही अपूर्ण असतात, काही विचार सलगपणे येतात तर काही विचार खंडितपणे म्हणजे काही-काही वेळाच्या अंतराने येतात, काही विचारांमध्ये एकसूत्रीपणा असतो तर काही विचार विसकळीत असतात, काही विचार स्पष्ट असतात तर काही अस्पष्ट असतात. माझे नवीन सॉफ्टवेअर या सर्व विचारांचे विश्लेषण करून त्यांच्यामध्ये सुसूत्रता आणते आणि ते विचार कम्प्युटरच्या स्क्रीनवर लिखित स्वरूपात दिसू लागतात. हे सॉफ्टवेअर विद्युतवेगाने सर्व क्रिया करते. त्यामुळे माणसाचे मन ज्या वेगाने विचार करते, त्याच वेगाने त्याचे विचार आपल्या कम्प्युटर स्क्रीनवर दिसतात आणि आपण त्याची प्रिंटपण घेऊ शकतो. अंधारात हरवलेली एखादी वस्तू आपण सर्च लाइटचा प्रकाशझोत वापरून शोधू शकतो, तसे अर्धवट शुद्धीत असणाऱ्या पेशंटच्या मनात नेमके कोणते विचार

आहेत? हे या सॉफ्टवेअरमुळे आपण शोधू शकतो. म्हणून या नव्या सॉफ्टवेअरला मी 'सर्च लाइट' हे नाव दिले आहे.

'इट इज क्वाइट इंटरेस्टिंग... विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे कल्पनेत असणाऱ्या गोष्टी प्रत्यक्षात उतरू लागल्या आहेत... गुड... व्हेरी गुड,' इन्स्पेक्टर वायकर निनादला म्हणाले. तेवढ्यात डॉक्टर इन्स्पेक्टरांना म्हणाले, 'साहेब... तुम्ही म्हणता त्याप्रमाणे हा पेशंट आमच्यासाठी मिरॅकल आहे... त्याच्या मेंदूला जबर मार बसला होता. त्यामुळे मेंदूत रक्तस्राव झाला होता... बरगडी, खांदे, पाय यांच्यामध्ये फ्रॅक्चर होते, शरीरावर झालेल्या मोठ्या जखमांमुळे रक्तस्राव खूप झाला होता. त्यामुळे तो वाचेल असे वाटत नव्हते... बट नाऊ ही इज इंम्प्रुव्हिंग डे बाय डे.' डॉक्टरांचे बोलणे संपताच निनाद त्यांना म्हणाला, 'तो बरा होतो आहे, याचे श्रेय तुम्हाला जसे आहे तसेच ते सुमीलाही आहे.' 'ही सुमी कोण?' डॉक्टरांनी निनादला विस्मयाने विचारले. टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेल्या प्रिंट काढून त्या डॉक्टरांना दाखवित निनाद म्हणाला, 'या तरुणाच्या विचारांचा मी अभ्यास केला तेव्हा मला असे दिसून आले की हा तरुण नेहमी सुमी नावाच्या त्याच्या प्रेयसीशी बोलतो आहे.' डॉक्टर म्हणाले, 'निनाद, पेशंट जेव्हा सीरियस असतो, त्यावेळी त्याची प्रिय व्यक्ती, त्याचं ध्येय किंवा त्याचा एखादा विचार त्याला 'आतून' जगण्याची प्रेरणा देत असतो... त्याला मी ड्रायव्हिंग फोर्स म्हणतो. या ड्रायव्हिंग फोर्समुळे त्या पेशंटचं मानसिक बळ वाढतं आणि तो आमच्या ट्रीटमेंटला चांगला रिस्पॉन्स देऊ लागतो. याउलट एखादा पेशंट मानसिकरीत्या खचला असेल तर आमच्या ट्रीटमेंटला यश येईलच, असे सांगता येत नाही.'

डॉक्टरांच्या बोलण्याने उत्साहित होत निनाद म्हणाला, 'डॉक्टर... मला तर असे वाटते की याच्यापुढे जर सुमी प्रत्यक्षात आली तर हा ताड्कन उठून बसेल.' निनादकडे पाहून मंदपणे हसत डॉक्टर म्हणाले, 'देन दॅट विल बी मॅजिक... अतिशयोक्ती वाटते पण कदाचित तसे घडेल सुद्धा.' निनाद आणि डॉक्टरांचा असा संवाद सुरू असताना इन्स्पेक्टर वायकर मध्येच म्हणाले, 'यात काही अर्थ नाही.' त्यांच्या बोलण्यातील अस्वस्थता जाणवल्यामुळे दोघांनी त्यांच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. इन्स्पेक्टर दोघांकडे पाहत गंभीरपणे म्हणाले, 'या तरुणाची सर्व माहिती आम्ही काढली आहे. याचं नाव समीर देशमुख. बापुसाहेब बादाडे या श्रीमंत व्यापाऱ्याची मुलगी सुमीता आणि याचे प्रेमसंबंध होते. दोन्ही घरातून त्यांच्या प्रेमाला प्रखर विरोध होता. त्यांच्या प्रेमप्रकरणामुळे दोन्ही कुटुंबात नेहमी खटके उडत होते. त्याला कंटाळून हे दोघे पळून गोव्याला मोटरसायकलवर चालले होते. घाटातून जात असताना एका स्कॉर्पिओ गाडीने कंटेनरला ओव्हरटेक करताना यांच्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. त्यामुळे बाजूला असणाऱ्या खोल दरीत दोघेही उडून पडले.

त्यांच्या अपघाताची बातमी पोलीस कंट्रोलरूमला मिळताच मी माझ्या सहकाऱ्यासह तत्काळ तेथे पोहोचलो. अपघात पाहणाऱ्या लोकांनी ॲम्ब्युलन्स मागविली होती. आम्ही लगेच पंचनामा केला. सुमीता उंचावरून खाली एका खडकावर पडल्यामुळे जागेवर गतप्राण झाली होती तर हा जबर जखमी अवस्थेत होता त्यामुळे...'

इन्स्पेक्टर बायकरांचे बोलणे ऐकून मला जबरदस्त धक्का बसला. बाजूला उभ्या असणाऱ्या सुमीला मी विचारलं, 'सुमडे... हे इन्स्पेक्टर काय म्हणताहेत? ते खरं आहे का? मी तुला काय विचारतोय? तू माझ्याकडे फक्त पाहू नकोस... काहीतरी उत्तर दे... सुमे चेहऱ्यावर उसनं हसू आणू नकोस... लवकर सांग... काही तरी बोल... तुझा शब्द ऐकण्यासाठी मी आतुरलोय... तू काही बोलत नाही याचा अर्थ इन्स्पेक्टर म्हणताहेत ते खरं आहे. तू जर या जगात नसशील, तर माझ्या जगण्याला काय अर्थ आहे?... घरादाराशी असणारे आपले मायेचे पाश अगोदरच तुटले आहेत... मग आता बाट कोणाची पाहायची... चल निघुया.' असे म्हणत मी आधारासाठी माझा हात पुढे केला... हातातून व सर्व शरीरातून प्रचंड कळा निघत होत्या... माझा हात सुमीने अलगद तिच्या हातात घेतला... काय आश्चर्य! माझ्या वेदना क्षणात नाहीशा झाल्या... डोक्याचं बँडेज, पायावरचं प्लॅस्टर... शरीरावरचं बँडेज... हाताला लावलेलं सलाइन आपोआप गळून पडलं...

मी उठून क्षणात तिला कवेत घेतलं... सुमीनेही मला घट्ट मिठी मारली आणि कानात कुजबुजली 'आपलं प्रेम आज सफल झालं... आता जाउया पुढच्या प्रवासाला.' तिचे शब्द ऐकत असताना माझी नजर अचानकपणे काळ्या कुट्ट विवराकडे गेली आणि मी स्तिमित झालो. आतापर्यंत अस्पष्ट, धूसर दिसणारे काळेकुट्ट विवर मंद निळ्या प्रकाशाने झगमगत होते, विवराकडे जाणाऱ्या पायऱ्यांवर लुकलुकणाऱ्या चांदण्यांचा सडा पडला होता... मंद शीतल वारा वाहत होता... आसमंत एका अनामिक सुगंधाने भरला होता... दुरून कुठून तरी बासरीचे मधूर सूर मनावर रुंजी घालत होते... अशा धुंद व भारलेल्या अवस्थेत मी आणि सुमी पायऱ्या चढू लागलो... आमच्या नजरा एकमेकांत मिसळल्या होत्या... हात हातात गुंफले होते... आम्ही दोघं... दोघं न राहता एकरूप होत होतो.

पायऱ्या चढत असताना माझ्या कानावर शब्द आले. निनाद डॉक्टरांना म्हणत होते, 'डॉक्टर... हे अचानक काय होऊ लागलं... तो कार्डिओग्राम पाहा.... समीर इज सिंकींग... ही इज सिंकींग... डॉक्टर काही तरी लवकर करा.' डॉक्टर त्यांना म्हणत होते, 'मी प्रयत्न करतो... पण त्याचा काही उपयोग होणार नाही... ही इज रिअली अ मिरॅकल.'

– डॉ. सुनील विभुते

भ्रमणध्वनी : ९०२८८५२०५८

# सर्वे सन्तु निरामयाः

## श्रीराम बापट

बेल वाजली. मी दाराजवळच होतो. तरी उठून दार उघडेपर्यंत ३०-३५ सेकंद गेलेच. 'कोण असेल?' विचार करत दार उघडले. बाहेर कोणीच नव्हते. बेल वाजवणारा चपळाईने निघून गेला असावा. चरफडत दार बंद करणार, एवढ्यात खाली नजर गेली. एक छोटा लिफाफा जमिनीवर पडला होता. उचलून घेत दरवाजा बंद केला. आत एक चिठ्ठी होती. अक्षर परिचित व्यक्तींपैकी कोणाचे नव्हते. संदेश अगदी छोटा मोजक्याच ओळींचा होता... 'सावध रहा, तुमचा शोध काही लोकांसाठी फार नुकसानीचा ठरणार आहे. तुम्हाला संपवून किंवा जायबंदी करून त्या शोधाचा सामान्यांना फायदा होणार नाही, हे बघितले जाईल. शक्य असल्यास अज्ञात स्थळी जाऊन संशोधन पूर्ण केल्यावर त्याला प्रसिद्धी देऊन स्वामित्व हक्क मिळवा आणि मग परत या.'

मी कोणी मोठा संशोधक नाही. किंवा पदार्थविज्ञान-रसायनशास्त्राचा विद्यार्थी राहिलेलो नाही. माझे संशोधन अथवा प्रयोग मला स्वतःलाच क्रांतिकारक वगैरे वाटत नव्हते. माझी आज्जी आणि तिच्याकडून धडे घेतलेली माझी आई या दोघीही घरगुती वैद्य म्हणता येतील अशा होत्या. अपघातामुळे शरीराला झालेला अपाय सोडता नेहमी उद्भवणाऱ्या सर्व आजारांवर त्या उपचार करत असत. ते आयुर्वेदाला जवळ असणारे, पण अनुभवातून तयार झालेले होते. घरगुती वापरातील आले, लिंबू, सुंठ, मोहरी, दालचिनी, काही भाज्या, झाडांची पाने इत्यादींचा वापर करून त्या आमचे नातेवाईक आणि परिचित यांना हमखास बरे करीत. त्यामुळे आम्हा सर्वांनाच दंतवैद्य किंवा डोळ्यांचे डॉक्टर सोडल्यास इतर कोणत्या डॉक्टरकडे कधी जावे लागले नाही. एक-दोनवेळा अशी परिस्थिती ओढवली की कुटुंबातील काहींना नव्वदीनंतर नैसर्गिक मरण आले तरी कोण्या डॉक्टरचे उपचार चालू नसल्याने मृत्यूचा दाखला मिळण्याची पंचाईत झाली. यासाठी मग एका मित्राच्या डॉक्टर मुलाशी संधान बांधून आम्ही ते दाखले मिळवू लागलो. तो डॉक्टरही आपल्या चिवट आजार असणाऱ्या रोग्यांसाठी आईकडून गुपचूप औषध

घेऊन जात असे. नोकरीतून निवृत्त झाल्यावर मी या घरगुती उपचारांची जमेल तशी माहिती मिळवून काही प्रयोग करू लागलो होतो. निवृत्तीनंतर आईचा सहवास चार पाच वर्षेच लाभला. त्यातील जाणतेपणी दोन अडीच वर्षे तिने मला जी माहिती दिली, तिचा यशस्वी उपयोग मी परिचित रुग्णांसाठी करतोय.

थोडी चिकित्सक वृत्ती, आईकडून मिळालेले ज्ञान आणि आधुनिक वैद्यक शास्त्राचे वाचन यातून मी स्वतः काही औषधे तयार करत असतो. मी बनवत असलेल्या औषधांचे अलोपथी औषधांप्रमाणे साइड इफेक्ट्स नसतात. तसेच ती बाजारातील झटपट परिणाम करणाऱ्या महाग औषधांना पर्याय ठरणारी पण नसतात. माझ्या मर्यादित जनसंपर्कामुळे त्या औषधांचा अगदी थोड्या प्रमाणात होणारा वापर मोठ्या कंपन्यांच्या कमाईवर तसूभरही परिणाम करणारा नाही. मग या चिठ्ठीत वर्णन केल्याप्रमाणे कोणी माझ्या जिवावर का बरे उठेल? बहुधा कोणीतरी थट्टा करत असावे. माहितीतले सर्व चेहरे डोळ्यासमोर आणले. पण अशी थट्टा कोणी करेल, असे वाटत नव्हते. मी आणखी काय करत होतो, ज्यामुळे अन्य कोणाचे मोठे आर्थिक नुकसान होणार होते? खुर्चीतून उठून मी फेऱ्या घालू लागलो. तरतरी येण्यासाठी खिडकीजवळच्या मोठ्या पसरट कुंडीजवळ गेलो. त्यातील घनदाट गच्च पानांच्या जवळ जाऊन मी दीर्घ श्वास घेतला. एकदम हलके, रिलॅक्स्ड वाटले. हा अनुभव गेल्या वर्षभरात अनेकदा आला होता. मी धूम्रपान करत नाही किंवा कोकेनसारख्या कोठल्याही नशेच्या पदार्थाचा अनुभव अद्याप घेतलेला नाही. त्यातून तत्काळ येणारी तरतरी ही अशाच प्रकारची असेल काय, हा विचार मात्र कधीकधी मनात येतो.

लोक दारू पितात किंवा नशा निर्माण करणारे पदार्थ मुखावाटे सेवन करतात. ते पोटात जाऊन पोटातील पाचकरसांची प्रक्रिया झाल्यावर त्यातून झिंग येत असते. पण श्वसनाद्वारे येणारी तरतरी किंवा झिंग ही तत्काळ येते. कारण वायुरूप स्वरूपात असल्याने फुप्फुसात ते त्वरित रक्तात मिसळतात. यामुळे येणारी तरतरी, झिंग किंवा गुंगी त्यामुळे लगेच येत असावी. शस्त्रक्रियेच्या वेळी भूलतज्ज्ञ इंजेक्शन देतात तेव्हा पुढील चिरफाडीची वेदना जाणवू न देणारी रसायने रक्तात थेट मिसळत असल्याने रोग्याला लगेच गुंगी येत असते. या पानांच्या वरील हवेचा श्वास घेतल्याने तत्काळ तरतरी मिळते. शिवाय अन्य प्रकारची नशा उतरल्यानंतर एक सुस्तपणा, शिथिलता किंवा इंग्रजीत ज्याला हँग ओव्हर म्हणतात, तसे होत नाही हेही मला जाणवले होते. असे का बरे होत असावे?

एक कारण सुचले. ते म्हणजे या पानांकडून निर्माण होणारा वायू आरोग्यदायी चांगल्या प्रकारचा असावा, जो आपल्या श्वसनसंस्थेला वर्षानुवर्षे परिचित असावा.

असा वायू कोणता, तर ऑक्सिजन म्हणजेच प्राणवायू. आपल्या भोवतालच्या हवेत प्राणवायूचे प्रमाण सुमारे एकवीस टक्के असते. श्वास घेतल्यावर फुप्फुसातील वायुकोशांद्वारे यातील चारपाच टक्के प्राणवायू रक्तातील पेशींना पुरवला जातो आणि १५-१६ टक्के प्राणवायू उरलेली हवा नाकावाटे उच्छ्वासातून बाहेर टाकली जाते. हे होते निरोगी व्यक्तींच्या बाबतीत. पण वयोमानानुसार किंवा अन्य कारणांनी फुप्फुसांची कार्यक्षमता कमी होत जाते. वायुकोश चोंदले जातात किंवा त्यातून प्राणवायू पेशींमध्ये भरण्याच्या जागांना चरे पडतात, ज्याला इंग्रजीत पलमनरी फ्रायबॉसिस असे म्हणतात. त्या वेळी वातावरणातील हवा कमी उपयोगाची ठरते. कारण त्यात फक्त २१ टक्के प्राणवायू असतो. ज्यावेळी नेहमीच्या अन्नातून शरीराला पुरेशी पोषक द्रव्ये शोषून घेता येत नाहीत, तेव्हा आपण प्रथिने किंवा जीवनसत्त्वे बऱ्याच जास्त प्रमाणात असणारे पूरक अन्न घेतो. फुप्फुसांच्या आजारात त्याच प्रकारे प्राणवायू जास्त असलेली हवा श्वसनातून आत घेणे जरुरीचे ठरते. अन्यथा, अशक्तपणा येणे, ओठ किंवा हातापायांची बोटे निळी पडणे, सांध्याना सूज येणे, हृदयाचे ठोके वाढणे ही लक्षणे दिसू लागतात. मेंदूच्या पेशींना प्राणवायूचा पुरवठा झाला नाही तर मेंदू मृत होऊन रोगी कोमात जाण्याचीही शक्यता असते.

मग ही जास्त प्राणवायू असलेली हवा श्वसनासाठी कशी पुरवायची तर त्यासाठी माणसाच्या नाकातोंडाभोवती बसेल असा मुखवटा लावला जातो. प्राणवायूने भरलेल्या सिलिंडर्समधील प्राणवायू नळीद्वारे मुखवट्याच्या आत सोडला जातो. मुखवटा पूर्णपणे हवाबंद नसतो किंवा त्याला जाणूनबुजून छिद्रे ठेवलेली असतात. त्यामुळे काही प्रमाणात बाहेरची हवा सिलिंडरमधून येणाऱ्या प्राणवायूत मिसळली जाते आणि एकवीस ऐवजी गरजेप्रमाणे चाळीस ते साठ टक्के प्राणवायू असलेली हवा पाच ते दहा लीटर प्रति मिनिट दाबाने फुप्फुसात जाऊ दिली जाते. त्यातून पेशींना आवश्यक त्या प्राणवायूचा पुरवठा होतो. परिणामी, प्राणवायूच्या कमतरतेमुळे निर्माण झालेली शरीराची अवस्था सुधारते. फुप्फुसांची अवस्था फारच वाईट झाली असेल तर त्या रुग्णाला बाहेरची हवा न मिसळलेली शंभर टक्के प्राणवायू असलेली हवा नाकाद्वारे पुरवावी लागते. सिलिंडरमध्ये भरलेला प्राणवायू प्रचंड दाब देऊन द्रवरूप अवस्थेत भरलेला असतो. त्यामुळे तो थंड असतो. रुग्णाला तो प्राणवायू पुरवताना त्याचा दाब कमी करून, थोडा कोमट करून, तसेच त्यात आवश्यक आर्द्रता आणून पुरवावी लागते. हे सर्व डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आणि आवश्यक त्या साधनांच्या सहाय्याने शक्य होते. तसेच प्राणवायू पुरवणाऱ्या अशा यंत्रणेवर सतत लक्ष ठेवावे लागते.

हे सर्व सांगण्याचे कारण हे आहे की ही प्रक्रिया पुष्कळ खर्चीक असते. मानवजातीचे आयुष्य पूर्वीपेक्षा जास्त वाढल्याने प्राणवायू कृत्रिम साधनांद्वारे पुरवावा

लागणाऱ्या रोग्यांची संख्याही खूप वाढली आहे. त्यामुळे जास्त प्रमाणात प्राणवायू निर्माण करणे, तो साठवण्यासाठी प्रचंड दाब सहन करू शकतील अशी जाड धातूच्या पत्र्याने बनवलेली सिलिंडर्स बनवणे आणि बाहेर पडणाऱ्या वायूचा दाब नियंत्रित करणारे वॉल्व्ज निर्माण करणे आवश्यक बनते. बहुतेक सर्व गंभीर आजार असलेल्या रोग्याना डॉक्टर्स कृत्रिमरीत्या प्राणवायू पुरवठा देत असतात. हॉस्पिटल किंवा घरात प्राणवायूचा सततचा पुरवठा करत राहणे ही खूप मोठी खर्चीक बाब ठरते. सिलिंडर, त्यासोबत महाग वॉल्व्ज, ट्यूब, मास्क वगैरे विकत घेण्याचा खर्च कित्येक हजारांच्या घरात जातो. दीर्घकाळ प्राणवायू देण्यासाठी भाड्याने सिलिंडर आणि अन्य गोष्टी घ्यायच्या झाल्या तर ते सुद्धा खूप महाग पडते. शिवाय आतील प्राणवायू वापराने रिकामे झालेले सिलिंडर बदलून दुसरे सिलिंडर बसवणे किंवा आपले सिलिंडर पुन्हा प्राणवायूने भरून घेणे हा पुढचा खर्च पण असतोच.

प्राणवायू निर्माण करून त्याचा साठा करणे, सिलिंडर्स, दाब-नियंत्रक वॉल्व्ज बनवणे, त्यांची ने-आण या सर्व महाग गोष्टीना पर्याय अशी काही पैसे वाचवणारी, सामान्यांना परवडणारी पर्यायी व्यवस्था निर्माण करता येईल का? जेव्हापासून हे झाड मला घोटीजवळच्या जंगलात सापडले होते, तेव्हापासून या गोष्टीचा विचार माझ्या मनात येऊ लागला होता. एरवी रानटी समजल्या जाणाऱ्या, फळे-फुले न येणाऱ्या पण भरमसाठ वाढ असलेल्या या झुडपाच्या भरगच्च पानांचा वास मी प्रथम सहजगत्या घेतला आणि त्यावेळी दमलो होतो तरी एक सुखद तरतरी मला जाणवली. पुन्हा पुन्हा वास घेत असताना कोणत्याही अन्य वनस्पतीच्या अनेक पट प्राणवायू निर्माण करणे हा या वनस्पतीचा गुणधर्म माझ्या लक्षात आला. त्याचे एक रोप बरोबर आणून मी प्रयोगशाळेत तपासणी केली तेव्हा फोटोसिंथेसिस प्रक्रियेद्वारे तेवढ्याच आकाराच्या वनस्पतींच्या जवळजवळ वीसपट प्राणवायू निर्माण करण्याची त्याची क्षमता ध्यानात आली. हे झुडूप, याची पाने जणू प्राणवायू निर्माण करणारे यंत्रच आहे. समुद्रातील काही लहान आकाराच्या पाणवनस्पती सुद्धा अशाप्रकारे भरपूर प्राणवायू निर्माण करत असल्याचे नंतर वाचनात आले. शरीराला असलेली प्राणवायूची गरज भागवली गेली नाही तर होणारे गंभीर परिणाम करोना साथीच्या काळात समोर आले होते. ती गरज या झुडपाचा उपयोग करून भागवता आली तर?

प्राणवायू तीन प्रकारे निर्माण होतो. सूर्यप्रकाशात वनस्पती कार्बन डाय ऑक्साइडचे विघटन करून स्वतःसाठी क्लोरोफिल हे अन्न निर्माण करतात आणि प्राणवायू हवेत सोडतात. दुसऱ्या प्रकारात उणे २०० सेंटिग्रेड तापमानात प्रचंड दाबाखाली हवा द्रवरूप धारण करते. त्यातले नायट्रोजन आणि आर्गोन वायू विशिष्ट तापमानाला बाहेर पडतात आणि उरलेला प्राणवायू कोंडलेल्या अवस्थेत

शिल्लक राहतो. हे कारखान्यात केले जाते. जागच्या जागी प्राणवायू निर्माण करायचा झाल्यास सिंथेटिक गाळण्यातून हवा जाऊ दिली जाते. त्यावेळी अन्य वायू अडकतात; पण प्राणवायू पुढे सरकतो, तो साठवला जातो. यातील पहिला प्रकार काहीही खर्च आवश्यक नसणारा तर पुढील दोन प्रकार खर्चीक आहेत. पहिल्या प्रकारात प्राणवायू निर्मितीला काही खर्च येत नसला तरी त्यातून प्राणवायूचे हवेतील प्रमाण २१ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहते. अगदी कमी खर्चात या फुकट प्रक्रियेतून प्राणवायूचे हवेतील प्रमाण वाढवून ४५-५० टक्क्यांपर्यंत नेता आले तर? सध्या महाग असलेले कृत्रिम प्राणवायू पुरवण्याचे उपचार घेणे सर्वसामान्यांना शक्य होईल. ते कसे साध्य करायचे, यावर मी विचार करू लागलो.

पहिली बाब ही होती की ही झुडपे खूप मोठ्या संख्येने लागणार होती. अभ्यास केल्यावर असे आढळले की विशेष सुपीक नसणाऱ्या, अगदी रेताड जमिनीत सुद्धा ती सहजगत्या तग धरून वाढत होती. त्यांची फांदी आणि पाने सुद्धा जमिनीत खुपसल्यावर त्यांना मुळे फुटून ती अगदी थोड्या पाण्यावर भराभर वाढत होती. माझ्या घराभोवतीच्या छोट्या जागेत महिन्याभरात मी नर्सरी उभी केली. मिळेल त्या जागी कोन्याकोपऱ्यात, गच्चीवर ती तरारून वाढली. बाजूच्या प्लॉटवरील उंच घरातून पाहिले असता माझे घर हिरव्यागार गवतात उभे असलेल्या खेळण्यातल्या घराप्रमाणे दिसू लागले. माहितीतल्या एका मोठ्या कारखान्यात कच्च्या मालाचा पुरवठा दोन फूट बाय दीड फूट बाय नऊ इंच आकाराच्या प्लास्टिक खोक्यातून होत होता. मोठ्या संख्येने जवळजवळ फुकट उपलब्ध असलेले ते भंगार मी आनंदाने विकत घेतले.

त्यात मातीसकट ती रोपे व्यवस्थित बसत होती. यामुळे तयार होणाऱ्या उत्पादनाला एक विशिष्ट पक्का नियमित आकार मिळाला. अर्थात उघड्या झुडपातून तयार होणारा प्राणवायू सर्वत्र पसरत होता. त्याला कोंडून ठेवणे आवश्यक होते. स्वस्त, आकर्षक आणि टिकाऊ झाकण वर ठेवण्याची गरज होती. हल्ली अनेक मऊ फळे, भुसभुशीत बिस्किटे, केक हे पदार्थ वापरानंतर फेकून देण्याजोग्या स्वस्त प्लास्टिक ट्रेमधून मिळतात. ट्रेला कडा असल्या मुळे ते हलत नाहीत किंवा चिरडले जात नाहीत. ट्रे बनवणाऱ्या कंपनीशी संपर्क केला तेव्हा त्याच प्रकारच्या थोड्या जाड, टणक पारदर्शक प्लॅस्टिक मधे अशी झाकणे बनू शकतील असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. पहिला साचा बनवण्यास बारा हजार खर्च येणार होता; पण त्यानंतरची प्रत्यक्ष झाकणे प्रत्येकी फक्त वीस रुपयात बनवून मिळाली असती. चीनमधून आयात होणाऱ्या मालाचे पॅकिंग करण्यासाठी अशा अनेक स्वस्त गोष्टी वापरल्या जातात. खाचा असणारे थर्मोकोल, पुठ्ठ्याचे कार्टन्सप्रमाणे आपल्याकडे

या वस्तू देखील आता बनू लागल्या आहेत. या झाकणाला ट्यूब जोडण्यासाठी नऊ मिलिमीटर व्यासाचे भोक वरच्या बाजूला असणार होते.

माझ्याकडे ही रोपे नैसर्गिक सूर्यप्रकाशात वाढत असली तरी वापर करताना ती इमारतीच्या आत कमी प्रकाशात सूर्यप्रकाश पोहोचत नसलेल्या जागेत ठेवली जाणार होती. सूर्यप्रकाशात फोटो सिंथेसिस होते. तसाच प्रकाश सर्वकाळ निर्माण करणारी दीड फूट लांबीची ट्यूब चोक सहित चारशे रुपयांत मिळत होती. सुमारे तीन मीटर लांबीच्या वायर आणि प्लग-पिन सकट ती ट्यूब झाकणाच्या आत बसवण्याचा एकूण खर्च अंदाजे पाचशे रुपये येत होता. हा माझ्या प्राणवायू पुरवठा साहित्यातला सर्वात महाग भाग. पण तो आवश्यक होता. झुडुपातून तयार होणाऱ्या प्राणवायूला दाब नसल्याने एका छोट्या एक्झॉस्ट पंख्याद्वारे जास्त प्राणवायू युक्त हवा मुखवट्यापर्यंत पोचवावी लागत होती. घरात कृत्रिम प्राणवायू घेण्याची डॉक्टरी शिफारस असलेल्या दोन रुग्णांना मी माझ्या साधनाने प्राणवायू पुरवला आणि तो प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाला. आता शहरात कुठेही रुग्णाच्या घरात नेऊन हे किट बसवणे पंधरा-सोळाशे रुपयांत शक्य होणार होते. आणि त्यानंतर त्यावर आणखी काही खर्च करावा लागणार नव्हता.

येथपर्यंतचा पल्ला गाठत असताना माझ्या उपक्रमाची कुणकुण त्या व्यवसायातील कोणाला तरी लागली असावी. प्राणवायू निर्माण करणारी यंत्रणा बनवणारे उत्पादक, प्राणवायू बनवून तो सिलिंडरमध्ये भरून विकणारे कारखानदार, ती सिलिंडर वापरून त्याचे भरमसाठ पैसे आकारणारी हॉस्पिटल्स यांचे स्वस्त पर्याय उपलब्ध झाल्याने आर्थिक नुकसान होणार होते. त्यांपैकी कोणीतरी माझा काटा काढू पाहत होते. तेच मला माझ्या हितचिंतकाने निनावी पत्राद्वारे कळवले होते. नशिबाने पोलीस खात्यातील एक अत्यंत उच्चपदस्थ अधिकारी माझा चांगला मित्र असल्याने त्याच्याशी मी याबाबत बोललो. त्याने मला न घाबरता काम चालू ठेवण्यास सांगितले आणि त्यांच्या पद्धतीने शोध घेऊन संबंधिताना योग्य समज दिली. दाराबाहेर पूर्वीसारखेच, पण फक्त हास्यमुद्रा काढलेले पत्र अज्ञात व्यक्तीकडून ठेवलेले मिळाले. यावरून मला धोका टळल्याचा अंदाज आला.

आज अत्यंत कमी खर्चात फुप्फुस संसर्गबाधित गरीब रुग्णाना जास्त प्राणवायू असलेली हवा श्वसनातून घेणे शक्य झाले आहे. या यंत्रणेत आणखी सुधारणा होण्यासाठी प्रयत्न मी करत राहणार आहे. पण आहे त्या प्राथमिक अवस्थेतही त्याच्या उपयुक्ततेसाठी अनेक रुग्ण आणि त्यांचे संबंधित मला धन्यवाद देत आहेत.

– श्रीराम बापट

भ्रमणध्वनी : ९८१९९७८१३९

# कुमार बुद्धिमाने

## गजानन परब

दिनकररावांनी बाजूस पाहिलं. कुमार बुद्धीमाने शांतपणे त्याच्या खुर्चीत बसून होता. एक तास झाला होता. दिनकरराव आन्हिकं, नाश्ता उरकून वाचत बसले होते. बुद्धीमाने त्याचं आन्हिक म्हणजे डोक्यात साचलेला सगळा वैचारिक गोंधळ घालवून, डोळ्याकानात स्वच्छ करावयाच्या औषधांचे थेंब टाकून, तसेच इतर संवेदना ग्राहक उघडमीट करून आतल्या आत स्त्रवणाऱ्या द्रवानं स्वच्छ केले होते. त्यानं त्याचा चेहरा, गुळगुळीत टक्कल, चकचकीत हातपाय, आखीवरेखीव छाती स्वच्छ टॉवेलनं पुसून साफ केली होती. त्याचा चेहरा खऱ्या माणसाच्या चेहऱ्यासारखा तजेलदार दिसत होता.

त्यांनी कुमारला वाचनाचा बराच आग्रह केला होता. पण स्पष्ट शब्दांत त्यानं नकार दिलेला. म्हणाला होता. माझं भरपूर वाचन झालेलं आहे आणि आता मला फक्त विचारच विचार करायचा आहे. त्यावर दिनकरराव स्वतःच विचारात पडले होते.

दिनकररावांनी जेव्हा त्याला पसंत करून खरेदी करून घरी आणलं, तेव्हा त्यांना तो एखाद्या खेळण्यासारखाच वाटत राहिला होता. कंपनीच्या इंजिनिअरनं कुमारच्या सर्व क्षमतांची माहिती त्यांना दिली होती. त्याची क्षमता कशी विकसित करायची त्याविषयीही समजवून सांगितलं होतं. काही बाबतीतच त्यांना लागलीच तर इंजिनिअरची मदत घ्यावी लागणार होती. त्याचं नाव काय ठेवायचं किंवा ते तो इंजिनिअर ठेवून देणार आहे का याविषयी त्यांनी विचारणा करताच तो म्हणाला होता. त्याचं आम्ही त्याची रचना करताना ठेवलेलं नाव आहे इंटेलीग्रेटर. पण तुम्ही त्याचं नाव तुमच्या आवडीचं कोणतंही ठेवा. प्रेमानं, लाडिकपणं मारता येण्यासारखं. पण हा खरंच बुद्धीमान आणि जास्तीत जास्त स्वावलंबी आहे. ह्याचं नाव ठेवणं अगदीच सोपं आहे. ह्याला सांगा की, मी तुझं नाव असं असं ठेवलंय. मी तुला या नावानं नेहमी हाक मारीन. दिनकररावांना हसूच आलं. आताच ठेवतो झालं. मला फारसं काही सुचत नाही. तुम्ही हा खूप बुद्धिमान आहे म्हणता, मग याचं नाव मी बुद्धिमाने–कुमार बुद्धिमाने असं ठेवतो.

"झालं त्याला कळलं, तुम्ही त्याचं नाव काय ठेवलं ते. हाक मारून बघा."

दिनकररावांना थोडं बावचळल्यासारखं झालं. एखाद्या बाहुल्याशी बोलावं तसं ते बोलले. "कुमार बुद्धिमाने. मी तुझा मालक पालक म्हणून आवडतो का?"

फक्त अर्धा क्षण मध्ये गेला. कुमारच्या तोंडून रफी आणि मुकेशच्या आवाजाच्या मिश्रित आवाजातून ऐकू आलं, "सर तुम्ही मला खूप खूप आवडलात. कुमार हे नाव मला खूप आवडलंय."

दिनकररावांना सुरुवातीला काही दिवस कुमारला कामं सांगणं, ती त्याच्याकडून करून घेणं. तो काम करताना बघणं. हे सारं एखाद्या खेळण्याशीच आपण खेळतोय असं वाटायचं. खरं तर एक प्रयोग म्हणूनच त्यांनी त्याला आणलं होतं. पण दिवसेंदिवस त्याची उपयुक्तता वाढत गेली होती. घरातल्या सगळ्या कामांना त्यांच्या दिमतीला जसजसा तो पुरून उरू लागला तसतशी एक आदराची भावना त्यांच्या आत जागी झाली.

सुरुवातीला दिनकररावांना त्याची कामं खोटीखोटी काळजीपूर्वक केल्यासारखी वाटत नसत. कारण त्याच्या कामाचा वेग फारच होता. एखाद्या खऱ्या गड्याला स्वयंपाकघर स्वच्छ करायला जिथं अर्धा तास लागू शकतो, तिथं हा पठ्ठ्या पंधरा मिनिटांतच सगळं लखख करून टाकी.

एकदा दिनकररावांनी त्याला त्यांचे लिहिण्याचे मेज साफ करायला सांगितले. खरं तर मेज साफच होतं. वरचं कापडी आच्छादन त्यांनी स्वतःच झाडलं होतं. आधल्याच दिवशी ते धुतलंही होतं. कुमार शांतपणे आत गेला. एक नजर टाकून आला. हसतहसतच म्हणाला, "सर. काय हे. माझी परीक्षा घेता. कालच मी मेजाचे पाय, रकाने पुसून स्वच्छ केले आहेत."

दिनकररावांनी आणखी एकदा त्याला "बागेत जास्वंदीच्या झाडाखाली कचऱ्याचा ढीग साचून राहिलाय, साफ करून ये." म्हणून बागेत पिटाळलं. पण तो घराबाहेर जाऊन बागेत न जाताच परतला. खोखो हसत म्हणाला, "सर. पुन्हा तुम्ही माझी परीक्षा घेत आहात. मी पूर्ण केलेली कामंच करायला सांगताय. खरं तर मला तुमचा थोडा रागच आला होता. पण मी तो घालवून टाकला आहे."

दिनकररावांना त्याच्या बोलण्याचं नवल वाटलं. वाटलं, कुमारला यापुढे आपण एक जितीजागती व्यक्तीच समजायला हवं. नाहीतर तो स्वतःशी गैरसमज करून घेईल. आपण त्याची मधूनमधून चेष्टा करतो समजेल. एखाद्या वेळी तो खरोखरच रागावून काम करणं बंद करेल आणि मग पंचाईत निर्माण होईल. त्यांनी त्याची माहिती पुस्तिका पूर्ण वाचली होती. त्यानुसार ते सर्वथा त्याचे चालक, मालक होते. तो समोरच्या वस्तूस किंवा सजीवास दिनकररावांच्या आदेशानुसार

किंवा त्याला आधीच दिलेल्या स्वतःच्या, मालकाच्या संरक्षणासाठीच्या सूचनांनुसार हानी पोहचवू शकणार होता. त्यासाठी त्याच्या पोशाखात दडवलेलं सुरीसारखं हत्यारही होतं. एखाद्या प्राण्यापासून संरक्षण करावयाचे झाल्यास जवळची एखादी लाकडी किंवा मौल्यवान नसलेली वस्तू उचलून तिचे आघात तो त्या प्राण्यावर करू शकणार होता. पण दिनकररावांना तो कदाचित त्याच्यात काही बिघाड झाल्यास, तो त्या दिवशी बोलल्याप्रमाणे त्याला राग आल्यास आपल्याला त्याच्या हाताची थप्पड लगावेल नाहीतर हातघाईवर येईल अशी भीती वाटे. तसे त्याचे हात माणसासारखेच मऊ होते. पण ताकदीची कामं करताना ते राकट होत.

दिनकररावांनी हलकेच डोळे उघडले. चांगलीच सकाळ झाली होती. थंडीचे दिवस असल्याने पांघरूण दूर करून उठावसंच वाटत नव्हतं. गारवा कमी झाला नव्हता. आरशावर पांढरट बाष्पाचा थर जमा झाला होता. त्यांनी कानोसा घेतला. कुमारच्या कामाची खुडबुड ऐकू आली. तो एकेक काम फटाफट पार पाडणार होता. शेवटी नाश्त्याचे पदार्थ तयार करणार होता. दिनकररावांनी नाश्त्याचं आठवड्याभराचं वेळापत्रक त्याला आखून दिलं होतं. आज बुधवार होता. तो पावलोणी, ऑमलेट, फ्रेंच फ्राईज, कॉफी करणार होता.

दिनकररावांनी विचार करून पाहिलं, मेनूत बदल करावासा वाटला नाही. एरव्ही कुमारला घरी आणण्याआधी घरातली बरीचशी कामं आणि नाश्ता स्वतः करत तेव्हा असं काही वेळापत्रक त्यांनी आखलेलं नव्हतं. बऱ्याचदा लागोपाठच्या दिवशी एकसारखाच मेनू असायचा. स्वयंपाक करायला येणाऱ्या रमणीला नाश्ता करायला येता आलं असतं, पण खर्च वाढणार होता. त्याशिवाय रमणीला दोन वेळा येणं परवडत नव्हतं. एकदाच येऊन सगळं करून जाईन म्हणाली होती. आणखी एक आता असं होतं की, कुमारच्या हातचा नाश्ता खाताना कधीकधी एका यंत्राच्या हातचं आपण खातोय आणि मधूनच एखाद्या घासाला वंगणाचा वास येतोय असं वाटून जायचं. तसं खरंतर कुमारला खरोखरंच त्याच्या हातापायांच्या, मानेच्या, मनगटांच्या लहानमोठ्या सांध्यांना नियमितपणं वंगणपाणी करावं लागे. पण ते उग्र वासाचं आणि तेलकट असं नसे. आठवड्यातून गरजेप्रमाणे एकदोनदा नाजूक ब्रशनं सांधे साफ करून पिचकारीनं वंगणपाणी करी. त्याचे हातपाय जवळजवळ तीनशेसाठ अंशातून फिरत. साधारण पाच मिनिटांत त्याचं हे स्वतःचं शरीर ठीक करायचं काम पूर्ण होई. नंतर तो जागच्याजागी चार-पाच उड्या मारी, हातपाय झाडी, ते विविध कोनातून फिरवी, पाच-दहा पावलं पुढंमागं चाले, पळे.

दिनकरराव बऱ्याच वेळा कुमारचं हे सारं पाहत राहत. त्यांना गमतीनं वाटे, आपल्या दामाडे न्हाव्याला बोलवून कुमारची सर्व अंगाची तेलमालिश करून कडक

चंपी करावी. मनातल्या मनात त्यांना हसू येई.

कुमारचं सगळं अंग मॅट फिनिशचं होतं. त्यामुळं तो घरात वावरताना लकाकीचा त्रास होत नसे. दिनकररावांना कुमारनं पार पाडलेल्या कामांकडे कधीच पाहावं लागत नसे. जेव्हाकेव्हा ते घरभर किंवा आवारात फिरत तेव्हा तेव्हा त्यांना काही खटकणारं सापडत नसे. एखादी वस्तू चुकीच्या जागी ठेवलीय, एखादा कोपरा साफ करायचा राहिलाय, शिस्तीत लावलेल्या फुलझाडांपैकी एखाद्याची छाटणी राहिलीय असं होतं नसे.

त्यांना कधी रात्री पाणी हवंसं वाटलं किंवा एखादं वाईट स्वप्न पडून जाग आली तर शेजारच्या खोलीत निजलेला कुमार जागा होऊन बिछान्यात उठून बसे. त्यांच्या आणि त्याच्या खोलीतला रात्रीचा दिवा आपोआप लागे. सीसीटीव्ही कॅमेरे सगळीकडेच होते. ते सगळे कुमारच्या ॲलर्ट, ॲक्शन व्यवस्थांशी जोडलेले होते.

दिनकररावांनी हळूच मारलेली हाकही त्याला ऐकू जाई आणि तो उठून त्या नव्या खोलीत जाई. त्यांना पाणी हवं असल्यास पाणी आणून देई. पण बऱ्याचदा दिनकरराव स्वतःच उठून स्वयंपाकघरात जात आणि पाणी पित. बाटल्यास कपभर दूध घेत आणि परत येऊन पलंगावर पसरत. इकडं सगळं ठीकठाक झाल्याची खात्री पटताच कुमार स्वतःला अर्धा बंद करून झोपून जाई.

दिनकरराव बागेत फेरफटका मारत होते. बागेत घराच्या एका बाजूस थोडी मोठी झाडं आणि दाट झुडपं होती. फिरता फिरता त्यांचं लक्ष गेलं. कुमारनं पाचोळा आणि काट्याकुट्यांचा एक मोठा ढीग एका कोपऱ्यात तयार करून ठेवला होता. आश्चर्य म्हणजे त्या ढिगावर एक मेलेला सापही होता. त्यांनी कुमारला जोरात हाक मारली. तो कुठूनसा जोरजोरात पावलं टाकत आला. त्यांच्याकडं प्रश्नार्थक चेहरा करून बघत राहिला. बोट दाखवून विचारलं,

‘‘हे काय आहे आणि ह्याला कुणी मारलं?’’

कुमार काहीच न बोलता कामास लागला. ते पाहतच राहिले . त्यांना पुन्हा विचारावसं वाटलं. पण गप्पच राहिले. तो काय करतो ते बघत. कुमारनं धावत जाऊन एक टोपली आणली होती. त्यानं सालासकट तो ढीग फावड्यानं टोपलीत भरला. टोपली डोक्यावर घेऊन तो आवराबाहेर गेला. दिनकरराव त्याच्या पाठोपाठ थोडं अंतर गेले. तो थोडा दूरवर एका झाडापाशी गेला. डोक्यावरची टोपली खाली घेऊन ती त्या झाडाखाली त्यानं ओतली. दिनकरराव पाहतच राहिले. झाडाखाली ओतलेल्या पाचोळ्यातून गुंडाळी करून भरलेला तो साप वळवळत दूरवर निघून जात होता. बघताबघता तो दिसेनासाही झाला. दिनकरराव आश्चर्यानं डोळे विस्फारून पाहतच राहिलेले.

कुमार हळूहळू चालत परतला. त्याच्या चेहऱ्यावर स्मित होतं. दिनकरराव विचारण्याआधीच तो उत्तरला. ''सर, माझ्यातून घातकी प्राणी नजरेस पडताच त्यांना काही प्रमाणात निष्क्रिय करणाऱ्या लहरी प्रक्षेपित होतात. साप त्या लहरींमुळेच निष्क्रिय झाला होता. मी त्याला पूर्ववत सक्रिय केलं आणि तो जंगलात निघून गेला. मघाशीच मी बोलणार होतो, पण कसं ते राहिलंच.''

''म्हणजे तू सर्पमित्र सुद्धा आहेस.''

त्यावर क्षणभरच विचारात पडून तो थोडासा हसला.

वार्धक्यात माणसानं दीर्घायुष्यासाठी शरीर शक्य तितकं क्रियाशील ठेवणं आवश्यक असतं. त्यासाठी घरातली काही कामं, सकाळ-संध्याकाळ चालणं, एरोबिक्ससारखे हलके व्यायाम, दीर्घ श्वसन करणं गरजेचं असतं. तसंच संतुलित पौष्टिक आहार घ्यायचा असतो.

दिनकरराव वर्तमानपत्रातली मेडिकल टिप वाचत होते. याआधीही अशाच प्रकारच्या वृद्धांसाठीच्या आरोग्यासाठीच्या टिप्स वाचल्या होत्या. त्यांनी तत्क्षणी निर्णय घेतला आणि कुमारची काही कामं कमी केली. अर्ध आवार आणि स्वतःचं शयनगृह साफ करायचं काम त्यांनी स्वतःकडं घेतलं. आणखी काही किरकोळ कामंही त्यांनी स्वतःकडे घेतली.

गेल्या काही दिवसांपासून दिनकररावांचे पाय, पोटऱ्या चालताना दुखू लागल्या होत्या. ते सहज कुमारशी बोलले, ''कुमार, गेल्या काही दिवसांपासून माझे पाय दुखू लागलेत.''

''हात्तिच्या! इतकंच ना? मी बरे करण्याचा प्रयत्न करतो.'' त्यानंतर दुपारी जेवल्यानंतर कुमारनं त्यांचे पाय, पोटऱ्या थोडंसं तेल चोळून मालीश केल्या. त्यांचं पाय दुखणं कमीही झालेलं. त्यानं केलेलं मालीश त्यांना शास्त्रशुद्ध वाटलं. त्यांना त्याविषयी आभार मानून म्हणाले, ''थायी मसाज केलास वाटतं तू.''

''अर्थात.''

''आणखी कोणकोणत्या प्रकारचं मालीश येतं तुला?'' दिनकररावांनी विचारलं.

''स्वीडिश आणि दक्षिण भारतीय.'' कुमारनं उत्तर दिलं.

आता कुमारला दिनकररावांच्या घरी येऊन दीडेक वर्ष झालं होतं. दिनकररावांना त्याचा लळाच लागला होता. तो त्यांच्या एखाद्या नातेवाईकासारखाच त्यांना वाटू लागलेला.

कुमार आता काहिसा स्वावलंबीही झालेला. पूर्वी काम नसताना आराम करत बसून राहण्याची जागा ठरलेली होती. पण आता तो कधी बागेत तर कधी व्हरांड्यात बसून राहायला लागला. आणि दुसरं, त्याच्या वाचनाचं प्रमाणही वाढलं होतं.

‘‘मला काही दिवसांची सुट्टी हवी आहे.’’

दिनकरराव नेहमीप्रमाणे व्हरांड्यात आरामखुर्चीत वाचत बसले होते. त्यांनी मान वर करून एकवार कुमारकडं पाहिलं.

‘‘मला घरकाम करून थोडासा कंटाळा आलाय. कुठंतरी फिरून यावंसं वाटतंय. मी सात-आठ दिवसांचं पर्यटन करून यायचं ठरवलंय.’’ कुमार हळूहळू बोलला होता.

‘‘पर्यटनाला जाणार? एकट्यानं?’’ दिनकररावांनी विचारलं.

‘‘आजकाल बहुतेक टूरमध्ये माझ्यासारखे कुणी ना कुणी असतातच.’’

‘‘पण मला कंपनीला विचारायला हवं.’’

दिनकरराव चेहेऱ्यावर नाराजी न दाखवता बोलले.

‘‘सर, कंपनीबरोबर झालेल्या करारात याविषयी सगळं आहे.’’

‘‘पण खर्च कोण करणार?’’ दिनकररावांनी विचारलं.

‘‘तो सगळा कंपनी करणार. आमच्यासाठी सवलतीचा दर आहे. कारण आम्हाला खाणंपिणं काही लागत नाही. तुम्ही दरमहा माझ्यासाठी कंपनीला जे पैसे भरता त्यातूनच माझ्या सहलीचा खर्च कंपनी करणार आहे.’’ दिनकररावांना हसू आलं.

त्यांनी विचारलं, ‘‘तू कुठं जायचं ठरवलं आहेस?’’

‘‘मी संपूर्ण काश्मीर बघून यायचं ठरवलंय.’’

‘‘छान. पण तिथली थंडी सहन होईल का तुला?’’

‘‘नक्कीच होईल. तशी ती मला सहन होणारी नसेल तर, कंपनीनं मला तिकडं जाण्याची परवानगीच दिली नसती. खरं तर कंपनीनंच ठरवलंय मला पर्यटनाला पाठवायचं. माझ्या दृष्टीतून दिसणारं काश्मीर कंपनीला जाणून घ्यायचं आहे.’’

दिनकरराव थोडं आश्चर्य वाटून विचारात पडले. पण हसत बोलले, ‘‘पण घरातली कामं कोण करणार?’’

‘‘तसं कंपनीला कळल्यास कंपनी एखादा बदली गडी पाठविल. इथं आल्याबरोबर तो इथलं सगळं आत्मसात करेल. पण मला वाटतं, सध्या तुम्ही माझी काही कामं कमी केलीत. ती स्वत:कडे घेतलीत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून तुमचं शरीर जास्त तजेलदार दिसू लागलंय.’’

कुमारनं उत्तर दिलं. ‘‘ठीक आहे. तू पर्यटनाला गेल्यावर तू केलेलं चित्रण पाठवत राहा. केलेल्या गमतीजमती, तुझे विचार कळवत राहा. त्याशिवाय दृष्टीशीही माझा मोबाईल, टी.व्ही. जोडून ठेव. मला घरबसल्या हवं तेव्हा तू जे जे पाहशील ते ते दिसत राहिल.’’

कुमार पर्यटनाला निघून गेला. दिनकररावांना घर सुनं सुनं वाटू लागलं. कामं डोईजड होत नव्हती. एखाद्या दिवशी आवार साफ नाही केलं तरी चालत होतं. घरातल्या साफसफाईचंही तसंच होतं. टॉयलेट, बाथरूम आणि स्वयंपाकघर मात्र रोजच्या रोज स्वच्छ करणं आवश्यक होतं. ते काही त्यांना अवघड, कष्टाचं वाटत नव्हतं. शरीराला मिळणारा रोजचा व्यायाम वाढला होता आणि त्यामुळं त्यांना बरंच वाटू लागलं होतं. ते रोज मधून मधून कधी मोबाईलवर, तर कधी टी.व्ही.वर कुमारच्या नजरेतून पाहत होते. जणू काही प्रमाणात तो करत असलेलं पर्यटन अनुभवत होते. त्याच्यासोबत त्याच्यासारखे आणखी तीनजण होते. एक त्याचा मित्र होता. दुसरा एकजण आणि त्याची मैत्रीण होती. बाकीची सारी माणसं होती. कुमार मधून मधून दिनकररावांशी बोलत होता. घरातल्या कामाची चौकशी करत होता. तसंच त्यांची खुशाली विचारत होता. त्याच्याविना काही अडत तर नाही, तो चिंता व्यक्त करत होता. काय झालं काही कळत नव्हतं. अचानक सगळं बंद पडलं होतं.

कुमारकडून येणारे सगळे संदेश थांबले होते. त्याच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क राहिला नव्हता. दिनकररावांनी त्याच्याशी उपलब्ध असलेल्या सर्व मार्गांनी संपर्क साधण्याचे प्रयत्न केले. पण अजिबात प्रतिसाद मिळाला नाही. त्यानं पाठवलेले व्हिडिओ, त्याच्या नजरेतलं चित्रण तेवढं पुन्हा पुन्हा पाहता येत होतं. त्याचा संपर्क कधी तुटला तेही दिनकररावांना शोधता येत नव्हतं. शेवटी दिनकररावांनी कंपनीच्या त्या इंजिनिअरशी संपर्क साधला.

इंजिनिअर जणू वाटच पाहत होता. तो पटकन बोलला. ''दिनकरराव महामिने. कळवण्यास अत्यंत खेद वाटतो की, तुमचा कुमार आता या जगात राहिलेला नाही. तो तिकडं श्रीनगरमध्ये पर्यटकांना खरेदी करण्यासाठी जाण्यास दिलेल्या मोकळ्या वेळात एकटाच कुठंतरी रमतगमत भटकत गेला. पण दुर्दैवाने रस्ता ओलांडताना त्याला एका ट्रकनं उडवलं. बाजूनं जाणाऱ्या भरधाव ट्रकखाली येऊन त्याचा पूर्ण चुराडा झाला. आपल्याला तातडीने गडी हवा असल्यास त्याच्याशी साम्य असलेला दुसरा कंपनी लगेच देऊ शकेल. त्याच्या आणि कंपनीच्या वतीने मी दिलगिरी व्यक्त करतो.''

दिनकरराव सगळं ऐकून सुन्न झाले. इंटेलीग्रेटर ऊर्फ कुमारच्या गेल्या दीड वर्षांच्या आठवणींनी ते बेजार झाले. काही न बोलता त्यांनी मोबाईल बंद करून बाजूस ठेवला. अवघडल्या अवस्थेत खुर्चीत बसून राहिले. दोन टपोरे अश्रू त्यांच्या दोन डोळ्यांतून खाली घरंगळले. हळूहळू सरकत ते सुरकुतल्या गालांवर खालीखाली आले. सुरकुत्यांत अडकून तिथंच सुकून गेले.

– गजानन परब

भ्रमणध्वनी : ९८३३७१७४६०

# पुस्तक परिचय

## एकनाथ आव्हाड : ९८२१७७७९६८




### शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनेला उजागर करणारा काव्यसंग्रह

सदानंद पुंडपाळ हे महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध बालसाहित्यकार, कथाकार, समीक्षक आणि कवी आहेत. कवितेतही त्यांनी अनेक प्रयोग केलेले आहेत. 'गेला विवेक कोणाकडे?' हे विडंबन काव्य, 'सुखाचे नको सोबती' हा दोहे संग्रह, 'आरोळ्या' हा चारोळी संग्रह आणि नव्यानेच प्रसिद्ध झालेला 'लोटू नको दूर' अभंग संग्रह सुद्धा आहे. शिवाय अनेक गजलाही त्यांनी लिहिलेल्या आहेतच. आता त्यांचा 'चाहूल सूर्यास्ताची' हा कवितासंग्रह प्रणाली प्रकाशनातर्फे नुकताच प्रसिद्ध झाला आहे. चोपन्न कवितांचा समावेश असलेल्या या पुस्तकात बहुतांश कविता शेतकऱ्यांचं आयुष्य शब्दांत मांडणाऱ्या आहेत. या कविता वाचताना आपलंही हृदय पिळवटून जातं. खरंतर, शेतकऱ्याचं जीणं शेतीवर आणि त्या लहरी पावसावर अवलंबून असतं. अवकाळीचा फेरा सगळं लुटून नेतो. पण कुटुंबाकडे पाहून शेतकरी आपला धीर सुटू देत नाही. हे सांगताना कवी 'राबून मेला आजा पंजा' या कवितेत म्हणतो,

*अवकाळीचा तो फेरा, नेतो सगळं लुटून*
*रडे धाय मोकलून, जातं काळीज फाटून*
*तरी धीराने झुंजतो, माझा शेतकरी राजा*
*असाच राबून मेला, माझा आजा आणि पंजा.*

पुंडपाळ यांची कविता वाचताना अनेकदा कवितेतील आशय आपल्या भोवती फेर धरतो. ओळींना जेव्हा अर्थ प्राप्त होतो तेव्हा डोळ्यांसमोर नकळत त्या आशयाचे चित्र उभे राहते, ही त्यांच्या कवितेची ताकद आहे.

'बाप माझा' या कवितेत ते सहज लिहून जातात,

*उभ्या पिकातल्या पाखरांची,*
*सुरू होता कणसासंगे फुगडी*
*सांगत असे नका फिरवू गोफणी,*
*चोच त्यांची पिलासाठी उघडी.*

ह्या ओळी वाचत असताना कंसातील दाणे टिपण्यासाठी आलेल्या पाखरांची कणसासंगे सुरू असलेली फुगडी डोळ्यांसमोर उभी राहते. आणि त्या पुढच्या ओळी आपल्या हृदयात घर करून राहतात. संवेदनशीलतेला साद घालतात. सांगतात की तुम्ही गोफणी नका फिरवू. पिलांसाठी ती पाखरं दाणे न्यायला आली आहेत.

त्यांची कविता चांगुलपणाला मानणारी, एकमेकांसंगे सुखाने राहण्याची आस आणि जगण्याची उमेद वाढवणारी आहे.

'बोलू शब्द साजरे' या कवितेत ते म्हणतात,

*देऊ घासातला घास दुज्या,*
*बोलू शब्द साजरे मुखाने*
*वसुंधरा माता सकलांची,*
*राहू एकमेकांसंगे सुखाने*

पुंडपाळ यांची कविता चांगुलपणा जोपासणारी आहे तशीच ती जगण्यातला आशावाद आणि धीर, धारिष्ट्य, निग्रह निर्माण करणारीदेखील आहे.

*भीती, दुःख, दैन्य वरती धाडायचं*
*आडवं येणाऱ्याला तिथेच गाडायचं*
*लक्षात ठेव आता नेटानं लढायचं*
*राजा, नाही आता जराही रडायचं*

आईबद्दल जिव्हाळ्याने लिहिताना त्यांचा कवितेतील आत्मस्वर आपल्याला ऐकू येतो 'आई माझी शहाळ्याचे पाणी' या कवितेत ते म्हणतात,

*देवाहूनही प्रिय मज माझी आई,*
*लगडलेली फळांनी ती आमराई*
*वास जाणवे तिचा ठायी ठायी*
*अंगणी फुलली जशी रातराणी*
*आई माझी शहाळ्याचे पाणी*

या पुस्तकाला सुप्रसिद्ध कवी अशोक लोटणकर यांची प्रस्तावना लाभली आहे. प्रस्तावनेत ते म्हणतात, 'पुंडपाळ यांच्या कविता सामाजिक संघर्ष आणि जाणिवांच्या कविता आहेत. शेतकरी जगायला हवा हा मूलभूत संदेश कवीने कवितेतून अधोरेखित केला आहे.'

या पुस्तकाची पाठराखण करणारे साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस म्हणतात, 'ही कविता रूपक, प्रतिमा, प्रतिकांच्या जंजाळात अडकत नाही. सहज साध्या शब्दांची निवड करून ती आपल्यासमोर येते. या कवितेत शेतकऱ्यांच्या दुःखाचा तळ शोधण्याचा केलेला प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहे. ही कविता कृषिजन्य संस्कृतीच्या बहुतांश शोधात स्वतःची पायवाट निर्माण करत आहे.'

या सर्व गोष्टींची प्रचिती आपल्याला हा कवितासंग्रह वाचताना येते.

शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनेला उजागर करणारा हा कवितासंग्रह प्रत्येकाने वाचावा असाच आहे.

**चाहूल सूर्यास्ताची (कवितासंग्रह)**
कवी - सदानंद पुंडपाळ
प्रकाशक - प्रणाली प्रकाशन
पृष्ठे - ८४, किंमत - २००/- रुपये




**आखुडशिंगी प्रत्ययकारी आश्वासक कथासंग्रह**

अशोक शेटे हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एक कल्पक, उपक्रमशील शिक्षक, मुक्त पत्रकार, कवी व स्तंभ लेखक म्हणून अनेकांना परिचित आहेत. अनेक सामाजिक चळवळीत ते सक्रिय सहभागी असतात. नुकताच त्यांचा चपराक प्रकाशनाकडून 'अनुभवाचे अंतरंग' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे.

या कथासंग्रहातील सर्वच कथा लांबीने छोट्या पण आशयाने मोठ्या आहेत. थोडक्यात 'घागर में सागर' या प्रकारात त्या मोडणाऱ्या आहेत.

'उपक्रमांचा किडा' ही कथा आजच्या काळातली आहे. फेसबुक, फ्रेंड रिक्वेस्ट, मेसेंजर, चॅटिंग यांसारख्या विषयांभोवती फिरता फिरता नकळत कथाविषयाला वेगळीच कलाटणी मिळते. वाचक शेवटपर्यंत कथेत गुंतून राहतो.

'माझ्या लग्नाची गोष्ट' ही कथा एका शिक्षण सेवकाच्या सुरुवातीच्या आयुष्याची जणू चित्तरकथाच सांगून जाते. परिस्थितीचे टक्केटोणपे खात, धडपडत, मार्ग काढत, काटकसरीतून, तडजोडीतून सुंदर आयुष्य उभे राहू शकते, जीवनाचे हे मर्म ही कथा अगदी सहजगत्या सांगून जाते.

'न हरवलेली सुमन' ही कथा न हरवलेली सुमन कशी सापडली? यातून गोडेगावाला एक अख्खी रात्र खळखळून हसायला कोणतं कारण मिळालं? यां-सारख्या प्रश्नांची मजेशीर उत्तर देते.

'लग्न मंडपातील रेडिओची गोष्ट' ही कथा रेडिओवरचं गाणं ऐकता ऐकता ते गाणं जसं मनात रेंगाळत राहतं. तशीच ही कथाही मनात रेंगाळत राहते. ही कथा जरी साधी सोपी असली तरी तिला अंतरिक ओघवतेपण आहे. लेखक कथेला शेवटाकडे नेताना सुंदर म्हणीची पेरणी करतो. 'रेडिओ बंद झाला तरी चालेल, संसार सुरूच राहिला पाहिजे', या म्हणीचा अर्थ उलगडणारी ही कथा मनात अगदी घट्ट फिट्ट बसून राहते. आणि नकळत ओठांवर हसूही फुलवते.

'छडीपलीकडचा धडा' ही कथा प्रत्येक शिक्षकाला अंतर्मुख करणारी आहे. विद्यार्थी हा प्रेमळच असतो, फक्त त्याला आपण समजून घेतलं पाहिजे. खरंतर, शाळेत विद्यार्थी जसा घडत जातो तसाच विद्यार्थ्यांच्या सहवासात शिक्षकही नकळत घडत असतो हेच सांगणारी प्रेरक कथा प्रत्येक शिक्षकाने वाचलीच पाहिजे.

'पासपोर्ट' ही कथा रोहित नावाच्या एका शिक्षकाची. परदेशातील शिक्षण पद्धती अभ्यासण्यासाठी शिक्षकांना संधी मिळणार होती. जर आपल्याला परदेशात जायचे असेल, या संधीचा लाभ घ्यायचा असेल तर आपल्याकडे पासपोर्ट हवा म्हणून आपण आधी पासपोर्ट काढून ठेवूया म्हणून त्या शिक्षकाची धडपड सुरू होते. इतकी ही साधी गोष्ट. पण त्या धडपडीत आपलीच जवळची माणसे अनेक अडथळे निर्माण करतात. तेव्हा तो शिक्षक उद्विग्न होतो आणि एका विचारापर्यंत पोहोचतो. तो विचार म्हणजे, विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारा हुशार शिक्षक घडवायचा असेल तर त्याला भीती नाही, तर प्रोत्साहन मिळायला हवं. हा संदेश ही कथा वाचकांच्या मनापर्यंत पोहोचवते.

'गुरज्या... मपलं लगानं झालं बा..' या कथेतून बालविवाहाची भीषणता आणि त्याचे दूरगामी परिणाम प्रभावीपणे उलगडले आहेत. 'बोर' या कथेत एका प्रामाणिक सामाजिक कार्यकर्त्याच्या निःस्वार्थ बृत्तीमुळे गावाच्या विकासाला कशी सकारात्मक दिशा मिळू शकते, हे अधोरेखित केले आहे. 'पुरस्कार' आणि 'येथे सी.आर. बदलून मिळतील...' या कथांमधून शिक्षण क्षेत्रात शिरलेल्या अनिष्ट प्रवृत्ती व नैतिक अधःपतनावर नेमके भाष्य केले आहे. 'बांधाचा बळी' ही कथा ग्रामीण भागातील भाऊबंदकीच्या विळख्यात अडकलेल्या वास्तवाचे विदारक चित्र रेखाटते. 'संकल्प एका नव्या चैतन्याचा' या कथेत शहरी तरुणाने आपल्या गावाशी नाळ जपून सामाजिक परिवर्तन कसे घडवून आणता येते, याचा प्रेरणादायी संदेश दिला आहे. तसेच 'पतिव्रता... परिस्थितीने दिलेला निर्णय' आणि 'वासना...

अपराध की सबब' या कथांमधून संवेदनशील सामाजिक विषयांना धाडसाने स्पर्श करत वेगळा कथनप्रयोग करण्यात आला असून, तो प्रभावी आणि यशस्वी ठरल्याचे जाणवते. एकूणच या पुस्तकातील सर्वच कथा अनुभव समृद्ध करणाऱ्या आणि वाचकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत.

या पुस्तकाला ज्येष्ठ साहित्यिक संदीप वाकचौरे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. ते म्हणतात, अशोक शेटे यांच्या 'अनुभवाचे अंतरंग' या कथासंग्रहातील भाव अत्यंत तरल आहे. अनुभव टिपण्याची दृष्टी, निरीक्षण शक्ती अधिक सूक्ष्म आहे. एखाद्या घटनेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही अनेक कथांमध्ये प्रतिबिंबित झालेला आहे. त्यांचा हा कथालेखनाचा पहिलाच प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.'

ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. कैलास दौंड यांनी सकारात्मक जीवनभाष्य करणारा एक तरल कथासंग्रह म्हणून 'अनुभवाचे अंतरंग' या कथासंग्रहाचा गौरव केला आहे. ते म्हणतात, 'या कथासंग्रहातून लेखकाचे अत्यंत संवेदनशील मन आणि सभोवतालच्या घटनांकडे पाहण्याची विलक्षण दृष्टी चांगुलपणाचा परिपोष आणि सत्याचा शोध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न डोकावतो.'

प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांची पाठराखण पुस्तकाला लाभली आहे. त्यात ते म्हणतात, 'आखूड काया असलेल्या ग्रामीण भागाच्या या कथा आजोबांनी नातवाला आस्थेने गोष्टी सांगाव्यात अशा सहजपणे लेखक सांगताना दिसतो. वाचकांना त्या आपल्या वाटणे हेच या लघुकथांचे यश ठरावे. या तीनही मान्यवरांचे कथासंग्रहाबाबतचे विवेचन या कथा वाचताना मनोमन पटते.

अशोक शेटे यांचा हा पहिलाच कथासंग्रह असला तरी तो वाचकांचे लक्ष वेधून घेणारा आहे. अशोक शेटे एक उत्तम शिक्षक असल्यामुळे या पुस्तकातील बऱ्याच कथा विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा या विषयांना उजाळा देणाऱ्या ठरतात. शालेय जीवनात आपल्याला सहज घेऊन जातात. गाव पातळीवरील अनेक कथांमधून तेथील गावकऱ्यांचं वागणं, जगणं आणि त्यांचे स्वभाव विशेष सहज लक्षात येतात. कथांमधील पात्र आपल्या डोळ्यांसमोर उभी राहतात.

या पुस्तकात एकूण सत्तावीस आखूडशिंगी लघुकथा आहेत. प्रत्येक कथेला काहीतरी सांगायचे आहे. आणि विशेष म्हणजे त्या कथेचे सांगणे वाचकापर्यंत सहज पोहोचतेही, हेच या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते.

**अनुभवाचे अंतरंग (कथासंग्रह)**

लेखक - अशोक शेटे

प्रकाशक - चपराक प्रकाशन

पृष्ठे - १०४ , किंमत - १५० रुपये




**प्रेरणादायी आत्मकथन**

बसवंत घेवारे यांचे 'जमाखर्च आयुष्याचा' हे आत्मकथन साकेत प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. या पुस्तकासंबंधी सांगताना घेवारे म्हणतात गेली पस्तीस वर्षे मी बँकेत जनतेच्या पैशांचा जमाखर्च केला व आता बँकेच्या सेवेतून निवृत्त झाल्यानंतर माझ्या आयुष्याचा जमाखर्च या आत्मकथनातून मी सादर केला आहे.

अतिसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले, वाढलेले बसवंत घेवारे परिस्थितीवर मात करीत संधी मिळेल त्याप्रमाणे शिक्षण घेऊन मराठवाडा ग्रामीण बँकेच्या लिपिकापासून सुरू झालेला त्यांचा जीवन प्रवास अधिकारी स्केल तीन या पदापर्यंत पोहचतो. पण हा जीवन प्रवास सहज सोपा नव्हता तर अतिशय खडतर असा होता. बँक व्यवसायात उपजीविकेचे साधन म्हणून त्यांनी प्रवेश केला खरा. पण पुढे आपल्या चिकाटीने, बुद्धिमत्तेने बँकिंग क्षेत्रात आणि सामाजिक क्षेत्रातही आपल्या कार्यकर्तृत्वाचा अमीट ठसा उमटवला.

लेखकाचा बालपणीचा काळ अतिशय वेदनादायी होता. कुटुंबावर प्रचंड आघात करणारी वडिलांची व आजोबांची जन्मठेप ही कुटुंबाचे दैन्यवस्था वाढवणारी होती. लेखकाचे बालपण, प्राथमिक शिक्षण, बालपणी नदीत बुडाले त्याची गोष्ट, तसेच माध्यमिक शिक्षणासाठी त्यांना दररोज तीन किलोमीटर पायी जाणे येणे करावे लागणे. या साऱ्याच गोष्टी वाचताना शिक्षण घेण्यासाठी लेखकाला अनंत अडचणींचा सामना कसा करावा लागला, याची जाणीव होते.

नातेवाईकांकडून झालेली फसवणूक, गुन्हेगारांची मुले म्हणून झालेली कुचंबना या सर्वच गोष्टी लेखकाच्या वाट्याला आल्या. त्यातूनही वाट काढीत शिक्षणाच्या वाटेवर ते आले होते. धडपड करीत राहिले. शाळेच्या दिवसातही त्यांना शेतातली कामे करावी लागे. जनावरे सांभाळणे, खुरपणी करणे, कापूस वेचणे इत्यादी कामे ते करत असत. त्यांचे वडील, आजोबा जन्मठेपेची शिक्षा भोगत असल्यामुळे गुन्हेगारांच्या मुलांना मोफत शिक्षण मिळण्यासाठी नांदेडच्या रिमांड होममध्ये शिकण्यासाठी प्रवेश मिळणे, या योजनेअंतर्गत लेखकाची व त्यांच्या लहान भावाची पुढील शिक्षणासाठी सोय झाली. गुन्हेगाराची मुलं गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळू नये शिवाय समाजाकडूनही अशा मुलांना त्रास होऊ नये हा विचार त्यामागे होता. या योजनेअंतर्गत लेखकाची व त्यांच्या लहान भावाची पुढील शिक्षणासाठी सोय झाली.

परिस्थितीचे टक्केटोणपे खात, अडचणीतून स्वतःच मार्ग काढत ते दहावी पास झाले. गावात दहावी पास होणारा पहिला विद्यार्थी म्हणून लेखकाचा सन्मान झाला. अनंत अडचणीतही एम.कॉम.पर्यंत ते शिकले. अडचणींचा फेरा काही सुटला नाही.

आयुष्याचा जमाखर्च मांडताना वाट्याला आलेल्या सुखदुःखांची, यशा-पयशाची, सन्मानकारक आणि अपमानककारण घटनांची तसेच आयुष्यात भेटलेल्या सहप्रवाशांची त्यांनी नोंदवलेली निरीक्षणे, मांडलेली विधाने आणि लिहिलेल्या नोंदी या साऱ्याच गोष्टी इतक्या पारदर्शक आहेत, की त्या वाचताना आपल्याला लेखातल्या निर्मळ माणसाचे दर्शन घडते.

या पुस्तकाला प्राचार्य डॉ. वि.ना. कदम यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. प्रस्तावने ते म्हणतात,

'एखाद्या व्यक्तिच्या वाट्याला किती दुःखं यावीत याला काही मर्यादा असायला पाहिजेत. पण लेखकाच्या वाट्याला लहानपणापासून ते अगदी अधिकारी होईपर्यंत दुःख आणि संकटांनी सारखा पिच्छा पुरविलेला दिसतो. बरं ती संकटंही साधीसुधी नव्हती. अगदी जीवनातून उठवणारी होती. पण बसवंत घेवारे यांनी साऱ्या संकटांशी निकराने लढून आपले जीवन उज्ज्वल केले. समाजाच्या भल्यासाठी झटणाऱ्या प्रामाणिक व्यक्तीला किती दुःखं सोसावी लागतात याचा इत्थंभूत वृत्तांत सांगणारी बसवंत घेवारे यांची ही सत्य आत्मकथा आहे. एकूण निवेदनातील प्रांजळपणा, रोजच्याच जीवनातील साधी भाषा. गावखेड्यातील माणसांचा सहवास यामुळे हे आत्मकथन प्रातिनिधिक वाटावे असे झाले आहे.'

या पुस्तकाची पाठराखण करणारे ज्येष्ठ लेखक शिवाजी अंबुलगेकर या आत्मकथनाबाबत म्हणतात, 'ज्यांना जन्मापासूनच साध्या साध्या बाबींशी संघर्ष करावा लागला, त्यांचं आयुष्य जगण्याच्या भट्टीत ताऊन सुलाखून निघतं. जगणं पिळदार होतं. आटीव-कातीव होतं. अशांनी आत्मचरित्र लिहिलं तर ते अधिक वाचनीय होतं. वाचकांसाठी अधिक प्रेरणादायी होतं. बसवंत घेवारे यांच्याकडे असा वजनदार ऐवज आहे.'

खरंतर, आत्मकथन म्हणजे स्वतःच्या जीवनाचा आलेख, स्वतःच्या शब्दांत मांडणे. जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना, संघर्ष, यश, आणि वैयक्तिक भावनांचा लिखित स्वरूपात वृत्तांत देते, तेव्हा त्या साहित्याला आपण 'आत्मकथन' म्हणतो. आत्मकथनाची काही प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे हे कथन लेखकाने स्वतः लिहिलेले असल्यामुळे यात 'मी', 'माझे', 'मला' या शब्दांचा प्रामुख्याने वापर केला जातो.

आत्मकथन हे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा मानला जाते, त्यामुळे त्यात आत्मपरीक्षण आणि सत्य मांडणे अपेक्षित असते. यात व्यक्तीच्या जन्मापासून किंवा बालपणापासून ते आत्मकथा लिहिण्याच्या काळापर्यंतचा प्रवास, आव्हाने आणि आठवणींचा समावेश असतो. साहित्याच्या दृष्टीने, आत्मकथा केवळ एका व्यक्तीची कहाणी नसते, तर त्या काळातील सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक परिस्थितीचा तो एक खरा दस्तऐवज असतो.

बसवंत घेवारे यांचे 'जमाखर्च आयुष्याचा' हे आत्मकथन वाचताना या सर्वच गोष्टींचा आपल्याला प्रत्यय येतो. एकूण नव्वद प्रकरणांत विभागलेले हे आत्मकथन वाचताना लेखकाच्या आयुष्याचा पट आपल्या डोळ्यांसमोर सहजगत्या उभा राहतो. म्हणूनच साहित्याच्या दालनात हे आत्मकथन मला महत्त्वाचे वाटते.

**जमाखर्च आयुष्याचा (आत्मकथन)**
लेखक - बसवंत घेवारे
प्रकाशक - इसाप प्रकाशन
पृष्ठे - २७२, किंमत - ७००/- रुपये




**जीवन आणि निसर्ग यांच्या एकरूपतेचे दर्शन घडविणारा कवितासंग्रह**

सौरव प्रकाशनाने प्रकाशित केलेला 'ऋतुगंध' हा सुभाष बागल यांचा पहिलाच कवितासंग्रह. या कवितासंग्रहात वेगवेगळ्या विषयांवरील एकूण बासष्ट कविता आहेत. या कवितांमध्ये निसर्गाची ओढ आहे. आणि या निसर्गाची जीवनाला जोड आहे. माणसाचं जीवनमान आणि निसर्ग या कवितांमध्ये एकरूप झालेले आहेत. निसर्गाचा माणसाच्या जगण्यावर होणारा परिणाम आणि प्रभाव या कवितांमध्ये आढळून येतो. तरी अगदी सहजगत्या लिहून जातो,

*मी पिऊन घेतला गंधवारा*
*मी शोषून घेतला वादळवारा*
*काळ्या मातीत सापडला गंध*
*मी उरी बाळगला ऋतुगंध*

उरी ऋतुगंध बाळगून कवितेला थेट भिडणं आणि आयुष्य अवघं निसर्गमय होणं... याची प्रचिती आपल्याला या पुस्तकात येते.

'ऋतुगंध' या कवितेत ते म्हणतात,

*ऋतुगंध घेऊनिया, दारात पहाट आली*
*परसातल्या फुलांना, हळूच जाग आली*

इतकी तरलता आणि सहजता कवितेत आल्यानंतर कवितेचा आशय आपसूक उंचीवर जातो.

हा ऋतुगंध नाजूक फुलांबरोबर आपल्या मनालाही जाग आणतो. आणि मनात जागाही निर्माण करतो.

'जीवन' या कवितेत कवीने आयुष्याला अर्थ देणाऱ्या आणि जीवनाला व्यापून उरणाऱ्या सत्य, वात्सल्य, आनंद, कारुण्य, ज्ञान या संवेदनांना साद घातलेली आहे.

*माय आणि गाय,*
*वात्सल्याचा झरा*
*अमृताच्या धारा,*
*जगताना...*

वात्सल्याचा झरा, जणू अमृताच्या धारा झाल्यात असे कवीला वाटते. कवितेत ही भावना ओथंबून वाहते.

'दान देते' या कवितेत कवी म्हणतो,

*रिमझिम पावसाची झुळूक*
*ओल्या नभाशी खेळ खेळते*
*रसरशीत श्रावणातील सर येते*
*फुटलेल्या नवकुंभाला*
*मौसमातील दान देते.*

'रसरशीत श्रावण' ही कल्पनाच किती थोर आहे. श्रावणातली सर नवीन फुटलेल्या कोंभाला तरारून येण्याचे दान देते.

श्रावणातल्या सरी माणसाला निसर्गाची ओढ निर्माण करतात. मनामनात तरंग गीते उमटतात. 'झुळूक हळवी' ही कविता मनात भावनांचे तरंग सहजगत्या उमटवते.

सुभाष बागल यांची कविता सामाजिक भान जपणारीसुद्धा आहे. समाजातील दाहकता, विरोधाभास, अस्थिरता नेमकेपणाने शब्दबद्ध करते.

'दाह' ही कविता नवक्रांतीच्या ज्वालांनी पेटून उठण्याची कळ मनात निर्माण करते आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देते.

'हृदय' या कवितेत कवी म्हणतो,

*हृदय भयकंपीत नको, कंपीत व्हावीत.*
*ती हृदय कंपने जगभर जावीत... बुद्धाच्या विचारासमान.*

कवितेतून ओसंडून वाहणारा केवढा हा व्यापक अनुभव!

पुढे जाऊन कवी म्हणतो,

*माणसांनी मात्र झापडबंद करू नयेत आपली हृदयं*
*इतर कुणासाठीही*
*मग ती माणसं असो वा प्राणी*
*तीच त्याची ओळख माणूसपणाची*
*तेथे दया, भूतदया आणि करुणा बुद्धाची.*

हृदयाचं स्पंदनं टिकणारी आणि माणूसपणाच्या वाटेवर नेणारी ही कविता वाचता वाचता आपल्यालाही अंतर्मुख करते.

'सूर्य तळताना' या कवितेत ते म्हणतात,

*गरीब, वंचित, पीडितांसाठी झिजतात जी माणसे*
*जमिनीवरचे देव होतांना, तयांना पाहिले मी.*

माणसातला देव कोणाला म्हणावे? त्याचे हे नितांत सुंदर उत्तरच आहे, असे मला वाटते.

'बळीराजा' या कवितेत कवी शेतकऱ्याचे दुःख मांडले आहे. कवी म्हणतो, *बळीराजाचा संसार आजारी माणसासारखा कण्हत आहे.* किती नेमकेपणाने एका ओळीत बळीराजाचा संसार उभा केला आहे.

'आकांत' या कवितेत,
*हंबरणे गायीचे येता कानी*
*बैचेन होतो तू मनोमनी*

ही कविता वाचताना आपल्यालाही बैचेनपणा अंतर्बाह्य ढवळून काढतो.

'मा जिजाऊ' ही कविता वाचताना जिजाऊंचे भव्यदिव्य कार्य आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. सहज साध्या शब्दांनाही अशावेळी आभाळाएवढी उंची लाभते.

*दिली दिशा शिवबांना,*
*तू दिले बळ मावळ्यांना*
*तू होती विसावा दुबळ्यांची,*
*तू होती माता सगळ्यांची.*

कवीने दयाघनाकडे केलेली प्रार्थना आपल्याही मनापर्यंत पोहोचते. आपलेही हात नकळत जोडले जातात. हे पसायदान मागण्यासाठी.

*येऊ दे सुख आमच्या जीवना*
*अशी प्रार्थना तुला दयाघना.*

या पुस्तकाला ज्येष्ठ साहित्यिक डॉ. साहेब खंदारे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. प्रस्तावने ते म्हणतात, 'सुभाष बागल यांच्या कवितेकडे पाहताना ते ज्या लोकजीवनाचे प्रतिनिधित्व करतात त्या जीवनातील लोकसंस्कृतीच्या अमूर्त जाणिवा त्यांच्या कवितेच्या गाभ्यात गच्च रुजलेल्या आहेत.'

पुस्तकाची पाठराखण ज्येष्ठ साहित्यिक फ.मुं. शिंदे त्यांनी केली आहे. पाठराखण करताना ते म्हणतात, 'जगण्यातलं जिभेवर आलं की जीवही जणू चेताच बनून जातो आणि त्याच्या आपल्या आनंदाच्या ध्वजात लहरत राहतो. ऋतुगंधातून त्या लहरण्याचा अनुभव सुभाष बागल यांनी दिला आहे.'

एकूणच बागल यांच्या कवितांना चिंतनाची बैठक आहे. ऋतुगंधाने व्याकुळ झालेल्या कविता या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळतात. तशाच समाजातील व्यवस्थेवर त्या परखडपणे भाष्यही करतात. आणि समाजिक भानही त्या जपतात.

'दिवा' या कवितेत ते म्हणतात,

*माझी कविता माझ्या अक्षरांचा गाव*
*माझी कविता माझ्या काळजाचा ठाव*
*व्हावी ती माझी पानमळा*
*लागू द्या तिला तुमचा लळा*

या पुस्तकातील कवितांचा आपल्याला लळाही लागतो. आणि वाचनानंदाचा मळाही आपला सहजगता फुलून जातो.

ऋतुगंध (कवितासंग्रह)
कवी - सुभाष बागल
प्रकाशन - सौरब प्रकाशन
पृष्ठे - ९६, किंमत - १२०/- रुपये




**तांड्यावरील जगणं समर्थपणे मांडणाऱ्या कथा**

इसाप प्रकाशनाने प्रकाशित केलेला लेखिका अनिता जाधव यांचा 'सृजन सकाळ' या पहिल्या कथासंग्रहानंतर आलेला, 'तांड्याचे पाय' हा दुसरा कथासंग्रह आहे. लमनतांड्याबर राहणाऱ्या लोकांचं जगणं बाचकांपर्यंत पोहोचविणारा कथासंग्रह आहे. तांड्याबर राहणाऱ्या माणसांच्या व्यथा वेदना त्यांच्या कथांचा विषय झाले. यातील काही कथा आकाराने छोट्या असल्या तरी त्या कथांचे विषय, आशय मात्र व्यापक आहेत. मागे पडलेल्या विषयाला पहिल्या पानावर आणावे आणि सर्वांची लक्ष वेधून घ्यावे असा हा कथासंग्रह आहे. साहित्यातून काहीसा दुर्लक्षित राहिलेला महत्त्वाचे विषय या कथांमध्ये लेखिका अनिता जाधव यांनी समर्थपणे मांडलेले आहेत. तांड्यावरचे जीवनमान त्यांनी शब्दांतून नेमकेपणाने रेखाटले आहे. एकोणीस कथांचा हा कथासंग्रह वाचताना प्रत्येक कथा वाचकाला अंतर्मुख करते. विचार करायला लावते. तांड्यावरील लोकांचे अनेक प्रश्न आपल्याही मनात निर्माण होतात. त्यांची जिद्द, त्यांचा संघर्ष आपल्या मनाला स्पर्शून जातो.

तांडा, वाडी, वस्तीच्या भागातील लोकांचे दुःख, व्यथा, विवंचना शब्दांत मांडताना बंजारा बोलीचा लेखिकेने समर्पक वापर केला आहे. बोलीभाषेमुळे या कथेतील प्रसंग, संवाद आणि पात्र अधिक जिवंत वाटतात. मनाला भिडतात. विचार संजीवनी देऊन जातात.

या पुस्तकातील 'कोयता' ही कथा नववीत शिकणाऱ्या दुर्गाच्या जिद्दीची कहाणी सांगून जाते. ऊसतोड कामगाराची ही मुलगी अत्यंत कष्टातून पीएसआय होते आणि तांड्यावरील मुलामुलींसाठी एक आदर्श बनते. पण तिची इथपर्यंत पोहोचण्याची वाट सोपी नव्हती. तिचा आणि तिच्या कुटुंबाचा खडतर प्रवास

आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो.

'बॅगेतील बिऱ्हाड' या कथेत रक्माच्या तिन्ही मुलांपैकी 'आई माझ्याकडे राहील' तसे कोणीही म्हणायला तयार होत नाही. शेवटी तिघांनी ठरवल्याप्रमाणे आई सर्वांच्या घरी महिना महिना राहू लागते. एका आईच्या राहण्याच्या दिवसांची वाटणी तीन मुलांनी केली आणि रक्माच्या बागेत बिऱ्हाड बसला.' असं जेव्हा आपण वाचतो तेव्हा आईच्या जीवाची काय घालमेल होत असेल? या विचारानं आपलाही जीव तीळ तीळ तुटतो. अनेक ठिकाणी वाचलेलं, पाहिलेलं आणि ऐकलेलं हे वास्तव पुन्हा आपल्या डोळ्यांसमोर उभं राहतं. समाजातील संवेदनशीलता कशी हरवत चालली आहे, याचं दर्शनच घडतं.

'तांड्याचे पाय' या कथेत याडी पदराच्या आडोशाला भाकरीची दुरडी ठेवून हमेशाच जेवण का वाढत असते? तांड्यावरील लेकरू कर्तृत्वानं मोठं झाल्यावर कुटुंबाचं भाग्य उजळतं म्हणजे नेमकं काय होतं? यांचा उकल आपल्याला ही कथा वाचल्यानंतर होतो.

तांड्यातून शिकणाऱ्या आणि पुढे शहरात जाऊन बसणाऱ्या माणसाची कहाणी ही कथा सहजगत्या सांगून जाते.

'अभय' ही कथा कुटुंबासाठी धडपडणाऱ्या अभय या मुलाची आहे. कुटुंबाच्या पाचवीलाच पुजलेल्या काबाडकष्टाच्या जोखडातून कुटुंबाला मुक्त करून त्यांना सुखात ठेवावं, असं त्याला वाटणं आणि ते त्यानं कृतीत उतरवणं आणि एक नवा आदर्श घालून देणं, ही गोष्ट या कथेतील आपल्या मनापर्यंत पोहोचते.

भीषण पाणीटंचाईवर आधारलेली 'पाणी... पाणी' ही कथा लोकांना एकत्र आणून त्यांना गावतळे खोदण्याच्या चांगल्या कार्यात सामील करून घेणे आणि सर्वांच्या सहकार्यातून गावातील पाणी प्रश्न सोडविणे. यावर भाष्य करणारी आहे. हे सर्व करण्यासाठी पुढाकार घेणारा आर्यन आणि त्याचे संघटन कौशल्य आपल्याला महत्त्वाचे वाटते. अधोरेखित होते.

या पुस्तकाला के.आर.ए.एम. महिला वरिष्ठ महाविद्यालय, नांदेड येथील मराठी विभाग प्रमुख आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. व्यंकटी पावडे यांची अभ्यासपूर्ण आणि नेमकेपणाने भाष्य करणारी दीर्घ प्रस्तावना लाभली आहे. प्रस्तावनेत ते म्हणतात, खरे साहित्य तेच असते जे वाचकांच्या मनामध्ये प्रश्न उपस्थित करते. 'तांड्याचे पाय'मधील कथा वाचकांना इथल्या विषय व्यवस्थेच्या विरूद्ध प्रश्न विचारायला प्रेरित करतात. कष्टकरी माणसांच्या मानसिक द्वंद्वामागील परिस्थितीचा शोध घ्यायला शिकवितात. या कथा डिजिटल, स्मार्ट आणि अमृतमहोत्सवी भारतातील एका उपेक्षित जगाच्या व्यथा मांडणाऱ्या आहेत. तांड्यावरील जीवनाच्या त्या आरसा आहेत. या कथेत

दारिद्र्याच्या खाईत होरपळलेली माणसे आहेत; पण कुठेही आक्रस्ताळेपण नाही. भाषेचा तोल लेखिकेने कुठेही जाऊ दिला नाही. पात्र मोठ्या असलेल्या नदीने महाभयंकर महापुरातही संथपणे वाहत राहावे असे ही कथा मानवी जगण्यातील ताणेबाणे घेऊन वाहते.' त्यांनी या पुस्तकावर केलेलं भाष्य मला महत्त्वाचं वाटतं.

तर या पुस्तकाची पाठराखण करणारे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. कमलाकर चव्हाण पाठराखण करताना म्हणतात, 'तांड्याचे पाय या संग्रहातून आलेली कथा शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी माणसांचे जीवनविश्व उभे करते. दुःखाच्या घनगर्द काळोखात बुडालेल्या तांड्याला शिक्षणाचा सूर्यच प्रकाशमान करू शकतो, या आत्मविश्वासावर ही कथा उभी आहे. अपार कष्ट करूनही दारिद्र्याच्या झळा सामान्य माणसांचे मनोविश्व अस्वस्थ करतात ही जाणीव या कथांमधून अधोरेखित झाली आहे.'

या सर्व गोष्टींची प्रचिती आपल्याला या कथा वाचताना पदोपदी होते.

एकूणच या पुस्तकातील सर्वच कथा परिवर्तनाची आस असणाऱ्या आणि कष्टकऱ्यांच्या ध्यासाला जीवापाड जोपासणाऱ्या आहेत. दुःख मांडतानाही त्यात पिचून जाण्याची भीती नाही तर त्यात ठोस निग्रह आहे. त्या अडचणीतून बाहेर पडायची जिद्द आहे. म्हणूनच या कथा तांड्यावरील माणसांच्या असल्या जरी, तरी त्या केवळ एकट्या दुकट्याच्याच्या न राहता अवघ्या जनमानसाच्या होतात. त्यांच्या व्यथा वेदना आपल्या होऊन जातात, हेच या पुस्तकाचे खरे यश आहे.

**तांड्याचे पाय (कथासंग्रह)**
लेखिका – अनिता जाधव
प्रकाशन – इसाप प्रकाशन
पृष्ठे – १२८, किंमत – २५०/– रुपये

- विज्ञानाचे मुख्य वैशिष्ट्य स्वतंत्र विचार आणि कठोर परिश्रम हे आहे, महागडी उपकरणे नाही. जेव्हा मला नोबेल पारितोषिक मिळाले, तेव्हा माझ्या उपकरणांवर जेमतेम २०० रुपये खर्च झाले होते.
- वैज्ञानिक वृत्तीचे सार म्हणजे आपण किती अद्भुत जगात राहत आहोत हे समजून घेणे.
- योग्य प्रश्न विचारा आणि निसर्ग स्वतः तिच्या गुपितांचे दरवाजे तुमच्यासाठी उघडेल.

**– डॉ. सी. व्ही. रामन**
(भारतातील पहिले नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ)

# कार्यवृत्तांत

# साहित्य शाखा

मुंबई मराठी साहित्य संघाच्या 'ग्रंथालय व्यवस्थापन' समितीच्या वतीने, शनिवार दिनांक १५ मे २०२६ रोजी, 'ग्रंथालय व्यवस्थापन' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी डॉ. संदीप भावसार यांना निमंत्रित केले होते. डॉ. भावसार हे वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे एलआरसीचे प्रमुख आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ग्रंथालय तंत्रज्ञान याविषयी त्यांनी एकशे पन्नासहून अधिक व्याख्याने दिली आहेत. त्यांची चार पुस्तके आणि पंचेचाळीसहून अधिक शोधनिबंध प्रकाशित आहेत. साहित्यशाखा कार्यवाह प्रा. प्रतिभा सराफ यांनी उपस्थितांचे स्वागत करून, या कार्यक्रमाची पार्श्वभूमी विशद केली. त्यानंतर विकसनशील देशांमधून अमेरिकन लायब्ररी असोसिएशन FERAची (फंडामेंटल ऑफ इलेक्ट्रॉनिक रिसोर्सेस क्विझिशन) २०११ सालची फेलोशिप असे अनेकविध पुरस्कार प्राप्त डॉ. भावसार यांची ग्रंथालय व्यवस्थापन समन्वयक श्री. अरुण जोशी यांनी ओळख करून दिली. डॉ. भावसार यांनी 'ग्रंथालय व्यवस्थापन' करताना कोणत्या बाबी लक्षात घ्याव्यात, हे सोप्या पद्धतीने आणि सविस्तर मांडले. त्यांनी असेही सांगितले की वाचकाला काय हवे, कोणत्या प्रकारची पुस्तके वाचली जातात याची नोंद ठेवावी. त्यातून वाचकाची आवड आणि वाचनाचे प्रकार समजतात. डिजिटल माध्यमाचा उपयोग करून आपल्याकडील पुस्तकांची माहिती, त्यासंदर्भात केलेले कार्यक्रम, नवीन उपक्रम अशी माहिती सतत प्रसारित करावी. यातून जगाच्या विविध ठिकाणांहून वाचक आपल्याशी जोडले जातात. डेटा संकलित करण्यासाठी Koha हे सॉफ्टवेअर वापरावे. इ.

यानंतर प्रश्नोत्तरे झाली. साहित्य संघाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव -गांधी, कार्यालयीन मदतनीस उज्ज्वला चव्हाण आदींच्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. या कार्यक्रमासाठी श्री. एकनाथ आव्हाड, प्रा. प्रतिभा बिस्वास, श्रीमती ज्योती कपिले, श्रीमती संगीता अरबुने, श्रीमती मीनाक्षी जयकर, श्रीमती अनिता देवधर, श्रीमती शैला सामंत, श्री. निशिकांत नवरे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागातर्फे अमराठी टॅक्सी आणि रिक्षा

चालकांसाठी विनाशुल्क मराठी संवाद-भाषा प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन शुक्रवार दिनांक ५ जून २०२६ रोजी मुंबई मराठी साहित्य संघात, मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. विनोद कुमरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी आपल्या प्रास्तविकामध्ये प्रा. सुहासिनी कीर्तीकर यांनी मुंबई मराठी साहित्य संघातर्फे अनेक वर्षे अमराठी भाषिकांसाठी चालवल्या जाणाऱ्या मराठी भाषा वर्गांविषयी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे डॉ. कुमरे असे म्हणाले की, टॅक्सी चालकाने एक वाक्य जरी मराठीत बोलले तरी प्रवाशाला त्याच्याबद्दल आपुलकी निर्माण होते कारण भाषा हा माणसांना जोडणारा एक दुवा आहे. प्रवासी जर हिंदी भाषेत बोलू शकतात, तर टॅक्सीचालकांनीदेखील मराठी भाषा शिकून प्रवाशांशी मराठीमध्ये सुसंवाद साधायला काहीच हरकत नाही कारण प्रवासी आणि टॅक्सी चालक यांच्यामधील नाते भाषेच्या माध्यमातून अधिक घट्ट निर्माण होऊ शकते. ते पुढे असेही म्हणाले की, भाषा ही ईश्वराच्या मंत्रासमान आणि ओंकाराच्या नादासमान आहे. भाषेमुळे ज्ञानपरंपरा कायम जोपासली जाते. प्रवासी आणि चालक यांच्यामध्ये भाषेमुळे विश्वास निर्माण होऊन टिकला तरच टॅक्सी चालकांचा व्यवसाय नक्कीच टिकेल.

आपले मनोगत व्यक्त करताना मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्याध्यक्ष डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांनी, या वर्गामध्ये संभाषणासाठी उपयोगी असलेली मराठी अतिशय सोप्या पद्धतीने शिकवली जाणार असून या प्रशिक्षणानंतर मिळालेले प्रमाणपत्र वाहन चालन परवाना नूतनीकरण करतेवेळी अनिवार्य असल्याची माहिती दिली. डॉ. अनुपमा उजगरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. मुंबई मराठी साहित्य संघाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव-गांधी, कोषाध्यक्ष श्री. आनंद बिर्जे



आणि महाराष्ट्र पोलीस सेवेतून उपायुक्त पदावरून सेवानिवृत्त झालेले डॉ. रोहिदास दुसार, मुंबई टॅक्सी असोसिएशनचे व्यवस्थापक श्री. सालियन तसेच त्यांचे सदस्य असलेले टॅक्सी चालक उपस्थित होते. या उपक्रमाच्या उद्‌घाटन समारंभाचे नेटके सूत्रसंचालन श्रीमती मीनाक्षी जयकर यांनी केले. या प्रकल्पासाठी टॅक्सीचालकांचा प्रतिसाद मिळावा म्हणून श्रीमती मीनाक्षी जयकर, श्री. चंद्रशेखर गोखले व डॉ. मनोज वराडे यांनी विशेष प्रयत्न केले.

या प्रकल्पाच्या समन्वयक मीनाक्षी जयकर यांच्यासोबत डॉ. मनोज वराडे, श्रीमती शैला सामंत, कु. श्रिया जयकर आणि श्री. हर्ष माहिमकर असे चार प्रशिक्षक 'मुंबई मराठी साहित्य संघ' येथे चार वर्ग घेत आहेत. 'श्री शिवाजी शिक्षण मंडळ', संत गाडगे महाराज चौक येथे डॉ. मनोज वराडे आणि डॉ. रोहिदास दुसार प्रशिक्षक म्हणून वर्ग घेत आहेत.

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे घाटकोपर येथे 'नॅशनल बेस्ट एज्युकेशन अँड करिअर ॲकॅडमी', 'मराठी विद्यालय' (पंतनगर), 'त्रिरत्न बुद्धविहार' या तीन केंद्रांमध्ये एकंदरीत तीन वर्ग सुरू झाले आहेत जिथे श्रीमती संध्या गोखले समन्वयक असून त्या श्रीमती प्रमिला नायकवडी यांच्यासोबत प्रशिक्षक म्हणूनही काम सांभाळत आहे. गोवंडी भागाच्या समन्वयक प्रा. प्रतिभा सराफ यांचेही वर्ग सुरू झाले आहेत जिथे प्रशिक्षक म्हणून श्रीमती सुप्रिया मुळगावकर, श्री. मिलिंद मुळगावकर आणि



श्रीमती रितू म्हात्रे यांची नेमणूक झालेली आहे. कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळातोय, जो अधिकाधिक वाढतोय, याविषयी मुंबई मराठी साहित्य संघाच्या केंद्र संचालक डॉ. उज्ज्वला मेहेंदळे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

**– प्रा. प्रतिभा सराफ**

कार्यवाह, साहित्यशाखा, मुंबई मराठी साहित्य संघ

# संघ मंदिर समिती

साहित्य संघ मंदिराच्या इमारतीचे वॉटर प्रूफिंगचे काम पूर्ण झाले आहे. आता पाचव्या मजल्याबरील पुरंदरे हॉल आतून दुरुस्त करण्यात येत आहे. त्याचे काम ५ जुलैच्या आत पूर्ण करण्यास कंत्राटदारास सांगण्यात आले आहे. त्याप्रमाणे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. यानंतर हॉलमधील इलेक्ट्रिफिकेशनचे काम हाती घेण्यात येईल व सभागृह पूर्ववत चालू करण्यात येईल. हे सभागृह कशा पद्धतीने भाड्याने द्यावे, त्याचे भाडे काय असावे, याचा निर्णय संघ समिती लवकरच घेईल. पाणी गळती आणि पाचव्या मजल्यावरचे काम पूर्ण झाल्यावर टप्प्याटप्प्याने बाकीची आवश्यक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येतील. सध्या नाट्यगृहात व्यावसायिक नाटके, वाद्यवृंद आणि लोककलेच्या नाटकांचे आणि विविध स्वरूपांचे बरेच कार्यक्रम होत आहेत ही समाधानाची बाब आहे.

साहित्य संघ मंदीर नाट्यगृह आणि पुरंदरे सभागृह यामध्ये अधिक अधिक कार्यक्रम कसे होतील आणि उत्पन्नाचा स्रोत कसा वाढेल यासाठी संघ समिती प्रयत्नशील आहे. या प्रयत्नांना विश्वस्त कार्याध्यक्ष प्रमुख कार्यवाह आणि कोषाध्यक्ष जातीने लक्ष घालून मार्गदर्शन करीत आहेत.

**– चंद्रशेखर गोखले**

प्रभारी कार्यवाह, संघ मंदिर समिती

- माझे यश हे अ किंवा ब माझ्याबद्दल काय विचार करतात यावर अवलंबून नसेल, तर मी माझ्या कामातून काय निर्माण करतो यावर अवलंबून असेल.

**– डॉ. होमी जहांगीर भाभा**

(भारतीय अणुऊर्जा कार्यक्रमाचे शिल्पकार)

# नाट्यशाखा

१७ जानेवारी २०२६ला ड्रामा स्कूल मुंबईतर्फे (DSM) साहित्य संघात संध्याकाळी ६ वाजता एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात जेहान माणेकशॉ (संचालक, ड्रामा स्कूल मुंबई) यांच्या विनंतीवरून कार्यक्रमास आलेल्या प्रेक्षकांचे स्वागत करण्यासाठी साहित्य संघाचे प्रतिनिधी म्हणून, सुबोध आचवल यांनी आपल्या छोटेखानी भाषणात, साहित्य संघाची ९० वर्षांची गौरवशाली परंपरा, आणि ड्रामा स्कूल मुंबईच्या (DSM) नाट्य प्रशिक्षणाबाबतची माहिती कार्यक्रमास आलेल्या प्रेक्षकांना दिली.

त्यानंतर 'नमुनी ईश चरणा' हा कार्यक्रम, नाट्यशाखेतर्फे, प्रेक्षकांवरती फुले उधळून सादर करण्यात आला. त्यात डॉ. अ.ना. भालेराव, डॉ. बाळ भालेराव आणि गेल्या ९० वर्षांची साहित्य संघाची नाट्य परंपरा यांचा पद्यमय आणि संगीतमय धावता आढावा घेण्यात आला. याचे लेखन, दिग्दर्शन ज्ञानेश भालचंद्र पेंढारकर यांनी केले होते. त्यात ज्ञानेश भालचंद्र पेंढारकर (सूत्रधार), प्राची जोशी फर्नांडिस (नटी) यांचा सहभाग होता. तर संगीत साथ केदार भागवत (ऑर्गन) आणि प्रसाद पंडित (तबला) यांची होती. नेपथ्याचा भाग सूरज, संतोष आणि प्रमोद (साहित्य संघ रंगमंच कामगार) यांनी सांभाळला. या कार्यक्रमाला प्रेक्षकांची उत्तम दाद मिळाली.

**– ज्ञानेश भालचंद्र पेंढारकर**

कार्यवाह, नाट्यशाखा

- राष्ट्राचा विकास हा तिथल्या नागरिकांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आकलनाशी आणि उपयोगाशी अत्यंत घनिष्टपणे जोडलेला असतो.
- एका व्यक्तीने, ज्याने विज्ञानाचा मार्ग अंगीकारला आहे, तो कोणत्याही समस्येकडे एक नवीन दृष्टिकोन आणि प्रबोधन घेऊन पाहतो.

**– डॉ. विक्रम साराभाई**

(भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक)

# मुंबई मराठी साहित्य संघ
## डॉ. अ.ना. भालेराव मार्ग, गिरगांव, मुंबई ४०० ००४


### नियामक मंडळ २०२५-२०३०

**विश्वस्त**

श्री. अभिजित गजेंद्रगडकर • श्री. अभय भालेराव • श्री. उदय कुलकर्णी

**अध्यक्ष**

प्रा. उषा तांबे

**उपाध्यक्ष**

डॉ. अनिल बांदिवडेकर • श्री. सुदेश हिंगलासपूरकर • श्री. विजय केंकरे • श्री. अशोक कोठावळे
श्रीमती रेखा नार्वेकर • श्री. जयराज साळगांवकर • डॉ. मधुकर वर्तक

**सन्माननीय सल्लागार**

श्री. अशोक बेंडखळे • श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर

**कार्यकारी मंडळ**

कार्याध्यक्ष - डॉ. उज्ज्वला मेहेंदळे • कोषाध्यक्ष - श्री. आनंद बिर्जे
प्रमुख कार्यवाह - डॉ. अश्विनी भालेराव-गांधी

**कार्यवाह**

साहित्यशाखा- प्रा. प्रतिभा सराफ • नाट्य शाखा - श्री. ज्ञानेश पेंढारकर
संघ मंदिर समिती - श्री. सुभाष भागवत

**सदस्य**

श्री. एकनाथ आव्हाड • प्रा. प्रतिभा बिश्वास • डॉ. मिलिंद जोग
श्री. रोहिदास पांगे • श्री. अरुण फडके • श्रीमती अर्पणा साठे

**स्वीकृत सदस्य**

श्री. उमेश पडळकर • श्री. चंद्रशेखर गोखले • श्रीमती मीनाक्षी जयकर

**नियामक मंडळ सदस्य**

श्री. गणेश आचवल,
श्रीमती संगीता अरबुने,
श्री. एकनाथ आव्हाड,
श्रीमती प्रियांका बांदिवडेकर,
श्रीमती दिपाली भागवत,
श्री. सुभाष भागवत,
श्री. मनन भालेराव,
डॉ. अश्विनी भालेराव-गांधी,
प्रा. प्रतिभा बिश्वास,
श्री. दिलीप भाटवडेकर,
श्री. चंद्रकांत भोंजाळ,
श्री. विजयराज बोधनकर,
श्रीमती धनश्री धारप,
श्रीमती सावित्री हेगडे,
श्री. चंद्रशेखर गोखले,
श्री. रवींद्र गोळे,
श्रीमती मीनाक्षी जयकर,
प्रा. डॉ. मिलिंद जोग,
श्री. अरुण जोशी,
श्रीमती ज्योती कपिले,
श्री. प्रकाश कामत,
प्रा. सुहासिनी कीर्तिकर,
डॉ. उज्ज्वला मेहेंदळे,
श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर,
श्री. विकास परांजपे,
प्रा. नरेंद्र पाठक,
श्री. प्रमोद पवार,
श्री. ज्ञानेश पेंढारकर,
डॉ. अमेय पुरंदरे,
श्री. अरुण फडके,
प्रा. प्रतिभा सराफ,
श्रीमती अर्पणा साठे,
श्री. गीतेश शिंदे
डॉ. अनुपमा उजगरे,
श्री. चंद्रशेखर वझे

**स्वीकृत सदस्य**

श्री. आनंद बिर्जे • श्री. उमेश पडळकर • श्री. तनय गांधी • श्री. रोहिदास पांगे • श्री. हेमंत जोशी

मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशित




मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४
भ्रमणध्वनी : ७३०४३६९३९६